भट्टोजी दीक्षितांच्या सिद्धान्तकौमुदीच्या पुढें प्रसिद्ध
व्हावयाच्या मराठी
भाषान्तराची व विवरणाची

# प्रस्तावना

लेखक

वासुदेव नारायणशास्त्री गोखले

शके १८५७

माघ शुद्ध प्रतिपदा ] [ जानेवारी २५ सन १९३६

भट्टोजी दीक्षितांच्या सिद्धान्तकौमुदीच्या पुढें प्रसिद्ध
व्हावयाच्या मराठी भाषान्तराची

# प्रस्तावना.


लेखक व प्रकाशक

वासुदेव नारायणशास्त्री गोखले

पुणें नं. ४, द. मो. रानडे यांचा बंगला.



शके १८५७

माघ शुद्ध प्रतिपदा [ जानेवारी २५ स. १९३६

किंमत १ रुपया ( टपाल खर्च निराळा ).

मुद्रक
रा. रा. अनंत विनायक पटवर्धन, बी. ए.
आर्यभूषण प्रेस, ९३६।२ भांबुर्डा पेठ, पुणें.

श्री.

श्री महामुनि पाणिनि यानें इ. स. च्या पूर्वी सुमारें एक हजार वर्षे अष्टाध्यायी नांवाचा संस्कृत भाषेच्या व्याकरणशास्त्रावर जो एक अप्रतिम ग्रंथ लिहिला आहे त्यावर इ. स. च्या सतराव्या शतकांत भट्टोजी दीक्षित या दाक्षिणात्य महापंडितानें "सिद्धान्तकौमुदी" नांवाची एक टीका केली आहे. तिचें मीं मराठींत भाषांतर व विशेष कठीण व समजण्यास अवघड अशा स्थलीं जास्त स्पष्टीकरण केलें आहे. अष्टाध्यायीवर "काशिका व सिद्धांतकौमुदी" हे दोन टीकाग्रंथ आहेत. त्यांपैकीं विवेचनाकरितां "सिद्धांतकौमुदी" च घेतली आहे. "काशिका" हा टीकाग्रंथ इ. स. च्या आरंभाचे सुमारास झालेला आहे. व "सिद्धांत कौमुदी" हा ग्रंथ त्यानंतर पुष्कळ शतकांनीं झालेला असून त्यांत भट्टोजी दीक्षितांनीं त्यांच्यापूर्वी झालेल्या सर्व व्याकरणशास्त्रज्ञांचे अभिप्राय व मतें नमूद केलेलीं आहेत.

"अष्टाध्यायी" या ग्रंथाच्या योग्यतेबद्दल पाणिनीनंतर झालेल्या 'कात्यायन, पतंजलि' वगैरे सारख्या महापंडितांनीं प्रशंसोद्गारच काढलेले आहेत. अलीकडील आंग्लविद्याविभूषित अशा आर्यपंडितांनीं व युरोपीय पंडितांनीं, व भाषाशास्त्रज्ञांनीं त्या ग्रंथाबद्दल मुक्तकंठानें स्तुति केलेली आहे. या ग्रंथाचें रचनान्तर व स्फुटीकरण "सिद्धांतकौमुदी" हें आहे. या ग्रंथावरील ही टीका व भाषांतर छापविण्यापूर्वी "अष्टाध्यायी"च्या कालीं संस्कृत भाषेची स्थिति व लोकस्थिति कशी होती वगैरे संबंधानें मीं कांहीं अनुमानें पाणिनीय सूत्रांवरून काढून जी प्रस्तावना लिहिली आहे, ती प्रथमतः छापवून प्रसिद्ध करणें बरें असें वाटल्यावरून फक्त प्रस्तावनाच प्रथम छापली आहे.

ही प्रस्तावना व भाषांतर हीं कांहीं संस्कृतज्ञ विद्वानांना दाखविलीं, त्यांचे अभिप्राय सोबत जोडले आहेत.

प्रस्तावना छापण्याला लागणाऱ्या खर्चाकरितां म्हणून चि. केशव नारायण बापट, बी. ए., एलूएल. बी. सब् सज्ज, संस्थान जमखिंडी, यांनीं द्रव्यद्वारां जी मदत केली तीबद्दल मी त्यांचा फार आभारी आहें. या प्रस्तावनेचें इंग्रजींत भाषांतर व "सिद्धांत कौमुदी"चें मराठींत भाषांतर लवकरच प्रसिद्ध करण्याचा मनोदय आहे.

## प्रस्तावनेमध्यें येणाऱ्या विषयांची

# यादी.

१ पाणिनीनें केलेल्या अष्टाध्यायींतील वर्णसमाम्नाय.

२ आर्यावर्तांत आर्य लोकांपैकीं देव, दैत्य व दैतेय वगैरे लोकांच्या बोलण्याची भाषा संस्कृत होती.

३ वेदांतील संस्कृत भाषेच्या व्याकरणाचे नियम शिथिल होते.

४ लौकिक संस्कृताची प्राचीनकालची स्थिति.

५ पाणिनीच्या पूर्वी लिपि होती व पाणिनीनें ती 'खरोष्ट्री' किंवा 'ब्राह्मी' या लिपीवरून घेतलेली नव्हती.

६ पाणिनीच्या पूर्वी आर्यावर्तांत लिपि व त्या लिपीमध्यें लिहिलेले निरनिराळ्या विषयांवरील ग्रंथ होते. याबद्दल अष्टाध्यायींत सांपडणारीं प्रमाणें.

७ अष्टाध्यायीची मांडणी पाणिनीनें ज्या तत्त्वांवर केलीं तीं तत्त्वें.

८ अष्टाध्यायींतील सूत्ररचना करण्यांत इत्–संज्ञा, प्रत्याहार या कल्पना योजण्यांत पाणिनीनें दाखविलेलें चातुर्य.

९ अष्टाध्यायींत 'पूर्वपरनित्य.........' ही परिभाषा मुख्यतः वापरलेली दिसते. शिवाय 'पूर्वत्रासिद्धम्' हें सूत्र घालून अष्टाध्यायीचे दोन भाग करून सूत्रकल्पना केली.

१० 'अर्धमात्रालाघवं पुत्रोत्सवं मन्यन्ते वैयाकरणाः' या परिभाषेचें सूत्ररचनेमध्यें दाखविलेलें महत्त्व.

११ अधिकार, अनुवृत्ति, अपकर्ष, मंडूकप्लुति, स्थानिवद्भाव, तदादिविधि, तदंतविधि वगैरे कल्पनांचा अष्टाध्यायींत केलेला उपयोग.

१२ कात्यायन व त्यानें केलेलीं वार्तिकें.

१३ पाणिनि व कात्यायन एककालीन नव्हेत, याबद्दलचीं प्रमाणें.

१४ महाभाष्यकार पतञ्जलि.

१५ भट्टोजी दीक्षित, सिद्धांतकौमुदी, व सिद्धांतकौमुदीची मांडणी.

१६ सिद्धांतकौमुदींत–यथोत्तरं मुनीनां प्रामाण्यम्– या मताचा प्रसार.

१७ उणादिप्रत्ययप्रकरण, गणपाठ व धातुपाठ यांचें कर्तृत्व.

१८ पाणिनीच्या व कात्यायनाच्या वेळीं संस्कृत भाषा लोकांच्या व्यवहारांतील बोलण्याची भाषा होती, याबद्दलचीं प्रमाणें.

१९ वर्ण या शब्दाचे अर्थ.

२० पाणिनीच्या पूर्वी होऊन गेलेल्या ग्रंथकारांचें निदर्शन.

२१ पाणिनीच्या वेळची लोकस्थिति. सि. कौ. त २०५५ सूत्रांतील देवपथादि गण आहे. त्यांतील शब्दांवरून मार्गासंबंधानें निघणारीं अनुमानें. 'क्रोश' व 'गव्यूति' हे शब्द मार्गावरील अंतर मोजण्याचे होते.

२२ व्यापार व धंदे करणारे लोकांचे पूग किंवा संघ होते, त्याबद्दलचीं प्रमाणें.

२३ ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र या जातींचे आयुधजीवि संघ त्यावेळीं होते, याबद्दलचीं प्रमाणें.

२४ सि. कौ तील २२६६, २०६७, २०६८, २०६९, २०७०, २०७१, व ११०० सूत्रांतील प्रत्ययांना 'तद्राज' अशी संज्ञा आहे. त्यावरून त्या काळचीं कांहीं राज्यें लोकसत्ताक होतीं असें अनुमान.

२५ कृषिकर्म कसें होतें याबद्दलची माहिती. सि.कौ. तील २१३० सूत्राखालीं दिलेल्या ' द्वितीयाकरोति, तृतीयाकरोति व शम्बाकरोति' या शब्दांवरून निघणारीं अनुमानें.

२६ सि. कौ. तील १८३८, १८३९ या सूत्रांत उंची, लांबी, रुंदी मोजण्याचीं व धान्य, तेल मोजण्याचीं मापें, वजनें, मानें दिलेलीं आहेत. १६८२ सूत्रांत निष्कादि गणांत निष्क, पण वगैरे मानें व नाणीं दिलेलीं आहेत.

२७ १७२९ व १७३० या सूत्रांत फूलझाडें व फळझाडें यांची कापणी कशी करावी याबद्दल माहिती.

२८ १७३३ सूत्रांत पाळीव जनावरांस कोणत्या वेळीं काय चारलें पाहिजे याचे नियम दिसतात.

२९ २१३२ सूत्राखालीं दिलेल्या 'निष्पत्राकरोति' व 'सपत्राकरोति' या उदाहरणांवरून शिकारी लोक शिकार कशी करीत याची माहिती.

३० १५८५ सूत्रांत पक्षी, मत्स्य, मृग यांना मारून उपजीविका करणारे लोक दिलेले आहेत.

३१ १८१५ सूत्रांतील 'आगवीनः' हा शब्द हल्लीं व्यवहारांत असलेल्या अर्धेलीनें जनावर दुसऱ्याकडे राखणीस देण्याच्या वहिवाटीचें मूळ बीज सांगतो.

३२ १५८० व १५८१ या सूत्रांत सावकारानें ऋणकोला दिलेल्या मूळ रकमेवर व्याज कसें आकारलें जात होतें याची माहिती होते.

३३ १७१३, १७१४, १७१५ हीं सूत्रें कोणत्याही जिनसाची विक्री करून आलेल्या नफ्याला त्यावेळीं काय नांवें होतीं हें दाखवितात. राजानें बाजारपेठा व क्रयविक्रयस्थानें यांवर बसविणेच्या कराला अवक्रय असें नांव होतें असें दिसतें.

३४ १६०१, १६०२, १६०३ हीं सूत्रें पेठेंत व्यापाऱ्यांनीं कांहीं नियमित वस्तूंचीच नियमित विक्री करावी असा त्यावेळीं निर्बंध असावा असें सुचवितात.

३५ २०५४ व २०५५ हीं सूत्रें उदरनिर्वाहाकरितां देवांचीं व थोर लोकांचीं चित्रें व प्रतिमा करून तीं लोकांस दाखवून निर्वाह करणारे लोक त्यावेळीं होते. इतकेंच नव्हे परंतु रस्त्याचे नकाशेही विक्रीकरितां बाजारांतून ठेवलेले असत असें दाखवितात.

३६ १६२२ सूत्राखालील 'व्रातीनः' हा शब्द पाणिनीच्या वेळीं उद्योग करून उदरनिर्वाह करणाऱ्या लोकांचे दोन वर्ग होते असें सुचवितो. शरीरकष्ट करून निर्वाह करणारा व बुद्धिवैभवानें निर्वाह करणारा असे ते दोन वर्ग होत.

३७ १८२२ सूत्रांतील 'साप्तपदीनम्' हा व १८२१ सूत्रांतील 'शालीनः' हा शब्द यावरून निघणारीं अनुमानें.

३८ १८७० सूत्रांत 'तन्त्र' हा शब्द कोष्ट्याच्या मागाला लावीत असें दिसतें. १८०९ सूत्रही वस्त्राच्या लांबीसंबंधानें पाहण्यासारखें आहे.

३९ १७४८ सूत्रावरून व्याधिशास्त्रज्ञ वैद्यांचें शास्त्रीय ज्ञान कोणत्या प्रकारचें होतें, हें दिसतें.

४० सि. कौ. तील १५५६ या सूत्राच्या अधिकाराखालीं येणारे आकर्ष, श्वगण हे शब्द, १५६२ सूत्रांतील वेतनादिगण, १५६३ सूत्रांतील वस्न, क्रय, विक्रय हे शब्द व १५६४ सूत्रांतील आयुध हा शब्द त्यावेळच्या लोकांच्या निर्वाहाचीं साधनें दाखविणारे आहेत.

४१ १६०५, १६०६ हीं सूत्रें त्यावेळीं असलेल्या शिल्पशास्त्राची स्थिति दाखवितात.

४२ १५८६ सूत्र त्यावेळीं वाटमारे, रस्ता लुटणारे व घरांवर दरोडा घालणारे लोक होते याबद्दलचें प्रमाण आहे.

४३ १५८८ सूत्र, मेलेल्या मनुष्याबद्दल शोक करावयाचा तर 'आक्रंद' नांवाच्या नेमलेल्या स्थलीं जाऊन शोक करावा असा नियम असल्याचें दाखवितें.

४४ १५३१ सूत्र त्यावेळीं सोन्याचीं नाणीं प्रचारांत होतीं हें दाखवितें. शिवाय 'कंस' नांवाचें काश धातूचें नाणेंही त्यावेळीं प्रचारांत होतें असें १५४७ सूत्रानें बनविलेल्या 'कंसीयम्' या रूपावरून दिसतें.

४५ सि. कौ.तील तद्धित प्रकरणांत, अपत्यें कोणत्या प्रकारचीं व्याकरण-दृष्ट्या घ्यावींत हें व गोत्रप्रर्तक पुरुष व स्त्रिया, ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र या जातींपैकीं होते असें दाखविलें आहे.

४६ १२६१, १२६२, १२६३ हीं सूत्रें देशांतील लोकांमध्यें देशाभिमान किती होता हें दाखवितात.

४७ १६६२ या सूत्रांतील राजन्यादिगण व १२६३ सूत्रांतील भौरिक्यादि व ऐषुकार्यादि गण यांत दाखविलेले लोक अत्यंत देशाभिमानी होते असें दिसतें.

४८ राजन्यादि गणांतील जालन्धरायण याचें जालन्धर या पंजाबांतील प्रांताशीं व ऐषुकारी गणांतील सारस्यायन किंवा सारसायन याचें आशि-यामायनरमधील साऱ्यासिन या शब्दाशीं व खाडायन याचें खाल्डियन् या शब्दाशीं वर्णसादृश्य दिसतें.

४९ ९१४ **शूद्राणामनिरवसितानाम्** २।४।१० या सूत्रांतील 'अनिरवसिता-नाम्' या पदावरून शूद्रांमध्यें दोन भेद होते असे दिसतें. ते भेद असे— १ निरवसित, २ अनिरवसित—हे होत. पाणिनीनें शूद्र प्रभृति किंवा शूद्रादिगण मानलेला असल्याचें गणपाठावरून दिसत नाहीं. त्यावरून 'निरवसित'व'अनिरवसित' शूद्र कोणते व कसें ओळखावे याबद्दल पाणि-नीच्या वेळीं निश्चित नियम झालेले होते असें दिसत नाहीं. शूद्रांपैकीं कांहींना अस्पृश्य मानिलेले होते असें अष्टाध्यायीवरून दिसत नाहीं, असें अनुमान निघतें.

## धातुपाठ.

धातुपाठ या प्रकरणाचा कर्ता पाणिनि हाच होता. दुसरा कोणी पूर्वाचार्य त्याचा कर्ता नव्हता असें आमचें मत आहे. त्याचप्रमाणें:—

१ धातुपाठांतील धातूंच्या पोटविभागांचें वर्णन—द्युतादय उदात्ताअनुदात्तेत आत्मनेभाषाः, ज्वरादय उदात्ता उदात्तेत परस्मैभाषाः, उदात्तौ सरितेतौ उभयतोभाषौ, स्कन्दादय अनुदात्ता उदात्तेतः परस्मैभाषाः—वगैरेसारख्या शब्दांनीं केलें आहे. या वर्णनावरून होणारीं अनुमानें.

२ अनुदात्तेत्त्वनिमित्तं आत्मनेपदं अनित्यम्– वगैरे सारख्या मतांची उत्पत्ति होण्यास उदात्ताः, उदात्तेतः, अनुदात्ताः, अनुदात्तेतः, वगैरे कारणें उत्पन्न झालीं, म्हणून धातुपाठकर्त्यानें परस्मैभाषाः आत्मनेभाषाः, परस्मैपदिनः असे शब्द घातले.

३ अष्टाध्यायींतील १।३।१२ **अनुदात्तङित आत्मनेपदम्** व ३।२।१४९ **अनुदात्तेतश्च हलादेः** वगैरे सूत्रांच्या कर्त्यानेंच धातुपाठ बनविला असें अनुमान.

४ धातुपाठांतील धात्वन्तर, इत् संज्ञक वर्णान्तर, अर्थान्तर वगैरे दाखविणेकरितां घातलेल्या चकार, अपि, इतरे, अन्ये, केचित्, एके, वगैरे शब्दांचें स्पष्टीकरण.

५ पूर्वीच्या पुष्कळ निरनिराळ्या आचार्यांकडून निरनिराळे थोडेथोडे धातु व त्यांचे अर्थ पाणिनीस मिळाले. ते सर्व संकलित करून त्यावेळच्या कालास व वाङ्मयांतील प्रयोगांस जुळतील असे धातु, अर्थ, इत्संज्ञकवर्ण, वगैरे देऊन मतान्तरेंही समाविष्ट करून धातुपाठ बनविण्याचें श्रेय पाणिनीलाच आहे.

६ धातुपाठांत आत्मनेभाष व परस्मैभाष असे शब्द आहेत व तसे शब्द अष्टाध्यायींत नाहींत. यावरून धातुपाठाचा कर्ता कोणी पूर्वाचार्य होता असें म्हणतां येत नाहीं.

७ अष्टाध्यायींतील ३।१।५७ व ३।१।५८ ( **जॄस्तम्भुम्रुचुम्लुचु––** ) या सूत्रांचा विचार.

८ धातुपाठाच्या कर्त्यानें धातुपाठांत धातूंची रचना अशी केली आहे कीं अष्टाध्यायींतील सूत्रांच्या उपयोगाकरतांच ती तशी केली असें दिसून येतें.

९ अष्टाध्यायींतील सूत्रें ७।३।७४, ३।२।१४१ यांतील शमादिगण, ७।३।८०, यांतील प्वादिगण, ७।१।५९ यांतील मुचादिगण, ७।४।७६ यांतील भृ वगैरे तीन धातू, ७।२।७६ यांतील रुदादिगण, १।२।१ यांतील कुटादिगण वगैरे सूत्रांतील गणसमुदाय अशा तऱ्हेचा दिसतो कीं धातुपाठांतील त्या अन्तर्गणांतील धातु पाहिले असतां अष्टाध्यायी धातुपाठाकरितां व धातुपाठ अष्टाध्यायीकरितां एकाच आचार्यानें एकाच हेतूनें लिहिले असले पाहिजेत असें स्पष्ट दिसतें. याबद्दलचा सूत्रविचार.

१० धातुपाठांतील धातूंच्या आदि असलेले टु, डु, व ञि हे इत्संज्ञक वर्ण धातुपाठकर्त्यानें भविष्यत्कालांत पाणिनीनें करण्याच्या अष्टाध्यायींतील

सूत्राकरितां अगाऊच करून ठेविले अशा विचाराच्या निषेधार्थ केलेलें विवेचन.

मि. आय्. एस्. पावटे, एम्. ए., एलूएल्. बी., वकील हुबळी यांनीं इंग्रजी भाषेंत Structure of the Ashtadhyayi नांवाचा निबंध १९३४ मध्यें लिहिला. त्यांतील कांहीं मुख्य विधानें मला पसंत न पडल्यामुळें त्याबद्दलचें माझें मत मीं लिहून तें प्रस्तावनेस जोडलें आहे.

मि. पावटे यांचें मत आहे तें असें:—

१ 'गणपाठ' व संस्कृत वाङ्मयांतील पुष्कळ शब्द अव्युत्पन्न होते असें पाणिनीचें मत होतें.

२ 'उणादि प्रकरणाचा' कर्ता पाणिनि किंवा त्याचा कोणीहि अनुयायी नसून त्याचा कर्ता पाणिनीच्या वरील मतास विरुद्ध असलेल्या कोणीतरी दुसऱ्या आचार्यानें तें प्रकरण केलें.

३ अष्टाध्यायींतील ३।१।१३४ **नन्दिग्रहिपचादि.** व ३।३।१०४ **षिद्भिदादिभ्योऽङ्** हीं दोन सूत्रें धातुपाठ व गणपाठ यांचा कर्ता पाणिनि नव्हे या म्हणण्यास पुष्टिदायक आहेत.

वरील विधानें मला पसंत नसल्यामुळें मी या विधानांचें खंडन करण्याकरितां विवेचन व कारणें दिलीं आहेत तीं अशीं:—

## गणपाठ.

१ पाणिनीच्या कालापूर्वीं वैदिक व लौकिक संस्कृतांतील धातूंची स्थिति.

२ प्राच्य व उदीच्य असे संस्कृत व्याकरणकारांमधील दोन भेद.

३ पाणिनि हा वैदिक व लौकिक संस्कृतांतील शब्द व्युत्पन्न आहेत असें मानणाऱ्यांपैकीं होता. म्हणूनच त्यानें ३।१।१३४ व ३।३।१०४ हीं सूत्रें मार्गदर्शक म्हणून करून आपल्या हयातींत आपल्या शिष्यांकडून किंवा सतीर्थ्यांकडून 'उणादि प्रत्ययप्रकरण' करविलें.

४ 'गणपाठ' प्रकरणाचा कर्ता पाणिनीच आहे.

५ 'प्रातिपदिक' शब्दाचा अर्थ.

६ 'गणपाठांतील' शब्द, आर्यावर्तांतील देश, शहरें, ग्राम, अरण्यें, गोत्रप्रवर्तक पुरुष, क्षत्रियवाचक शब्द, लोकांच्या निर्वाहाचे पदार्थ वगैरे अर्थांचे वाचक आहेत.

७ गणपाठाचा कर्ता पाणिनिच होता याबद्दलचीं माझ्या मतें असलेलीं अष्टाध्यायींतील प्रमाणें १०.

८ अष्टाध्यायी, गणपाठ व गणसूत्रें यांचा एकमेकांशीं असलेला संबंध. पाणिनीला अष्टाध्यायी लिहितांना कोणतीं साधनें पूर्वाचार्यांकडून मिळालीं त्याबद्दलचें विवेचन.

९ अष्टाध्यायींतील ५।१।२ **उगवादिभ्योयत्** व ५।१।३ **कम्बलाच्च संज्ञायाम्** या दोन सूत्रांचें माझ्या मताप्रमाणें विवेचन.

१० अष्टाध्यायींतील १।१।२७ **सर्वादीनि सर्वनामानि** येथून सर्वनामाच्या प्रत्ययासंबंधानें विधान करणाऱ्या सूत्रांचा विचार.

११ मि. पावटे यांनीं १।१।३४ **पूर्वपरावर**......या सूत्रावरील वार्तिक व महाभाष्य यांतील वचनांचें उद्धरण आपल्या Structure of the Ashtadhyayi या निबंधांत केलें आहे. त्यांचा अर्थ पावटे म्हणतात त्याप्रमाणें होत नाहीं.

१२ 'उपदेशः' या पदानें पाणिनी हाच आचार्य घ्यावयाचा आहे, याबद्दलचें विवेचन, व त्या पदानें पाणिनीच्या पूर्वी होऊन गेलेल्या आचार्यांचें ग्रहण करावें या मताचें खंडन.

डेक्कन जिमखाना
पुणें नं. ४
द. मो. रानडे
यांचा बंगला

**वासुदेव नारायण गोखले.**

# प्रस्तावना.

## वर्णसमाम्नाय

पाणिनीनें केलेल्या–अष्टाध्यायी–नांवाच्या संस्कृत भाषेच्या व्याकरणशास्त्राच्या आरंभाला–अइउण्, ऋलक्–वगैरे १४ सूत्रें दिलेलीं आहेत. त्या सूत्रांना वर्णसमाम्नाय असें नांव आहे.

कोणतीही भाषा वर्णाशिवाय असूं शकत नाहीं. जगांतील वस्तु इंद्रियांनीं ज्ञेय व अज्ञेय अशा भेदांनीं दोन प्रकारच्या आहेत. त्यांचें, शक्य होईल त्या रीतीनें, ज्ञान करून घेण्याकरितां व देण्याकरितां त्यांना कांहींतरी नांवें देणें क्रमप्राप्त आहे. त्यांना दिलेलीं तीं नांवें त्या त्या वस्तूंमध्यें असलेल्या कांहीं गुणांना अनुसरून दिलेलीं असतात, असें सर्व प्राचीन भाषांच्या अभ्यासावरून दिसून येईल. तीं नांवें म्हणजे एक किंवा अधिक वर्णांचा समुदाय असतो. जगांतील हजारों वस्तूंचीं नांवें याप्रमाणें वर्णांनीं युक्त असतात. अशीं नांवें मिळून भाषा बनते.

एकच भाषा दोन प्रकारांनीं व्यवहारांत वावरते. ते प्रकार असे–१ बोलण्याची भाषा, २ लिहिण्याची भाषा.

बोलण्याच्या भाषेला निरनिराळ्या वर्णांच्या उच्चाराची जरूरी आहे. वर्णांचे उच्चार तोंडाच्या निरनिराळ्या भागांतून होत असतात. म्हणून कोणते वर्ण मुखाच्या कोणत्या भागांतून उत्पन्न होतात याची माहिती असावी लागते. दुसऱ्या कांहीं वर्णांचा उच्चार मुख व नासिका या स्थानांच्या साह्यानें होतो. वर्णांपैकीं कांहीं वर्णांना स्वर किंवा अच् असें म्हणतात व दुसऱ्या कांहीं वर्णांना व्यंजनें किंवा हल् असें नांव आहे.

वक्त्यानें उच्चारलेल्या वाक्यांतील कोणत्या वर्णावर, त्याच्या मनोदयाप्रमाणें, किती जोर द्यावा म्हणजे त्याचा इष्टार्थ ऐकणाऱ्यास स्पष्ट रीतीनें कळेल अशाकरितां कांहीं उपाय योजावे लागतात.

फार प्राचीनतम कालीं बाहेरून येऊन, आर्यलोकांनीं या देशांत वसाहती केल्या तेव्हांपासून या देशाला आर्यावर्त–असें नांव पडलें, असें कांहीं विद्वान् लोक म्हणतात व दुसरे कांहीं विद्वान् ते लोक मूळचे येथलेच आहेत असें म्हणतात. तें कांहींही असो. या देशांत आर्यलोक रहात होते व त्यांची भाषा संस्कृत या नांवाची होती. या गोष्टी त्या दोन प्रकारच्या विद्वानांस मान्य आहेत.

वेदकालीं व त्या कालाच्या पूर्वींही आर्यलोकांमध्यें संस्कृत भाषा दोन प्रकारांची असावी. वेदकालाच्या फार पूर्वीं आर्यलोकांचे प्राचीनतम पूर्वज देव व दैत्य

वगैरे नांवांनीं प्रसिद्ध होते. त्यांच्यावेळीं जी संस्कृत भाषा वापरली जात असे त्या भाषेसंबंधाचे व्याकरणशास्त्राचे नियम फार शिथिल होते. ते इतके शिथिल होते कीं, त्यासंबंधानें पाणिनीला ३३९८,३४००,३४०१,(सि.कौ.) वगैरेसारखीं सूत्रें बनवावीं लागलीं, इतकेंच नव्हे तर कोणत्याही कालाचा बोध करून द्यावयाचा असला तरी लङ्, लुङ् व लिट्–या भूतकालवाचक लकारांचा उपयोग करीत असत ( ३४२३ सू. सि. कौ. ) असें पाणिनीच्या या सूत्रावरून दिसतें. ती भाषा देवादि पूज्य पूर्वजांची असल्यामुळें, देवकालानंतरच्या आर्यऋषींनाही तीच तसली भाषा वेदांमध्यें वापरण्याइतका पूज्यभाव व अलौकिकता त्या भाषेसंबंधानें त्यांच्या मनांत उत्पन्न झाली, म्हणून वेदांतील मंत्रद्रष्ट्या ऋषींनीं त्याच भाषेंत देवादिकांचीं स्तुतिस्तोत्रें केलीं.

यावरून तीच भाषा ते ऋषि व्यवहारांत उपयोजीत होते असें म्हणतां येत नाहीं. ते ऋषि व त्या कालचे इतर आर्यलोक, जास्त व्याकरणशुद्ध संस्कृत भाषा वापरीत होते असें म्हणण्यास हरकत नाहीं. पाणिनीनें आपल्या सूत्रांत त्याच्या पूर्वीं होऊन गेलेल्या पुष्कळ व्याकरणशास्त्र्यांचे निर्देश केलेले आहेत. ( ७७, ८८, ९९, १६९, २४७६ सि. कौ. वगैरे सूत्रें पहावीं ). पाणिनीनें केलेल्या या व इतर उल्लेखांवरून पाणिनीच्या पूर्वीं संस्कृत भाषेला नियमबद्ध करणारे पुष्कळ वैयाकरण होऊन गेले होते व त्यांनीं त्या भाषेच्या शुद्धीकरितां बरेच ग्रंथ केलेले होते असें दिसतें. व्यवहारांत उपयोगी असणाऱ्या संस्कृत भाषेच्या शुद्धीकरितां पाणिनीच्या पूर्वीं होऊन गेलेल्या मुनींनीं ज्याप्रमाणें यत्न केले, त्याप्रमाणेंच त्यांनीं देवादिकांच्या भाषेची शुद्धि करून त्या शुद्ध केलेल्या भाषेंत वेद केले नाहींत याचें कारण, देवांच्या भाषेबद्दलची त्यांची निरतिशय श्रद्धा–हेंच असावें असें वाटतें. पाणिनीच्या पूर्वीं व त्याच्या कालापासून आजपावेतों यच्चयावत् वेदाध्ययन करणारे लोक गुरूच्या मुखांतून वेदांतील वर्ण जसे निघतात त्याचप्रमाणें पठन करीत आले, याचें कारणही त्यांची वेदावरील निरतिशय श्रद्धा व पूज्यभाव हेंच होय. गुरूंनीं तोंडानें वेदादिकांचें पठन करावयाचें व शिष्यांनीं अनुपठन करावयाचें, या त्यांच्या पूर्वापार चालीवरून पाणिनीच्या पूर्वीं लिहिण्याकरितां लिपि नव्हती व लिहिलेले ग्रंथही नव्हते असें अनुमान करणें चुकीचें आहे.

लिहिण्यास अवश्यक असलेले अ, इ–वगैरे स्वर व क्, ख्, वगैरे व्यंजनें पाणिनीच्या पूर्वींही अस्तित्वांत होतीं. पाणिनीनें फक्त ते स्वर व व्यंजनें अशा तऱ्हेच्या सूत्रांत रचलीं कीं, त्यांचा उपयोग त्यानें केलेल्या अष्टाध्यायी नांवाच्या व्याकरणशास्त्रांत, त्याला पाहिजे त्या रीतीनें सुलभपणानें व्हावा. पाणिनीनें रचलेल्या या चौदा सूत्रांच्या समुदायास वर्णसमाम्नाय असें म्हणतात. यावरून पाणिनीनेंच प्रथम तीं अक्षरें किंवा वर्ण, लिपिकरितां नवीनच शोधून काढले असें म्हणतां येत नाहीं. अक्षरांचीं हीं चिन्हें, लिहिण्याकरितां काढलीं आहेत, असें पाणिनीनें कुठेंही

प्रतिपादिलें नाहीं. पाणिनीच्या पूर्वीच्या व्याकरणकारांनींही हीं अक्षरें फक्त तोंडानें उच्चारण्याकरितांच आहेत असें म्हटलेलें नाहीं.

पाणिनीनें पठन केलेल्या धातुपाठांतील धातु पाणिनीनें शोधून काढले व बनविले असें नसून ते धातु, त्याच्यापूर्वी म्हणजे वेदारंभाच्याही पूर्वी होऊन गेलेल्या महर्षींनीं बनविले होते असें म्हणणें जास्त सयुक्तिक आहे. पाणिनीनें जें केलें तें इतकेंच कीं, त्यानें त्याच्या काळास व रूढीस अनुसरून त्या धातूंच्या अर्थाच्या स्पष्टीकरणार्थ नवीन शब्दरचना करून धातुपाठ बनविला. **'लिख अक्षरविन्यासे'** हा सहाव्या गणांतील धातु व लिप्, लिख् हे धातु पाणिनीनें लिहिणें हा अर्थ दाखविण्याकरितां नवीन बनविले असें प्राचीन व अर्वाचीन व्याकरणकारांपैकीं कोणींही सांगितलेलें नाहीं. त्याचप्रमाणें लिहिलेला लेख वाचणें–या अर्थीं रूढ असलेल्या **'वच्'** परिभाषणें–या 'अदादि व चुरादि'–गणांतील धातूसंबंधानेंही तो पाणिनीनें नवीन बनविला असें कोणत्याही वैयाकरणानें सांगितलेलें नाहीं. **'अक्षरम्–व वर्णः'**—हे अक्षरार्थी शब्दही 'न+क्षरति व वर्णयति'–या प्रयोगांतील 'क्षर् संचलने' व 'वर्ण वर्णक्रिया विस्तारगुणवचनेषु' या धातूंपासून झालेले आहेत. 'लिख्, वच्, क्षर् व वर्ण्'–हे धातु, धातुपाठांत पाणिनीच्या फार पूर्वींपासून आहेत. वरील विवेचनावरून लेखनकला पाणिनीच्या फार पूर्वींपासून हिंदुस्थानांत प्रचारांत होती असें दिसून येईल.

वरील प्रमाणें सोडून अष्टाध्यायींत दुसरींही कांहीं प्रमाणें, पाणिनीच्या पूर्वी लेखनकला अस्तित्वांत होती, इतकेंच नव्हे तर निरनिराळ्या विषयांवर लिहिलेले ग्रंथही होते, असें दाखविणारीं सूत्रें पाणिनीनें रचलीं आहेत. तीं सूत्रें अशीं—

**१२६९ तदधीते तद्वेद** ४।२।५९ या सूत्राच्या अधिकाराच्या **१२७९ क्रतूक्थादि सूत्रान्ताट्ठक्** ४।२।६० या सूत्रापासून १२७८ सूत्राच्या अखेरपर्यंतचीं सूत्रें; या सूत्रांत अग्निष्टोम–वाजपेय–सारख्या यज्ञांची माहिती सांगणारे ग्रंथ, उक्थादि सामगायनासंबंधाचे ग्रंथ, सूत्र–शब्दान्त सूत्रबद्ध ग्रंथ, क्रमादिगणांतील ( १२७१ सू. ) क्रम, पद, शिक्षा, मीमांसा या विषयांचें प्रतिपादन करणारे ग्रंथ, वसन्तादिगणांतील ( १२७३ सू. ) वसन्त वगैरेसारख्या ऋतूसंबंधीं विवेचन करणारे ग्रंथ या व आणखी बऱ्याच ग्रंथांचे निर्देश पाणिनीनेंच केले आहेत. त्याचप्रमाणें **१४४५ तस्य व्याख्यान इतिच व्याख्यातव्यनाम्नः** ४।३।६६ या कौमुदींतील सूत्रापासून १४५२ सूत्रापर्यंत **'तस्य व्याख्यानः'**–या पदांची अनुवृत्ति त्यांतील प्रत्येक सूत्रांत होते. 'तस्य व्याख्यानः'— या पदांचा, भट्टोजी दीक्षितांनीं कौमुदींत केलेल्या विवेचनाप्रमाणें त्या विषयाचें प्रतिपादन करणारा ग्रंथ असा अर्थ होतो. पाणिनीच्या काळापूर्वी हे सर्व ग्रंथ अस्तित्वांत होते, म्हणूनच त्याला त्यांचा नामनिर्देश करून उल्लेख करतां आला. यावरून पाणिनीच्या पूर्वी लेखनकला हिंदुस्थानांत

होती या गोष्टीबद्दल कोणाच्याहि मनांत शंका राहण्याचें कारण नाहीं. (वरील सूत्रांचे आदिक्रमांक सि. कौ. तील आहेत. )

पाणिनीनें अष्टाध्यायीच्या आरंभीं अक्षर समाम्नाय या नांवाखालीं संस्कृत भाषेंतील मूळाक्षरें दिलीं आहेत. अ, इ, उ, ऋ–वगैरे अच्–स्वर व क्, ख्–वगैरे हल्–व्यंजनें, हे उच्चारार्थ वर्ण व त्यांचे लेखनार्थ असलेलीं चिन्हें, हीं जरी फार प्राचीन कालापासून उपयोगांत होतीं, तरी तीं अइउण्, ऋलक्–वगैरे सारख्या विशिष्ट प्रत्याहार स्वरूपांत पाणिनीला मिळालीं. ही अलौकिक गोष्ट श्री भगवान् शंकर यांच्या कृपाप्रसादानें घडून आली असें गुणाढ्य कवीनें आपल्या कथासरित्-सागर नांवाच्या ग्रंथांत वर्णिलें आहे. हीं कथासरित्सागरांतील कथा विश्वसनीय मानण्यासारखी आहे. याचें कारण असें कीं, प्रत्याहाराची कल्पना, पाणिनीला अक्षरसमाम्नायाचीं सूत्रें भगवान् शंकरापासून मिळेपर्यंत, कोणत्याही व्याकरण-शास्त्र्याला अज्ञेय अशीच होती. त्या कल्पनेला याप्रमाणें अज्ञेयता व अकल्पनीयता आल्यामुळें पाणिनीसारख्या मनुष्यानें ती नवीन शोधून काढली या म्हणण्यावर लोकांचा विश्वास न बसतां त्या कल्पनेचा उगम भगवान् शंकरासारख्या अद्वितीय बुद्धिमत्तेच्या देवतेपासून झाला या म्हणण्यावर लोकांचा विश्वास ताबडतोब बसला, असें म्हणणें जास्त सयुक्तिक आहे.

## अष्टाध्यायी.

हा ग्रंथ पाणिनीनें केला हें सर्वांस विदित आहे. या ग्रंथांत आठ अध्याय असल्यामुळें याला अष्टाध्यायी असें नांव पडलें. येथें अष्टाध्याय हा आकारान्त द्विगु समास असल्यामुळें–'अकारान्तोत्तर–पदो द्विगुः स्त्रियामिष्टः' या कौमुदींतील ८२१ सूत्राखालच्या वार्तिकामुळें याला स्त्रीत्व येऊन–अष्टाध्यायी असा शब्द बनला आहे.

## अष्टाध्यायीच्या पूर्वी संस्कृत भाषेची स्थिति.

आर्यांतील देवदैत्यादि लोकांचें प्राबल्य लोकांत होतें. तेव्हां इतर आर्यांतील मानववंशांतील लोकांत हल्लींच्या सुसंस्कृत भाषेचें मूळरूप अस्तित्वांत असलें पाहिजे. मानववंशांतील आर्यलोक बुद्धिमान् व प्रगमनशील असल्यामुळें त्यांच्या इतर व्यव-सायांबरोबर संस्कृत भाषेचीही वाढ होऊं लागली होती. वेदांतील भाषेला एक प्रका-रचें पावित्र्य मानिलें गेलें होतें, म्हणून यज्ञादि धार्मिक विधींच्या वेळीं म्हटल्या जाणाऱ्या वैदिक मंत्रांशिवाय ती भाषा इतर व्यवहारांत वापरली जात नव्हती. तरी त्या भाषेंतील 'उदात्त अनुदात्तादि' स्वरांचें व तींतील वर्णांच्या योग्य उच्चारांचें ज्ञान होण्याकरितां त्यावेळच्या विद्वान् आर्यांनीं प्रातिशाख्य, शिक्षा–वगैरेसारखे ग्रंथ तयार केले होते; इतकेंच नव्हे तर वैदिक–संस्कृत व व्यवहारांतील संस्कृत–यांतील क्रिया-पदांचें मूळ स्वरूप दाखविणारे धातूही त्यांनीं ठरविले होते व व्याकरणाचे नियम

ही केलेले होते. कारण व्याकरणाचे नियम करणाऱ्या पुष्कळ मुनींचे उल्लेख पाणिनीनें आपल्या अष्टाध्यायींत केलेले आहेत. 'उणादि प्रत्ययप्रकरण' पाणिनीच्या पूर्वी तयार झालेलें नव्हतें. ज्या वाङ्मयाच्या अभ्यासानें पाणिनीनें 'सुबन्त तिङन्ता' दिरूपें कायम करून सूत्ररचना केली तें वाङ्मय त्याच्या कालाच्या पूर्वीच तयार होऊन राहिलें असलें पाहिजे. तद्धित प्रत्ययान्त रूपें कायम करण्यास लागणारी, त्यावेळीं असलेल्या प्रांतांच्या व देशांतील राजांच्या व ब्राह्मणादि चातुर्वर्ण्य लोकांच्या गोत्रादिकांची लेखी माहिती, उपलब्ध असली पाहिजे. 'तद्धित प्रत्ययप्रकरण' म्हणजे आर्यलोकांच्या व्यवहारांची संग्रहदीपिका आहे. व्यवहाराला आवश्यक असणारे शब्द पाणिनीच्याही पूर्वी अस्तित्वांत असले पाहिजेत.

## अष्टाध्यायीची मांडणी.

अष्टाध्यायींत आठ अध्याय आहेत हें वर सांगितलें आहेच. या आठ अध्यायांत प्रतिपादन केलेले मुख्य विषय आहेत ते हे– १ संज्ञा २ संधि ३ सुप्प्रत्यय ४ तिङ्प्रत्यय ५ तद्धितप्रत्यय ६ कृत्प्रत्यय ७ स्त्रीलिंगीप्रत्यय ८ अव्ययें ९ कारकें १० सभास. मराठी वगैरे प्रचलित भाषांच्या हल्लीं प्रसिद्ध असलेल्या व्याकरणाप्रमाणें, नाम, सर्वनाम, विशेषण, क्रियाविशेषण, क्रियापद–या प्रकारची मांडणी अष्टाध्यायींत दिसत नाहीं. याचा अर्थ अष्टाध्यायींत या शब्दांचा विचार अगदींच केलेला नाहीं, असें नाहीं. त्या शब्दांच्या व्याख्या वगैरे देऊन त्यासंबंधीं ऊहापोह करणें अनवश्यक असें पाणिनीचें मत असावें.

पाणिनीनें अष्टाध्यायींतील सूत्रें करतांना– '**पूर्वपर नित्यान्तरङ्गापवादानामुत्तरोत्तरं बलीयः**:–ही परिभाषा डोळ्यापुढें ठेवून सूत्रें व अध्याय रचलेआहेत. 'पूर्व परिनित्य' ....ही परिभाषा-परिशिष्टांत दिली आहे. या परिभाषेनें पूर्वकार्यापेक्षां पर कार्य बलवत्तर, परापेक्षां नित्य, नित्यापेक्षां अन्तरङ्ग व अन्तरङ्गापेक्षां अपवाद, बलवत्तर असतात, असें ठरविलें आहे. या पांच कार्यांपैकीं पूर्वकार्य अष्टाध्यायींतील कोणत्या अध्यायांत, कोणत्या स्थलीं व कोणत्या शब्दांनीं घालावयाचें व त्याहून बलवत्तर असें–परकार्य त्यानंतर कोठें व कसें घालावें याबद्दल पूर्ण विचार करून, पाणिनीनें पूर्व व पर–कार्यें त्या त्या स्थलीं घालून जी सूत्ररचना व अध्यायरचना केली त्याबद्दल पाणिनीनंतरच्या कात्यायन–पतञ्जलिप्रभृति वैयाकरणांच्या तोंडून प्रशंसावचनेंच ऐकूं येतात. पूर्व व पर–कार्यांचीं उदाहरणें कौमुदींतील २२७ सुत्राखालीं '**इनादीन् बाधित्वा परत्वात्जरस्**'–या शब्दांत व २७० सूत्राखालीं– '**इहपरत्वात् आटा नुड्बाध्यते** या शब्दांत सांपडतात. या प्रकारचीं उदाहरणें कौमुदींत सर्वत्र आढळतात.

अष्टाध्यायींतील सूत्रांची व अध्यायांची रचना–पूर्वपरनित्या...' ही परिभाषा पुढें धरून जरी पाणिनीनें केली तरी दुसऱ्या कांहीं कार्यांसंबंधानें या परिभाषेच्या

विरुद्ध स्थिति दिसल्यामुळें त्या विशिष्ट कार्यासंबंधानें निराळी दिशा ठरविणें त्याला भाग पडलें. ही निराळी दिशा त्यानें खालीं लिहिल्याप्रमाणें स्वीकारली.

१ अष्टाध्यायीमध्यें त्यानें दोन भाग केले त्यांपैकीं पहिल्या भागांत पहिले सात अध्याय व आठव्या अध्यायाचा पहिला पाद–घालून त्या भागाला 'सपाद सप्ताध्यायी'–असें नांव दिलें व दुसऱ्या भागांत आठव्या अध्यायाचे शेवटचे तीन पाद घालून त्या भागाला–'त्रिपादी' असें नांव दिलें.

२ ज्या विशिष्ट कार्यांकरितां अष्टाध्यायीमध्यें असे दोन भाग केले तीं कार्यें 'त्रिपादींत' समाविष्ट केलीं.

३ त्रिपादीच्या आरंभाचें सूत्र–'**पूर्वत्रासिद्धम्**'–अशा शब्दांनीं करून त्या शब्दांचा अर्थ–'सपादसप्ताध्यायींप्रति त्रिपादी असिद्धा, त्रिपाद्यामपि पूर्वप्रति परं शास्त्रं असिद्धं स्यात्'—असा केला आहे. या सूत्राचा मराठींत स्पष्टार्थ असा–सपाद सप्ताध्यायींतील कोणत्याही कार्याला त्रिपादींतील कोणतेंही कार्य असिद्ध आहे. असिद्ध आहे म्हणजे दिसत नाहीं. त्रिपादींतील कार्य झालें असलें तरी सपादसप्ताध्यायींतील कार्य, त्रिपादींतील कार्य झालें नाहीं असें समजून, प्रवृत्त होतें. याचा पर्यायानें अर्थ असा होतो कीं, त्रिपादींतील कार्य पर असलें तरी तें सपादसप्ताध्यायींतील पूर्वकार्याचा बाध न करितां स्वतःच त्याचेकडून पराजित होतें म्हणजे या सूत्रानें केलेला नियम 'पूर्वपरनित्या....' या परिभाषेनें केलेल्या नियमाच्या अगदीं विरुद्ध आहे. त्रिपादींतील पूर्वसूत्राला उत्तरसूत्र असिद्ध आहे—असा नियमही 'पूर्वत्रासिद्धम्' या सूत्रानें स्थापिला आहे.

अष्टाध्यायींतील सूत्ररचना करण्यामध्यें पाणिनीनें 'इत्–संज्ञा' व त्या संज्ञेवर रचलेले प्रत्याहार शोधून काढण्यांत जी कल्पनाशक्ति दाखविली आहे ती अप्रतिम आहे.

इत्–संज्ञा व प्रत्याहार या साधनांच्या योगानें, अइउण्–वगैरे माहेश्वर सूत्रांतील पाहिजेत तीं अक्षरें अगदीं संक्षिप्त अक्षरांनीं घेऊन त्यांचा उपयोग सूत्रांत करण्यास पाणिनीला त्यांचा फारच उपयोग झाला आहे. याप्रमाणें पाणिनीनें अइउण्–वगैरे १४ सूत्रांतील वर्णसमुदायांत चाळीसपेक्षां जास्त प्रत्याहार साधून त्यांचा उपयोग त्यानें सूत्रांतून केला आहे.

अष्टाध्यायीच्या पहिल्या अध्यायांतील तिसऱ्या पादाच्या आरंभाला पाणिनीनें इत्-संज्ञा विधायक सूत्रें दिलेलीं आहेत. या सूत्रांनीं ठरविलेल्या इत्–संज्ञक वर्णांवरच कौमुदीं-तील परिभाषाप्रकरणांतील पुष्कळ सूत्रांचें कार्यक्षेत्र अवलंबून आहे. त्याप्रमाणेंच 'तद्धित–तिङन्त–कृदन्त–सुबन्त'–प्रकरणांतील गुण–वृद्धि–संप्रसारण–वगैरे कार्यांचें विधान व निषेध त्यावरच अवलंबून आहेत.

पाणिनीनें त्याच त्या शब्दांचा उच्चार सूत्रांतून वारंवार न व्हावा व सूत्रांतील शब्दांचा आटोपशीरपणा, अर्थाला बाध न येईल अशारीतीनें शक्य तितका वाढावा, याकरितां अनुवृत्ति व अपकर्ष या दोन युक्त्या काढल्या आहेत. अनुवृत्ति व अपकर्ष–या शब्दांचे अर्थ अनुक्रमानें अ–परिशिष्ट १६ व १८ येथें दिलेले आहेत. अनुवृत्ति व अपकर्ष या युक्त्या योजावयाच्या असल्यास त्या कांहीं नियमांस अनुसरूनच योजल्या पाहिजेत असें पाणिनीनें ठरविलें असल्याचें दिसतें. दोन किंवा तीन सूत्रांच्या मागें असलेल्या सूत्रांतून कांहीं शब्दांची अनुवृत्ति पुढच्या सूत्रांत करावयाची असल्यास ती मण्डूकप्लुतीनेंच करावी असा नियम असल्यामुळें २।३ सूत्रांच्या पलीकडे अनुवृत्ति होऊं शकत नाहीं म्हणून त्यानें आणखी एक युक्ति योजली आहे. ती युक्ति म्हणजे अधिकारसूत्राची कल्पना होय. ज्या एका शब्दाचा अधिकार किंवा व्याप्ति २ । ३ सूत्रांपेक्षां जास्त सूत्रांत चालावयाची आहे त्या शब्दाला 'अधिकार–अधिकारसूत्र इत्यधिक्रियते' इत्यादि शब्दांनीं त्यानें वर्णिलें आहे. असें कौमुदींतील–९३, १८०, १८१, १८२, २१०, २११ वगैरे सूत्रांवरून दिसतें. अशीं उदाहरणें अष्टाध्यायींत पुष्कळ आहेत.

'अङ्गसंज्ञा, भ'–संज्ञा–वगैरे संज्ञा झाल्यामुळें जीं कार्यें व्हावयाचीं तीं कार्यें '**अङ्गस्य** ६ । ४ । १, **भस्य** ६ । ४ । १२९' अशांसारख्या सूत्रांच्या अधिकाराखालीं झालेलीं अष्टाध्यायींत आढळतील. ज्या एका शब्दाला एकापेक्षां जास्त संज्ञा झाल्यामुळें निरनिराळीं कार्यें होण्याचा संभव आहे तेथें जी संज्ञा पर व अनवकाश असेल तीच संज्ञा व तिचीं कार्यें तेथें व्हावीं असा नियम आहे.

'अर्धमात्रालाघवेन पुत्रोत्सवं मन्यन्ते वैयाकरणाः'— या परिभाषापाठांतील १०४ क्रमांकाच्या परिभाषेला अनुसरूनच पाणिनीनें अष्टाध्यायींतील प्रत्येक सूत्र रचिलें आहे.

अष्टाध्यायींतील सूत्रांची संगति योग्य रीतीनें लागण्याकरितां पाणिनीनें जी नियमावली अंगिकारिलेली असावी असें त्याच्यानंतरच्या वैयाकरणांस वाटलें ती नियमावली 'परिभाषापाठः'– या प्रकरणांत दिलेली आहे. परिभाषापाठांतील परिभाषांच्या मूळ कल्पना पाणिनीच्या पूर्वाचार्यांनींच कल्पिलेल्या असाव्यात. त्या कल्पना हल्लीं दृष्टीस पडणाऱ्या शब्दस्वरूपांत आणण्याचें काम पाणिनीच्या नंतरच्या वैयाकरणांनीं केलेलें असावें असें त्यांच्या भाषापद्धतीवरून दिसतें.

पाणिनीनें 'स्थानिवद्भाव, तदादिविधि, तदन्तविधि' वगैरेसारख्या ज्या युक्त्या योजिल्या आहेत त्याही अद्भुत अशाच आहेत.

वेदांतील भाषेसंबंधानें पाणिनीनें कांहीं नियम केले आहेत. ते लौकिक संस्कृतांत व वैदिकसंस्कृतांत जेथें फरक दृष्टीस पडला त्या स्थळींच केले असल्यामुळें,

त्यासंबंधानें त्यानें निराळा भाग किंवा अध्याय न करितां अष्टाध्यायींतच ते नियम गोंवले आहेत.

पाणिनीनें अष्टाध्यायी रचल्यानंतर, बऱ्याच वर्षांनीं कात्यायनाचीं वार्तिकें झालीं असावींत. ते दोघे एककालीन नव्हते असें अनुमान, कौमुदींतील ५०५ सूत्र व याखालचे–'**यवनाल्लिप्याम्**'–हें वार्तिक–यांवरून, निघण्यासारखें आहे. पाणिनीला, 'यवन'–हा शब्द माहीत होता. इतकेंच नव्हे तर यवनाच्या 'पत्नीला' यवनानी म्हणत होते असेंही त्यास माहीत होतें, म्हणूनच त्यानें ५०५ सूत्रांत यवन-शब्द घालून त्याहून स्त्रीत्व असतांना 'आनुक्–आगम व ङीष्'–प्रत्यय होतात असें विधान केलें आहे. त्या सूत्रांत यवन–हा शब्द पुरुषवाचक असून, इन्द्रवरुण–वगैरे पुरुषवाचक शब्दांहून ज्याप्रमाणें त्याची स्त्री हा अर्थ असतांना आनुक् व ङीष् होतात असें मानणें सयुक्तिक दिसतें. त्याप्रमाणेंच यवन–या पुरुषवाचक शब्दाहूनही–त्याची स्त्री हा अर्थ असतांनाच आनुक् व ङीष् होतात असें मानणें सयुक्तिक आहे. त्या सूत्रांतील हिम व अरण्य–हे शब्द पुरुषवाचक नसल्यानें त्यांची स्थिति पुरुषवाचक अशा त्या सूत्रांतील शब्दांहून भिन्न आहे. म्हणून '**हिमारण्ययोर्महत्वे**'–हें वार्तिक पाणिनीच्या वेळींही महत् हा अर्थ असतांना 'हिमानी व अरण्यानी'–अशीं रूपें होत होतीं असें दाखविणारें आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. परंतु–'**यवनाल्लिप्याम्**'–हें वार्तिक मात्र वर दिलेल्या कारणांकरितां, यवनांची लिपि–ती यवनानी–असा अर्थ पाणिनीच्या वेळीं त्या शब्दाचा होता असें दाखवीत नाहीं असें वाटतें. कात्यायनाचे वेळीं किंवा तो ज्या प्रांतांत रहात होता तेथें यवनानी या शब्दाचा अर्थ यवनांची लिपि असा होता असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. हल्लींच्या संस्कृत वाङ्मयांत यवनी असा शब्द यवनस्त्री याअर्थी वापरलेला आहे.

कात्यायनानें अष्टाध्यायीवर केलेलीं वार्तिकें पुष्कळच आहेत. कात्यायनानें केलेल्या वार्तिकांचा परिणाम असा झाला कीं, पाणिनीनें केलेल्या सूत्रांच्या शुद्धतेबद्दल विद्वानांच्या मनांत संशय उत्पन्न होऊं लागला म्हणून पतञ्जलि या विद्वान् महामुनीनें अष्टाध्यायीच्या अर्थास पोषक अशींच वार्तिकें कोणतीं तें ठरवून तेवढींच वार्तिकें अष्टाध्यायीच्या अध्ययनकालीं आचार्यांनीं शिष्यांस शिकवावीं असा नियम केला. पाणिनीच्या व्याकरणावर पतञ्जलीनें जी महाभाष्य नांवाची विद्वत्ताप्रचुर टीका केली आहे, तींत हा नियम सर्वत्र ग्रथित आहे. याप्रमाणें संस्कृत व्याकरणावर, पाणिनि, कात्यायन व पतञ्जलि या तीन महामुनींनीं फार परिश्रमपूर्वक जी ग्रंथोत्पत्ति केली, ती आर्यावर्तांत सर्वमान्य होऊन, संस्कृत भाषेच्या अभ्यासार्थ त्यांच्याच ग्रंथाचा उपयोग होऊं लागला. इतकेंच नव्हे तर त्यांच्या ग्रंथाबद्दल लोकांच्या मनांत उत्पन्न झालेली श्रद्धा इतक्या उच्चतेस पोंचली कीं, द्विजांनीं दररोज म्हणण्याच्या आह्निकपाठांत अष्टाध्यायीचा समावेश झाला. पतञ्जलीनंतर इसवी सनाच्या सतराव्या

शतकापर्यंत आर्यावर्तांत जे व्याकरण–ग्रंथकार झाले त्यांनीं पाणिनीच्या व्याकरणांतील क्लिष्ट भाग सोपे करून दाखविणारे ग्रंथ तयार केले.

सतराव्या शतकांत भट्टोजी दीक्षित या नांवाच्या दक्षिणी विद्वान् ब्राह्मणानें पाणिनीची अष्टाध्यायी, कात्यायनाचीं वार्तिकें व पतञ्जलीचें महाभाष्य व इतर आधुनिक ग्रंथकार यांचे ग्रंथ–यांचें दोहन करून सिद्धान्तकौमुदी–नांवाचा ग्रंथ तयार केला. सिद्धान्तकौमुदीची मांडणी अध्याष्टायीच्या मांडणीहून भिन्न आहे.

## सिद्धान्तकौमुदीची मांडणी.

भट्टोजी दीक्षितांनीं अष्टाध्यायीचीं सूत्रें दोन भागांत विभागलीं. पहिल्या भागाला पूर्वार्ध व दुसऱ्या भागाला उत्तरार्ध अशीं नांवें त्या भागांना दिलीं. पूर्वार्धांत साधारणपणें 'सुबन्तप्रकरण व तद्धित प्रत्यय' व उत्तरार्धांत 'तिङन्त प्रकरण व कृदन्त प्रत्यय–' यांचा समावेश केला आहे. अष्टाध्यायींतील चतुर्थ व पंचम अध्यायांतील प्रत्यय पूर्वार्धांत व तृतीयाध्यायांतील प्रत्यय उत्तरार्धांत गोंविले आहेत.

भट्टोजी दीक्षितांनीं केलेले पाणिनीच्या सूत्राचे अर्थ विद्यार्थ्यांना थोड्याशा प्रयत्नानें समजण्यासारख्या सुलभ भाषेंत असल्यामुळें दीक्षितांच्या इष्टार्थाविषयीं शंका रहात नाहीं. प्रकृत सूत्राचा अर्थ कोणत्या मागील सूत्रांतील कोणत्या शब्दाच्या अनुवृत्तीनें पूर्ण होतो हें दीक्षितांनीं उत्तम रीतीनें दाखविलें आहे. त्या त्या सूत्रांचीं उदाहरणें योग्य स्थळीं देऊन त्यांची उपयुक्तता जास्त विशद केली आहे. अष्टाध्यायींतील सूत्रांचें बलाबलत्व करण्याकरितां पूर्वपरत्व, सपाद सप्ताध्यायी, त्रिपादी, अन्तरङ्गत्व, बहिरङ्गत्व, वगैरे विषयांचें ज्ञान करून देऊन ते विषय सुगम केले आहेत. स्थानिवद्भाव, सन्निपात–परिभाषा व परिभाषा–पाठांतील इतर परिभाषा यांचा उपयोग पाणिनीनें अष्टाध्यायींत कोणत्या रीतीनें केला हें दाखविण्याचा प्रयत्न दीक्षितांनीं वारंवार केला आहे. जेथें जेथें पाणिनी व कात्यायन या उभयतांमध्यें वादाचा विषय उत्पन्न झाला तेथें 'यथोत्तरं मुनीनां प्रामाण्यम्' या वचनाप्रमाणें कात्यायनाच्या मतास जास्त मान दिला आहे. व पाणिनी–कात्यायन या उभयतांपेक्षां महाभाष्यकार पतञ्जलि यांच्या वचनास सर्वापेक्षां जास्त मोठें प्रामाण्य आहे असें मानिलें आहे.

पतञ्जलीनंतर झालेल्या पुष्कळ वैयाकरणांचीं मतें दीक्षितांनीं कौमुदींत उद्धृत केलीं आहेत.

अष्टाध्यायींतील विषयांची मांडणी भट्टोजी दीक्षितांनीं कशी केली आहे तें या ग्रंथाच्या आरंभाला दिलेल्या अनुक्रमणिकेवरून दिसून येईल. जी सिद्धांतकौमुदीची अनुक्रमणिका तीच या ग्रंथाची अनुक्रमणिका आहे. छापलेल्या सिद्धांतकौमुदींतील प्रत्येक सूत्राच्या पूर्वी, त्या सूत्राचा कौमुदींतील अनुक्रमांक, नंतर तें सूत्र,

त्यानंतर त्या सूत्राचा अष्टाध्यायींतील अध्याय, पाद व त्या पादांतील त्या सूत्राचा अनुक्रमांक, अशी जी मांडणी आहे तीच या ग्रंथांत कायम ठेविली आहे.

या ग्रंथास ' सिद्धान्तकौमुदी महाराष्ट्र प्रद्योत ' असें नांव दिलें आहे. तें अन्वर्थ नांव व्हावें अशाबद्दल शक्य तों प्रयत्न करण्यांत आला आहे. यांत सिद्धान्तकौमुदींतील प्रत्येक सूत्राचा तात्पर्यार्थ दिला आहे. यांत सूत्रांचीं भाषांतरेंच नसून, विद्यार्थ्यांच्या समजुतीकरितां विशेष विवेचनही केलें आहे. सिद्धान्तकौमुदींतील कोणताही महत्त्वाचा भाग यांत सोडलेला नाहीं.

सिद्धान्तकौमुदींत कारक, समास, तद्धितप्रत्ययांतील कांहीं भाग वगैरे प्रकरणें फार गुंतागुंतीचीं व विस्तृत असल्यामुळें विद्यार्थ्यांना दुर्बोध व एकदम आकलन करतां न येण्याजोगीं आहेत, म्हणून त्यांच्याबद्दल निरनिराळीं परिशिष्टें देऊन त्यांचें संक्षेपरूपानें या ग्रंथांत विवेचन केलें आहे.

'तद्धितप्रकरण व कृदन्तप्रकरण' यांतील प्रत्ययांचीं निरनिराळीं परिशिष्टें देऊन त्यांत प्रत्येक प्रत्ययाचें संकलन केलें आहे.

परिभाषा पाठांतील ज्या प्रमुख परिभाषांचा उपयोग सिद्धान्तकौमुदींत केला आहे, त्याचा अर्थ व उपयोग विद्यार्थ्यांना स्पष्ट करून दाखविण्याकरितां प्रत्येक परिभाषेबद्दल निराळें परिशिष्ट जोडलें आहे.

'अनुवृत्ति, अपकर्ष, स्थानिवद्भाव' वगैरेसारख्या सि. कौमुदींतील पारिभाषिक शब्दांचे अर्थ, परिशिष्टें घालून स्पष्ट केले आहेत.

पाणिनीनें–'उणादिप्रत्ययप्रकरण'–अष्टाध्यायीचा पूरक भाग आहे असें दाखविलें आहे असें कौमुदींतील ३१६९, ३१७०, ३१७१ या क्रमांकांच्या सूत्रांवरून दिसतें. उणादिप्रत्ययप्रकरणाचा कर्ता शाकटायन–या नांवाचा कोणी एक मुनि होता असें– 'शाकटायन प्रणीत उणादिसूत्रपाठः'–या वाक्यावरून दिसतें. हा शाकटायन कोण व केव्हां होऊन गेला या प्रश्नाचें उत्तर देण्यास साधन–कौमुदींतील ५६ व १६८ या क्रमाकांचीं सूत्रें–आहेत. या सूत्रांतील शाकटायन व त्या प्रकरणाचा कर्ता शाकटायन–हे दोघे एकच व्यक्ति होती कीं काय हें ठरवितांना उणादिप्रत्ययप्रकरणांतील प्रत्येक अध्याय–समाप्तीला ' –शाकटायनकृतोणादिप्रकरणे प्रथमाध्यायः–द्वितीयोध्यायः– ' वगैरे असा निर्देश केलेला नाहीं–म्हणून व पाणिनीनें कोठेंहि तें प्रकरण शाकटायनकृत आहे असें प्रतिपादिलें नाहीं; याबद्दल विस्तृत विवेचन पुढें केलें आहे. म्हणून–'शाकटायनप्रणीत उणादिप्रत्ययपाठः–' हें वाक्य अलीकडे कोणीतरी घुसडलें असावें असें दिसतें. उणादिप्रत्ययप्रकरणांत ' टित्, कित्, ङित्, पित्–'प्रत्यय दिलेले आहेत. तेथें कौमुदींतील ३६ व इतर परिभाषा प्रकरणांतील सूत्रें व गुणवृद्धि विधायक व निषेधक २१६८,२१८९,२२१७ सारखीं सूत्रें लागू होतात, यावरून त्या

प्रकरणाचा कर्ता पाणिनीच होता असें म्हणावें तर त्या प्रकरणांतील इतर स्थलीं पाणिनीचीं सूत्रें लागू न करितां रूपसिद्धि केलेली आहे असें आढळतें. यावरून त्या प्रकरणाचा कर्ता पाणिनीशिवाय दुसरा कोणी असावा असेंही अनुमान निघतें. वरील विवेचनावरून त्या प्रकरणाचा कर्ता पाणिनि नसून शाकटायन होता असें म्हणण्यास हरकत नाहीं.

शाकटायन–हा शब्द–'शकटस्य गोत्रापत्यं = शाकटायनः'–असा कौमुदींतील ११०१ क्रमांकाच्या सूत्रांतील नडादिगणांत असल्यामुळें शकट शब्दाहून 'गोत्रे–' याअर्थीं 'फक्' प्रत्यय करून झालेला आहे. कौमुदीच्या १०८९ सूत्रानें–'अपत्यं पौत्र-प्रभृति गोत्रम्'–अशी गोत्र शब्दाची व्याख्या केली आहे. त्यावरून शाकटायन–या शब्दानें शकट–या पुरुषाचा शाकटायन हा नातू, पणतू किंवा त्यापुढील कोणत्याही पिढींतील पुरुष असा अर्थ होऊं शकेल. शकटाचा साक्षात् मुलगा हा अर्थ असल्यास 'शाकटिः' असें रूप होतें. म्हणून कौमुदींतील ५६, १६८ या सूत्रांतील शाकटायन व उणादिप्रत्ययप्रकरणाचा कर्ता शाकटायन–हे दोघे एकच किंवा दोन भिन्न व्यक्ति असणेचाही संभव आहे. याबद्दल जास्त विवेचन पुढें केलें आहे.

पाणिनि व कात्यायन हे दोघे एकाच वेळीं एकाच गुरूचे शिष्य होते अशा अर्थाची जी एक आख्यायिका बृहत्कथासागरांत सांगितली आहे ती विश्वसनीय आहे असें वाटत नाहीं. पाणिनि व कात्यायन हे दोघे निरनिराळ्या काळीं होऊन गेले असावेत असें आमचें मत आहे. यास कारणें: ( १ ) पाणिनि हा बुद्धधर्म हिंदुस्थानांत प्रसृत होण्यापूर्वी झाला व कात्यायन हा येथें बुद्धधर्म प्रसृत होत असतां झाला असें कौमुदींतील १३५३ क्रमांकाचें सूत्र व त्यावरील वार्तिक पाहिलें असतां दिसून येईल. १३५३ क्रमांकाचें सूत्र–**अरण्यान्मनुष्ये**–असें आहे व कात्यायनानें त्या सूत्रांतील–'मनुष्ये'–या शब्दाच्या ऐवजीं–**पथ्यध्यायन्याय-विहारमनुष्यहस्तिष्वितिवाच्यम्**–हे शब्द घालावे अशी सूचना केली आहे. या कात्यायनाच्या वार्तिकांत–'विहार'–असा शब्द आहे. बुद्धधर्म सुरू झाल्यावर बुद्ध भिक्षुकांकरितां अरण्यांमध्यें विहार बांधण्याची पद्धत प्रचारांत आली. पाणिनीच्या काळीं ही पद्धत अस्तित्वांत नव्हती म्हणूनच त्यानें विहार या शब्दाचा समावेश सूत्रांत केला नाहीं. ( २ ) सि. कौ. तील २६७८ सूत्रांतील–'कष्टाय'–या शब्दाचा अर्थ–'पापाय' असा असल्याचें भट्टोजी दीक्षित म्हणतात. या सूत्रावर कात्यायनाचें वार्तिक आहे. त्यांत इतर कांहीं शब्दाबरोबर 'सत्र'–शब्दाचा समावेश कात्या-यनानें केला आहे. सत्र–शब्दाचा मूळ अर्थ यज्ञ, याग, मख असा असून बुद्धकालीं यज्ञसंस्था हिंसात्मक म्हणून पापास प्रवृत्त करणारी असा अर्थ झाल्यामुळें त्या शब्दा-चाही अर्थ पाप–असा कात्यायनाच्या वेळीं झाला होता. तसा अर्थ पाणिनीच्या वेळीं नव्हता म्हणून पाणिनीनें सत्र शब्दाचा समावेश सूत्रांत केला नाहीं.

पाणिनीनें तद्धितादि प्रत्ययप्रकरणांत शब्दांचे समुदाय कल्पून त्या समुदायाला 'गण' असें नांव दिलें आहे. व असले 'गण' एकत्रित करून तें एक निराळें प्रकरण केलें आहे. त्या प्रकरणास 'गणपाठः' असें नांव आहे. हल्लीं प्रचलित असलेला गणपाठ फक्त पाणिनीयच आहे असें म्हणतां येत नाहीं. त्रिमुनींच्या अवतारसमाप्तीनंतर जे व्याकरणशास्त्री होऊन गेले त्यांनीं पाणिनीय गणपाठांत कात्यायनाच्या वार्तिकानुसार भर घालून हल्लींचा गणपाठ तयार केला असावा असें १९१० सूत्राखालीं–**ज्योत्स्नादिभ्य उपसंख्यानम्**–या वार्तिकानुसार 'ज्योत्स्नादिगण' घालून हल्लींचा गणपाठ दिला आहे.

पाणिनीच्या कालापूर्वी व त्याचे काळीं संस्कृत भाषा सर्व लोकांची व्यवहारांत बोलण्याची भाषा होती असें मानण्यास कांहीं प्रमाणें अष्टाध्यायींत मिळतात तीं अशीं:– ( १ ) मुलाला लाडकेपणानें बोलवावयाचें असल्यास आम्ही जसें–बाळ, बाळा वगैरे सारखे शब्द योजतों तसें त्यावेळीं पुत्र–शब्दाचें 'कन्–प्रत्ययान्त' रूप–'पुत्रक'–असें योजीत–असें २०३१ ( सि. कौ. ) सूत्रावरून दिसतें. ( २ ) महाराज, आणा त्या आपल्या 'धाना किंवा गुडा'–असें सामदानादि उपाय योजून लहान मुलादिकांचीं मनें वळवावयाचीं असल्यास 'कन्' प्रत्यय करून–'धानकाः गुडका'–अशीं रूपें योजावीं असें २०३२ ( सि. कौ. ) सूत्रानें सांगितलें आहे. ( ३ ) हल्लीं जसें विश्वनाथ–या शब्दाचे–विसू, वासुदेव–या शब्दाचे–वासू–वगैरे सारखे शब्दप्रयोग व्यावहारिक बोलण्यामध्यें येतात तसें पाणिनीच्या वेळीं–देवदत्त–शब्दाबद्दल–देविक–देविय–देविल–देवदत्तक– असे व वायुदत्त– शब्दाबद्दल वायुक–वायुदत्तक–असे प्रयोग योजावेत असें पाणिनीनें सांगितलें आहे त्याप्रमाणें–सत्यभामा शब्दाबद्दल– सत्या–भामा–असें म्हणत. याबद्दल कौमुदींतील २०३१ सूत्रापासून २०३९ सूत्राच्या अखेरपर्यंतचीं सूत्रें पहावीं. या सूत्रांवर कांहीं वार्तिकें आहेत. त्यावरून कात्यायनाच्या वेळींही संस्कृतभाषा बोलण्याची भाषा होती असें सिद्ध होतें.

कौमुदींतील १९३८ व १९४० या सूत्रांत 'वर्ण' असा शब्द आला आहे. वर्ण या शब्दाचे त्या दोन सूत्रांतील अर्थ भिन्न भिन्न आहेत. १९३८ सूत्रांतील, वर्ण–शब्दाचा रंग–वेष–जाति असा अर्थ असावा असें भट्टोजी दीक्षितांनीं दिलेल्या 'ब्राह्मणवर्णी' या उदाहरणावरून दिसतें. व १९४० सूत्रांतील वर्ण शब्दाचा अर्थ, 'वेद–वेदाक्षर–वेदाक्षरांनीं सांगितलेलें व्रत' असा असला पाहिजे असें 'ब्रह्मचारी' हा अर्थ असतांना, वर्ण शब्दाचे, 'इनि' प्रत्यय होऊन 'वर्णी'–असें रूप बनतें–असें त्या सूत्रानें सांगितलें आहे म्हणून वाटतें.

१४४५ या सूत्रांतील–'तस्य व्याख्यानः'–या शब्दांचा अर्थ–त्या विषयांचें व्याख्यान करणारा ग्रंथ–असा भट्टोजी दीक्षितांनीं केला आहे. त्या शब्दाचा अर्थ–

त्या विषयाचें व्याख्यान करणारा पुरुष—असा दुसऱ्या कोणत्याही ज्ञात वैयाकरणानें केलेला नाहीं. यावरून 'व्याख्यानः' हा शब्द वि+आ+ख्या या धातूहून अधिकरणी 'युच्' प्रत्यय होऊन झालेला आहे हें स्पष्ट होतें. 'तस्य व्याख्यानः' या शब्दाची अनुवृत्ति १४४६, १४४७, १४४८, १४४९, १४५०, १४५१ व १४५२ या सूत्रांत होते. म्हणून या सर्व सूत्रांत वर्णन केले गेलेले सर्व शब्द ग्रंथवाचक आहेत असें मानण्यास कांहीं हरकत नाहीं. त्यावेळेची ही ग्रंथसंपत्ति केवढी मोठी होती याचें अनुमान करितांना बुद्धि थक्क होते. 'छन्दः शास्त्रावरही' त्यावेळीं ग्रंथ होते असें १४५० सूत्रावरून दिसतें. १४६७ ते १४९६ सूत्रांत तर—ग्रंथ—असाच शब्द आहे व त्या शब्दाची अनुवृत्ति १४६८ सूत्रांत 'शिशुक्रन्द, यमसभ'—वगैरे विषयांना अनुलक्षून केलेले ग्रंथ—असा अर्थ असतांना त्या शब्दांहून 'छ'—प्रत्यय होतो—असें विधान केलें आहे. वरील सर्व सूत्रांचा मथितार्थ काढल्यास पाणिनीच्या पूर्वी ' ऋगयन, पदव्याख्यान, छन्दोमान, छन्दोभाषा, छन्दोविचिति, न्याय, पुनरुक्त, निरुक्त, व्याकरण, निगम, वास्तुविद्या, क्षत्रविद्या, अङ्गविद्या, उत्पात, संवत्सर, मुहूर्त, उपनिषद्, निमित्त, शिक्षा, भिक्षा ' ( ऋगयनादिगण ४ । ३ । ७३ ) या विषयासंबंधानें ग्रंथ लिहिलेले होते. मोठ्या गहनें विषयांवर लिहिलेले ग्रंथ होते इतकेंच नसून—लहान मुलें रडण्याचें कारण काय, प्रकृतीस न मानणाऱ्या पदार्थांचें भक्षण केल्यास काय परिणाम होतो व त्यास उपाय—वगैरेसारख्या विषयांवरही ग्रंथ लिहिलेले होते असें १४६८ सूत्रावरून दिसतें. सि. कौमुदींतील १२७० सूत्रांत दिलेल्या 'उक्थादिगणांत' जे शब्द दिलेले आहेत ते 'लोकायत, न्याय, न्यास, निरुक्त, वृत्ति, आयुर्वेद,' हे होत. त्याप्रमाणेंच १२७० सूत्रापासून १२७३ सूत्राच्या अखेरपर्यंत येणाऱ्या 'क्रमादिगण व वसन्तादिगण'—यांत क्रम, पद, शिक्षा, मीमांसा, सामन्, वसन्त, वर्षा, शरद्, हेमन्त, शिशिर—वगैरे शब्द येतात. या सर्व शब्दांनीं सूचित केलेल्या विषयांचें प्रतिपादन करणारे ग्रंथ पाणिनीच्या वेळीं आस्तित्वांत होते असें दिसतें. पाणिनीच्या पूर्वींही आर्यलोकांनीं लिपि हुडकून काढिली होती इतकेंच नव्हे तर मोठमोठ्या गहनविषयांवर लिहिलेले ग्रंथही त्यांच्यांत होते असें दाखविणारा भक्कम पुरावा अष्टाध्यायींतच असतांना पण्डितमन्य युरोपीय टीकाकारांनीं पाणिनीच्या पूर्वी आर्यलोकांना लिहिण्याची कला माहीत नव्हती असें म्हणावें यास त्यांचा दुरभिमान किंवा अज्ञान याशिवाय दुसरें नांव देणें अयुक्त होय.

## पाणिनीच्या वेळची लोकस्थिति.

लोकोपयोगासाठीं रस्ते, सडका, राजमार्ग वगैरे लोकोपयोगी कामें होत असत, असें कौमुदींतील २०५५ सूत्रांत सांगितलेल्या 'देवपथादिगणांतील'—देवपथ, हंसपथ, वारिपथ, रथपथ, स्थलपथ, करिपथ, अजपथ, राजपथ, सिन्धुपथ—या शब्दांवरून

दिसतें. या शब्दांत सिन्धुपथ व वारिपथ असे दोन तऱ्हेचे जलमार्ग सांगितले आहेत त्यावरून समुद्रावरून व नद्यांतून पर्यटण करण्याकरितां कांहीं ठरीव मार्ग होते असें अनुमान करण्यास हरकत नाहीं. तसेंच करिपथ, अजपथ, राजपथ, रथपथ या शब्दांवरून निरनिराळ्या वाहनांकरतां, जनावरांकरितां व श्रीमंत लोकां-करितां निरनिराळे मार्ग नियत असत असेंही ठरतें. क्रोश, गव्यूति या शब्दांचा उप-योग त्यावेळीं अंतर मोजण्याकरितां होत असे असें कौमुदींतील ६३ व्या सूत्रा-खालच्या—**अध्वपरिमाणेच**—या वार्तिकावरून निदान गव्यूति—या शब्दासंबधानें तरी म्हणतां येईल. क्रोश व गव्यूति हीं, अंतरें कळण्याकरितां मार्गावर कांहींतरी चिन्हें असावींत असें वाटतें. कात्यायनाच्या वरील वार्तिकावरून पाणिनीच्या वेळींही मार्गावरील अंतरें कळण्याकरितां कांहीं चिन्हें असावींत असें अनुमान करणें चुकीचें होणार नाहीं.

क्रोश व गव्यूति हीं अंतरें दाखविणारीं चिन्हें ज्या रस्त्यावर नाहींत तेथें अंतर मोजण्यास आणखी एक साधन होतें असें १८२० सूत्रानें साधलेला—**आश्वीनोऽध्वा**—हा शब्द सुचवितो. घोड्यावरून गेल्यास ज्या रस्त्याच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत एका दिवसांत जातां येत होतें अशा रस्त्यास—आश्वीनः अध्वा—असें म्हणत, असें त्या सूत्राच्या अर्थावरून दिसतें.

व्यापार व धंदा करणारे जे लोक पाणिनीच्या कालीं होते ते पूग किंवा संघ करून रहात होते असें कौमुदींतील २०६६ सूत्रावरून दिसतें. पूग किंवा संघ करून रहाणाऱ्या लोकांच्या स्थितीची व्याख्या, भाष्यानुसारें भट्टोजी दीक्षितांनीं दिली आहे ती अशीः—'नानाजातीया अनियत वृत्तयः अर्थकामप्रधानाः संघाः पूगाः' या वचनाचा अर्थ असा—निरनिराळ्या जातींत उत्पन्न झालेल्या, नाना धंदे करणाऱ्या व पैसा मिळविणें हाच ज्यांचा प्रधान हेतु आहे अशा, लोकांच्या संघांना पूग असें नांव आहे. या व्याख्येवरून असेंही अनुमान करितां येईल कीं—एकाच जातींत उत्पन्न झालेल्या, व शौर्यादि कृत्यांचे हेतु साधून देऊन उदरनिर्वाह करणाऱ्या लोकांचे पूग किंवा संघ त्यावेळीं होते. 'लोहितध्वज' या नांवाचा एक पूग होता तो वरील व्याख्येप्रमाणेंच पूग संज्ञक असल्याचें मानिलें होतें. 'व्रात' हा दुसरा एक संघवाचक शब्द आहे. व्रात व पूग हे दोन शब्द एकाच अर्थाचे द्योतक आहेत असें वाटतें. 'कपोतपाक' हा शब्द व्रातवाचक असून त्यांहून ११०० सूत्रानें स्वार्थी 'ञ' प्रत्यय करून 'कापोतपाक्यः' असें रूप बनतें.

लढण्यास व घात करण्यास उपयोगीं पडणाऱ्या आयुधांवर उपजीविका कर-णाऱ्या लोकांचेही संघ होते. हे संघ एकेका जातीचा एक—अशारीतीनें निरनिराळ्या जातींचे निरनिराळे होते असें २०६७ सूत्रांतील—**अब्राह्मणराजन्यात्**—या निषेध-वाचक शब्दावरून दिसतें.

वरील सर्व विवेचनावरून असा स्पष्टार्थ निघतो कीं, ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र वगैरे जातींचे निरनिराळे आयुधजीविसंघ त्यावेळीं होते. या म्हणण्यास प्रमाण १८७१ सूत्रांत सापडेल. याशिवाय २०६७ सूत्राखालच्या प्रत्युदाहरणावरून व २०६८, २०६९, २०७० व २०७१ या सूत्रांवरून आर्यावर्ताच्या सर्व भागांत सर्व जातींचे आयुधजीविसंघ होते असें दिसेल. २०६८ व २०७१ या सूत्रांवरून 'वृक व अभिजित्' वगैरे जाति, २०६९ सूत्रांतील 'दामन्यादि आणि त्रिगर्तषष्ठ व यौधेयादि गणांतील जाति,' या जाति पंजाबांत राहाणाऱ्या व २०७० सूत्रांतील पर्श्वादिगणांतील आयुधजीवि जाति इराण देशांत राहाणाऱ्या होत्या.

पाणिनीनें २०६६, २०६७, २०६८, २०६९, २०७०, २०७१ व ११०० या सूत्रांनीं सांगितलेल्या प्रत्ययांना-तद्राज-अशी संज्ञा दिली आहे. या संज्ञेचें विधान २०७२ या सूत्रानें केलें आहे. तद्राज-या संज्ञेचें 'फल,' स्त्रीत्व नसतांना व बहुवचन असतांना त्या प्रत्ययांचा 'लुक्' करणें हें आहे. तरी पाणिनीनें बनविलेला हा तद्राज शब्द दुसरा एक विशिष्ट अर्थ सुचवितो असें वाटतें. २०७२ वें सूत्र-'ञ्यादयस्तद्राजाः'-अशा शब्दांनीं बनलेलें आहे. या सूत्रांतील तद्राजाः हा शब्द तद्राज या अकारान्त पुल्लिंगी शब्दाच्या प्रथमेचें बहुवचन आहे. तद्राजः हा तत्पुरुष समास आहे व त्याचा विग्रह 'तेषां राजा = तद्राजः' असाच असला पाहिजे. याबद्दल कौमुदींतील ७८८ सूत्र पहावें. वरील सूत्रांनीं सांगितलेले तद्राज-प्रत्यय स्वार्थी होतात म्हणून 'तेषां राजा' म्हणजे त्या त्या जातींचा किंवा संघांचा राजा असा तद्राजः या शब्दाचा अर्थ झाला. हा संघांचा राजा, संघांनीं कांहीं मुदतीकरितां निवडलेला असा पुरुष, किंवा विशिष्ट घराण्यांतील त्या संघांना पसंत असा पुरुष, असणेचाही संभव आहे. वर सांगितलेल्या विवेचनावरून असें अनुमान होतें कीं, इराण देशापासून पंजाबप्रांताच्या दक्षिण सरहद्दीपर्यंत असलेल्या तत्कालीन निरनिराळ्या देशांत संघसत्ताक राज्यें पुष्कळच होतीं.

हल्लींच्या हिंदुस्थान देशाप्रमाणेंच आर्यावर्त देशांत कृषिकर्म हें लोकांच्या निर्वाहाचें मुख्य साधन होतें असें म्हणण्यास हरकत नाहीं. पाणिनीच्या वेळीं जमीन दोन किंवा तीन वेळां नांगरीत असत. त्या नांगरण्यास 'द्वितीयाकरोति, तृतीयाकरोति' असा शब्दप्रयोग योजीत असत. उत्तरदक्षिण दिशेनें नांगरलेल्या जमिनीस पुन्हां पूर्वपश्चिम दिशेनें नांगरणाऱ्या रयतास 'शम्बाकरोति' असें म्हणत. व नांगरतांनाच बीं पेरणाऱ्या रयतास 'बीजाकरोति' असें म्हणत असें २१२९ सूत्रावरून दिसतें. त्याचप्रमाणें शेतांत साधारणपणें जितकें कष्टकाम करावयास पाहिजे त्याच्या दुप्पट, तिप्पट, कष्टकाम करणाऱ्या रयताला 'द्विगुणाकरोति, त्रिगुणाकरोति क्षेत्रम्' असें म्हणत. ( २११० सूत्र ).

पाणिनि ज्या प्रांतांत रहात होता त्या व त्याच्या आसपासच्या प्रांतांत श्रीहि, शालि, यव, यवक, षष्टिक, तिला, माष, मुद्ग, उमा, भङ्गा व अणु–हीं धान्यें पिकत असत असें १८०३,१८०४ व १८०५ या सूत्रांच्या अर्थावरून अनुमान करितां येईल. अशीं धान्यें पिकण्यास योग्य अशा जमिनींचें धान्यावरून वर्गीकरण केलेलें होतें असें दुसरें अनुमान त्या सूत्रांच्या अर्थावरून करण्यास हरकत नाहीं.

१८३८, १८३९ या सूत्रांत उंची, लांबी, रुंदी–मोजण्याकरितां कांहीं मानें व धान्य, तेल वगैरे मोजण्याकरितां मापें, वजनें हे अर्थ असतांना प्रत्यय सांगितले आहेत. १६८२ सूत्रांत निष्कादि गण दिला आहे. त्या गणांत निष्क, पण, पाद, माष, वाह, द्रोण हे शब्द आहेत. यांशिवाय विंशतिक, त्रिंशतिक, कंस, शूर्प, कार्षापण, सहस्र, बिस्त, खारी, शाण, गोणी, प्रस्थ, पात्र, आढक, अचिल वगैरे शब्दही कौमुदींत आढळतात. हे सर्व शब्द मानें, मापें, वजनें या अर्थींच आहेत. फुलझाडें व फळझाडें यांची कापणी कशी केली म्हणजे तीं झाडें फोफावून जास्त उत्पन्न देतील याची माहिती त्यावेळच्या लोकांना होती असें १७२९ व १७३० या सूत्रांवरून दिसतें.

घरांतील पाळीव जनावरांपैकीं कोणास कोणत्या वेळीं काय चारलें पाहिजे म्हणजे तीं आपल्या जास्त उपयोगीं पडतील याचें ज्ञान त्यावेळच्या लोकांस होतें व ते त्याप्रमाणें जनावरांचें वर्गीकरण करीत होते असें १७३३ सूत्रावरून समजण्यास हरकत नाहीं. जसें–सः **कडंगरीयो गौः** = माषमुद्गादिकाष्ठंअर्हति यः सः ।

रानटी पशु व पक्षी यांची शिकार करून त्यावर उदरनिर्वाह करणाऱ्या लोकांचा वर्ग त्यावेळीं बराच मोठा असावा असें वाटतें. शिकारी लोक धनुष्यबाणांचा उपयोग करीत. बाणांना पक्ष्यांचीं पंखें लावलेलीं असत. त्या बाणांना ‘ सपुङ्ख शर ’ असें म्हणत. उत्तम शिकारी जो असेल त्यानें मृगाच्या एका अंगानें ‘ सपुङ्ख शर ’ मारून तो त्याच्या विरुद्ध बाजूनें बाहेर पडून निघून जावा अशा जोरानें व कौशल्यानें त्यानें तो मारल्यास त्याच्यासंबंधानें–‘निष्पत्राकरोति मृगम्’ असा शब्दप्रयोग व जो शिकारी मृगाला तसला शर मारून नुसता घायाळ करितो त्याच्यासंबंधानें–सपत्राकरोति मृगम्–असा शब्दप्रयोग करावा–असें २१३२ सूत्रांत सांगितलें आहे.

पक्षि, मत्स्य व मृग यांना मारून उपजीविका करणारे लोक त्यावेळीं होते. ( १५८५ सूत्र. )

१८१५ सूत्रांतील ‘आगवीनः’ हा शब्द दुसऱ्याचें जनावर कांहीं करारानें आपल्याकडे घेऊन त्याची जोपासना करावयाची व मुदतीनंतर तें जनावर मालकास परत द्यावयाचें–ही वहिवाट त्यावेळींही होती असें सुचवितो.

सावकारांचा, कर्जाऊ रकमा देऊन त्याच्या व्याजावर निर्वाह करण्याचा, धंदा त्यावेळीं बराच जोरांत चालत असावा. ऋणकोनें धनकोला जें व्याज द्यावयाचें

त्याला वृद्धि असें म्हणत. दामदुप्पट किंवा तिप्पट व्हावी अशारीतीनें दिलेलें कर्ज त्यावेळीं निंद्य मानिलें जाई ( १५८०, १५८१ सूत्रें ). सावकार लोक अज्ञान, खेडवळ व जंगलांत राहणाऱ्या लोकांना कर्जाऊ रकमा देत त्या परतफेड करण्याचे वायदे तसल्या ऋणकोंना त्यांच्या भाषेंत, त्यांना सहज पटतील अशारीतीनें केले जात असत असें १४२३, १४२४ व १४२५ या सूत्रांवरून दिसतें.

कोणत्याही जिनसांची विक्री करून मूळ किंमतीपेक्षां जास्त आलेल्या नफ्याला लाभ, प्रजेचें रक्षण करण्याबद्दल राजाला मिळणाऱ्या भागाला शुल्क व लाच किंवा केलेल्या कामाबद्दल देण्याच्या बक्षिसाला–उत्कोच–अशीं नांवें पाणिनीच्या वेळेला होतीं. वर दिलेल्या नफ्याच्या सर्व प्रकारांबद्दल उभय पक्षकारांमध्यें आगाऊ ठराव होत. ( १७१३, १७१४, १७१५ सूत्रें. )

राजानें बाजारपेठा व क्रयविक्रयस्थानें, यांवर जो कर बसवावयाचा त्याला 'अवक्रय' असें नांव होतें.

जमिनीच्या मालकाला शेत धारण करणाऱ्यानें जो भाग द्यावयाचा त्याला 'आयः' असें नांव होतें. पेठेंत किंवा बाजारांत दुकानें लावून जिन्नस विकणाऱ्या व्यापाऱ्यांनीं कांहीं नियमित वस्तूंचीच खरेदीविक्री करावी असा त्यावेळीं निर्बंध असावा असें 'आपूपिकः' (१६०१ सूत्र), 'लावणिकः' (१६०२ सूत्र), 'किसरिकः' (१६०३), 'शलालुकः' (१६०४) वगैरे उदाहरणांवरून दिसतें. २१५४ सूत्रावरून–उदरनिर्वाहाकरितां देवांचीं व थोर लोकांचीं चित्रें किंवा प्रतिमा करीत व तीं लोकांस दाखवीत असें दिसतें. त्यावेळीं देशांतील, निरनिराळ्या कारणांकरितां तयार केलेल्या भागांचेंही नकाशे विक्रीकरितां बाजारांत ठेवीत असत असेंही दिसतें ( २१५५ सूत्र ).

१८१० सूत्रांतील **अनुपदीना उपानत्**–या उदाहरणावरून त्यावेळचे चांभार क पायांचें माप घेऊन जोडे तयार करीत असें दिसतें.

जोडे एका प्रकारच्या गवतासारख्या पदार्थाचे व कातड्याचे करीत ( १६७६ सूत्र ).

पाणिनीच्या वेळीं उद्योग करून उदरनिर्वाह करणाऱ्या लोकांचे दोन वर्ग निरनिराळे होते असें १८२२ सूत्राच्या अर्थावरून दिसतें. त्या सूत्रानें 'व्रातीनः' हा शब्द साधलेला आहे. त्या शब्दाचा अर्थ भट्टोजी दीक्षितांनीं, शरीरकष्ट करून निर्वाह करणारा, बुद्धिवैभवानें नव्हे, असा केला आहे.

१८२३ सूत्रानें साधलेला 'साप्तपदीनम्' हा शब्द सख्य, मैत्री, या अर्थी आहे. त्याचा विग्रह 'सप्तभिः पदैः अवाप्यते यत् तत्' असा आहे. विग्रह–वाक्यांतील शब्दांचा तात्पर्यार्थ–भावी वधूवरांनीं लग्नापूर्वी कांहीं कृत्यें एकत्रपणानें करून एकमेकांची प्रीति संपादावी–असा करण्यास कांहीं हरकत नाहीं असें वाटतें.

शाला–या शब्दाचा पाणिनीच्या काळाचा अर्थ–अधृष्ट मुलास धृष्ट करणारें स्थळ–असा होता असें १८२१ सूत्रानें बनविलेल्या 'शालीनः' या शब्दावरून दिसतें. यावरून मुलांना द्यावयाचें शिक्षण असें असे कीं, तीं मुलें, तें शिक्षण घेऊन, व्यवहार-कुशल, व धरलेलें काम नेटानें व धैर्यानें पार पाडणारीं निपजत.

१८६४ सूत्रांतील आकर्षादिगणांत दिलेले शब्द धंदेवाचक आहेत. त्यावरून ते ते धंदे करून पोट भरणारे लोक त्या काळीं होते.

१८६६ क्रमांकाचें सूत्र–**स्वाङ्गेभ्यः प्रसिते**–असें आहे. स्वाङ्ग शब्दाचा अर्थ भाष्यकारांच्या व्याख्येप्रमाणें ( ५१० सूत्र ) केल्यास, प्राण्यांच्या शरीराचे अवयव असा आहे व प्रसित–या शब्दाचा अर्थ तत्पर असा आहे असें दीक्षितांचें म्हणणें आहे. यावरून पशु, पक्षी, व मनुष्यें या प्राण्यांच्या शरीरांतील निरनिराळ्या अवयवांची शुश्रूषा करून त्यांना रोगनिर्मुक्त करणारे लोक त्यावेळीं होते असें दिसतें.

१४९० व १४९१ या सूत्रांतील शिलाली व कृशाश्व असे दोघे नटसूत्रग्रंथाचे कर्ते होते व त्यांनीं प्रतिपादन केलेल्या नटसूत्रग्रंथाचें अध्ययन करणाऱ्यांना 'शैलालिनः व कृशाश्विनः' असें म्हणत असें त्या सूत्रांत सांगितलें आहे. यावरून त्यावेळीं नाटकांमध्यें नट–नटी–वेष घेऊन शास्त्रोक्त कामें करणारे स्त्री–पुरुष होते असें स्पष्ट दिसतें. यास प्रत्यन्तर प्रमाण १७६४ सूत्रांत सांपडतें. भट्टोजी दीक्षितांनीं वेष शब्दाचा अर्थ–कृत्रिम आकारः—असा त्या सूत्रांखालीं दिला आहे. त्या सूत्रानें नट या अर्थीं 'वेष्यः' असा शब्द बनविला आहे.

पाणिनीच्या वेळीं समाजाची सांपत्तिक स्थिति चांगली होती असें दिसतें. यासंबंधानें सि. कौमुदींतील १७४४ वें सूत्र पहाण्यासारखें आहे. मुलांना शिक्षण देण्याकरितां अध्यापक व घरांतील कामें करण्याकरितां चाकर मुदतीच्या करारानें ठेवीत.

१७४८ सूत्राचा अर्थ–**षण्मासिको व्याधिः** 'षाण्मास्यो व्याधिः'– या भट्टोजी दीक्षितांनीं दिलेल्या उदाहरणानें स्पष्ट केला आहे. त्यावरून अमका रोग अमक्या काळानें बरा होणारा आहे असें निदान करण्याची पात्रता असलेले वैद्य त्या काळीं होते असें अनुमान करितां येतें.

कोष्टयाच्या मागाला–तन्त्र हा शब्द त्यावेळीं लावीत असत व तन्त्रावरून नुक्त्याच काढून घेतलेल्या पटाला 'तन्त्रकः' असें म्हणत. ( १८७० सूत्र ).

त्यावेळेचे लोक जीं वस्त्रें वापरीत त्यापैकीं कांहीं पायाच्या टोंकापर्यंत पुरतील अशा लांबीरुंदीची असत ( १८०९ सूत्र ). सि. कौमुदींतील **१५५६ चरति** या सूत्राच्या अधिकाराखालीं येणारे आकर्ष, श्वगण हे शब्द, पर्पादिगणांतील शब्द व १५६२ सूत्रांतील वेतनादिगणांतील शब्द, १५६३ सूत्रांतील वस्न, क्रय, विक्रय हे

शब्द व १५६४ सूत्रांतील आयुध हे शब्द त्यावेळच्या लोकांच्या निर्वाहाचीं साधनें दाखविणारे आहेत असें म्हणण्यास हरकत नाहीं.

पाणिनीच्या वेळीं शिल्पशास्त्र जाणणारे लोक होते. त्यांच्यासंबंधानें त्यानें १६०५, १६०६ हीं सूत्रें केलीं आहेत. त्यांत मृदङ्गवादन, मड्डुकवादन व झर्झर-वादन या ज्ञानाला शिल्प असें नांव त्यानें दिलें आहे

वाटमारे, रस्तालुटणारे व घरावर दरवडा घालणारे लोक त्यावेळींही होते ( १५८६ ).

गांवांत एखाद्या मेलेल्या मनुष्याबद्दल किंवा इतर कांहीं कारणाकरितां शोक करावयाचा असल्यास, त्याच कारणाकरितां आंखून ठेवलेल्या स्थानीं जाऊन शोक करावा असा निर्बंध त्यावेळीं होता. अशा स्थानाला 'आक्रन्द' असें नांव होतें ( १५८८ सूत्र ).

त्यावेळीं सोन्याचीं नाणीं प्रचारांत होतीं ( १५३१ सूत्र ). शिवाय कंस नांवाचें काश धातूचें नाणेंही प्रचारांत होतें असें १५४७ सूत्रानें बनविलेल्या 'कंसीयम् = कंसपरिमाणाय हितम्' या रूपावरून दिसतें.

सि. कौमुदींतील १४८२ सूत्रांपासून १४८५ सूत्रांच्या अखेरपर्यंत सांगितलेले तित्तिरि, वरतन्तु खण्डिक, उख, काश्यप, कौशिक, कलापि, वैशम्पायन, व त्याचे शिष्य, भल्लु, शाट, पिङ्ग व १४८६ सूत्रांत सांगितलेले शौनकादिणांतील पुरुष, हे सर्व पुराण ऋषि ही संज्ञा मिळविलेले असून ते छन्दःशास्त्रप्रणेते व ब्राह्मणग्रंथकर्ते होते असें दिसतें. परंतु याज्ञवल्क्य व अश्मरथ हे मुनि पुराण ऋषि नव्हते असें भट्टोजी दीक्षितांनीं १४८५ सूत्राच्या खालीं दिलेल्या प्रत्युदाहरणावरून स्पष्ट होतें.

वासुदेव व अर्जुन या भारतीय योद्ध्यांना होऊन इतकीं वर्षें झालीं होतीं कीं त्यांना देव मानून भजणारे लोक पाणिनीच्या काळीं होते ( १४७८ सूत्र ).

सि. कौमुदींतील अपत्याधिकारप्रकरणांत पाणिनीच्या वेळीं प्रसिद्ध असलेल्या गोत्रांचा विचार केला आहे. अपत्य या शब्दांत पाणिनीनें १ साक्षात् अपत्य म्हणजे मुलगा, मुलगी; २ गोत्रापत्य आणि ३ युवापत्य असे तीन भेद केले आहेत. याशि-वाय पहिली, दुसरी, तिसरी वगैरे पिढींचा विचार मनांत न आणतां एखाद्या मनुष्याच्या कुळांत उत्पन्न झालेलें अपत्य असा अर्थ दाखवावयाचा असल्यास जे सामान्य अप-त्यार्थीं प्रत्यय पाणिनीनें सांगितलेले आहेत त्याबद्दलचीं सूत्रें १०८८, १०९५, १११६, ११२३, ११२४, ११२५, ११७६, ११७७, ११८०, ११८१ ११८४, ११८५, ११८६ हीं होत. एखाद्याचा साक्षात् मुलगा, मुलगी हे अर्थ दाखवावयाचे असल्यास त्यासंबंधानें होणाऱ्या प्रत्ययांचीं विधानें करणारीं सूत्रें पुष्कळच आहेत. तीं १०९५ सूत्रापासून ११८४ सूत्राच्या अखेरपर्यंत मधूनमधून दिलीं आहेत.

पाणिनीनें गोत्र या शब्दाची व्याख्या १०८९ सूत्रांत दिली आहे. पौत्रापासून पुढच्या पिढींतील अपत्यांना गोत्र अशी संज्ञा होते असें त्या सूत्रानें विधान केलें आहे. गोत्रापत्य हा अर्थ दाखवावयाचा असल्यास सर्वत्र होणारे प्रत्यय सांगणारीं सूत्रें व तोच अर्थ दाखवावयाचा असल्यास विशिष्ट शब्दांहून विशिष्ट प्रत्ययांचें विधान करणारीं सूत्रें पाणिनीनें दिलीं आहेत. विशिष्ट प्रत्ययांचें विधान करणाऱ्या सूत्रांत विशिष्ट शब्दांचे समुदाय दिलेले आहेत. त्या समुदायांना–गण–असें नांव आहे. असे गण १०९९; ११०१;११०२;११०४;११०५;११०६;११०७;११०९;१११३; १११५ आणि १११७ या सूत्रांत दिलेले आहेत. त्या गणांत आर्यावर्तातील गोत्रप्रवर्तक मूळ व्यक्ति दिलेल्या आहेत. त्या व्यक्तींत गोत्रप्रवर्तक अशा पुरुषांप्रमाणें गोत्रप्रवर्तक अशा स्त्रियांचींही कांहीं नांवें आहेत. गोत्रप्रवर्तक अशा व्यक्तींपैकीं कांहीं नांवें शूद्रादिजातींच्या मूळ पुरुषांचीं असावींत असें वाटतें. हिंदुस्थानांतील ब्राह्मण, क्षात्रिय, वैश्य वगैरे लोकांचीं जीं गोत्रें सांप्रतकाळीं ज्ञात आहेत त्यापेक्षां पुष्कळ जास्त गोत्रप्रवर्तक त्या गणांत सांपडतात, यांवरून असें अनुमान करण्यास हरकत नाहीं कीं, त्या अज्ञात गोत्रांतील लोक हिंदुस्थानाबाहेरच्या अफगाणिस्थान, बलुचिस्थान, इराण वगैरे देशांतून पूर्वीं रहात होते व ते मुसलमान झाल्याच्या योगानें त्यांची गोत्रावली लुप्त झाली आहे.

वर दिलेल्या गणांत मंत्रद्रष्टे ऋषि, मुनि, व इतर सामान्य आर्य, अनार्य लोकांचे गोत्रप्रवर्तक दिलेले आहेत. त्या गणांत दिलेल्या नांवांच्या स्वरूपांवरून ते लोक संस्कृतभाषा बोलणारे होते असें अनुमान करितां येण्यासारखें आहे.

प्रवरमंजरीवरून असें दिसतें कीं,–ब्रह्मदेवाचे चार मानसपुत्र होते ते हे— १ भृगु, २ अङ्गिरा, ३ मरीचि, ४ आत्रि. फार प्राचीन काळीं सर्व आर्य–भू–भागांतील प्रजा या चार मानसपुत्रांपासून उत्पन्न झाली. पुढें या मानसपुत्रांच्या वंशांत मोठमोठे मंत्रद्रष्टे ऋषि उत्पन्न होऊन प्रजावृद्धि फार झाली व कांहीं कांहीं मुनींचीं व ऋषींचीं नांवें सारखीं दिसूं लागलीं त्यामुळें गोत्रनिर्णयाला अडचण पडूं लागली म्हणून १ विश्वामित्र, २ जमदग्नि, ३ भरद्वाज, ४ गौतम, ५ आत्रि, ६ वसिष्ठ, ७ कश्यप, ८ अगस्ति अशा आठ ऋषींना गोत्रप्रवर्तक मानावें असें शास्त्रकारांनीं ठरविलें. पाणिनीच्या काळीं आर्य व अनार्य या जातींचे विवाहादिद्वारां संमिश्रण झालें होतें व होत होतें, त्यामुळें पुन्हां गोत्रनिर्णयासंबंधानें अडचण भासूं लागली. कितीएक स्त्रियाही गोत्रप्रवर्तक झाल्या होत्या व उदीच्य व प्राच्य असे दोन भेद गोत्रांमध्यें पडलेले असून त्यांहून होणाऱ्या प्रत्ययांमध्यें भेद होते या गोष्टी पाणिनीच्या दृष्टीस पडल्या. म्हणून त्यानें त्यावेळीं प्रचलित असलेल्या शब्दरूपांस अनुसरून निरनिराळे काल्पनिक प्रत्यय व शब्दसमूह तयार करून सूत्रें बनविलीं.

सि. कौमुदींतील १०९० व्या सूत्रानें युवापत्य शब्दाची व्याख्या केली आहे.

साक्षात् अपत्य म्हणजे गोत्रप्रवर्तकाचा मुलगा असा अर्थ दाखवावयाचा असल्यास ज्या गोत्रप्रवर्तक नामाहून अपत्य प्रत्यय करावयाचा त्याच नामाहून त्याचें गोत्रापत्य हा अर्थ दाखवावयाचा असल्यास गोत्रापत्य प्रत्यय होतात. जसें 'कुञ्जस्य नडस्य वा साक्षात् अपत्यम् = कौञ्जिः नाडिः' अशीं रूपें होतात. 'कौञ्जेः नाडेः वा अपत्यं गोत्रापत्यंवा' हा अर्थ दाखवावयाचा असल्यास 'कौञ्जि व नाडि' या शब्दांहून सामान्य अपत्यार्थी प्रत्यय पुन्हां न होतां 'कुञ्ज व नड' या शब्दांहून गोत्रापत्यार्थी क्रमानें 'फञ् व फक्' हे प्रत्यय होऊन 'कौञ्जायन्यः' व 'नाडायनः' अशीं रूपें बनतात. व त्यांचा अर्थ–कुञ्जाचा व नडाचा पौत्र व त्याचें पुढील अपत्य–असा होतो ( १०९२ सूत्र ). परंतु कुञ्जाचें व नडाचें युवापत्य हा अर्थ दाखवावयाचा असल्यास कुञ्ज व नड या शब्दांचीं गोत्रापत्यप्रत्ययान्त अशीं जीं 'कौञ्जायन्यः व नाडायनः' हीं रूपें त्यांहूनच युवापत्यार्थी प्रत्यय होतात. युवापत्य स्त्री असेल तर तेथें मूळ शब्दांहून फक्त गोत्रापत्यार्थी प्रत्यय करून त्याहून स्त्रीलिंगद्योतनार्थ स्त्री प्रत्यय करावा ( १०९४ सूत्र ). जसें गर्गस्य युवापत्यम् = गार्ग्यायणः ( ११०२ सूत्र ). येथें 'गर्गस्य गोत्रापत्यं = गार्ग्यः' असें गोत्र प्रत्ययान्त रूप झाल्यावर त्याहून युवापत्यार्थी प्रत्यय झाला आहे. परंतु गार्ग्याचें युवापत्य स्त्री असल्यास तेथें गार्ग्य शब्दाहून युवापत्यार्थी प्रत्यय होत नाहीं. फक्त गार्ग्य या गोत्र प्रत्ययान्त शब्दाहून स्त्रीलिंगद्योतक 'ङीष्' होऊन गार्गी असें रूप बनतें. यासंबंधानें कौमुदींतील ४७१ पासून ४७५ पर्यंतचीं सूत्रें महत्त्वाचीं आहेत.

गोत्रप्रत्ययासंबंधानें वर निर्दिष्ट केलेला नियम असल्यामुळें मूळच्या गोत्रप्रवर्तकापासून तिसऱ्या पिढीनंतरची कोणतीही पिढी दाखवावयाची तर मूळ गोत्रप्रवर्तकवाचक शब्दाहून एकच गोत्रप्रत्यय होऊन त्या रूपानें मूळप्रवर्तकापासून तिसरी पिढी व विसावी पिढी ( उदाहरणार्थ ) दाखविली जाते. त्यामुळें पुराणांतून प्रसिद्ध असलेला एखादा मुनि त्याच्या मूळ गोत्रप्रवर्तकापासून कितव्या पिढीचा आहे हें प्रत्ययावरून नक्की सांगतां येत नाहीं.

आर्यावर्तीत असे कांहीं देश होते कीं, ज्या क्षत्रिय जातींनीं त्या देशांत वसाहत केली त्यांच्या नांवांनीं ते देश प्रसिद्ध झाले व त्यांचीं जीं नांवें तींच त्या देशांचीं नांवें झालीं. जसें इक्ष्वाकु, पञ्चाल, पूरु, पाण्डु, साल्व, गन्धार, अङ्ग, वङ्ग सुम्ह, मगध, कलिङ्ग, सूरमस, अम्बष्ठ, सौवीर, अवन्ति, कोसल, कुरु, निषध, प्रत्यग्रथ, कलकूट, अश्मक, कम्बोज, चोल, शक, केरल, यवन, कुन्ति, शूरसेन, मद्र, विदर्भ, भर्ग, करूश, केकय, कश्मीर, सुस्थाल, उरश, यौधेय, शौक्रेय, शौभ्रेय, त्रिगर्त, भरत, उशीनर वगैरे. यापैकीं पञ्चाल, विदर्भ, अङ्ग, वङ्ग, व मगध हे प्राच्य देश आहेत व बाकीचे उदीच्य आहेत असें म्हणण्यास हरकत नाहीं. वरील देशांचे

राजे असा अर्थ दाखवावयाचा असल्यास जे प्रत्यय व्हावयाचे तेच प्रत्यय लावून जीं रूपें बनतात त्यांचा अर्थ–त्या राजाचीं अपत्यें–असाही होतो.

पाणिनीनें 'निवास व अभिजन' हे दोन शब्द निरनिराळ्या अर्थांनीं वापरलेले आहेत. निवास म्हणजे रहाण्याचें स्थल व अभिजन म्हणजे त्याचे पूर्वज ज्या स्थलीं रहात होते तें स्थल. एका देशांतील लोक दुसऱ्या देशांत रहाण्यास गेले तरी त्या लोकांचे पूर्वज त्या एका देशांत पूर्वी एकावेळीं रहात होते व त्यांचे वंशज दुसऱ्या देशांत राहतात असें दाखविण्याकरितां पाणिनीनें कांहीं सूत्रें केलीं आहेत तीं सिद्धांत कौमुदींत १४७० सूत्रापासून आहेत. त्यावरून पाणिनीच्या वेळीं एका प्रांतांतून जाऊन दुसऱ्या प्रांतांत वसाहत करून रहाणारे लोक होते असें दिसतें. अशा वसाहती करून रहाणाऱ्या लोकांचे समुदाय किंवा गण सिद्धान्त कौमुदींतील १४७२ व १४७३ या सूत्रांत दिले आहेत तेः—'शण्डिकादिगण, सिंध्वादिगण व तक्षशिलादिगण' हे होत. तूदीं, शलातुर, वर्मती आणि कूचवार हे ग्रामवाचक शब्द १४७४ व्या सूत्रांत दिले आहेत. पाणिनीला शालातुरीयः असें म्हटलें आहे. यावरून त्याचे पूर्वज शलातुरग्रामांत पूर्वी रहात होते. परंतु तो स्वतः तेथें रहात नव्हता असा अर्थ शालातुरीयः या शब्दांवरून निघतो.

'वर्णु' नांवाचा एक नद होता त्याच्या आसपास असलेल्या भू-भागाला वर्णु असेंच नांव होतें. त्या भू-भागांत कन्था गालिचे वगैरे जिन्नस चांगले होत होते (१३२३ सूत्र).

मद्र देशाचे पूर्वमद्र व अपरमद्र असे दोन भाग होते ( १३२९ सूत्र ).

पाणिनीनें देश व जनपद या शब्दाच्या अर्थांत फरक केलेला आहे. देश म्हणजे ज्यांच्या मर्यादा अनिर्णीत आहेत असा भू-भाग व जनपद म्हणजे ज्यांच्या मर्यादा निर्णीत आहेत असा प्रदेश.

जनपदांमध्यें उदीच्य जनपद व प्राक् जनपद असे भेद आहेत.

उदीच्य जनपदांतील कांहीं ग्रामवाचक शब्द प्रस्थ या शब्दानें अन्त पावलेले असत. पलदी, परिषद, रोमक, वाहीक, कलकीट, बहुकीट, जालकीट, नैकती, शूरसेन, गोमती, पटच्चर, उदपान, यकृल्लोम हे ग्राम उदच्यि जनपदांतील आहेत. यांपैकीं कांहीं नांवें जनपदवाचक आहेत असें वाटतें.

भरत हा प्राक् जनपद आहे. एणीपचन, गोनर्द, भोजकट हे प्राक् जनपदस्थ भू–भाग आहेत. अहिच्छत्र व कान्यकुब्ज हीं नांवें प्राक्जनपदस्थ नगरांचीं आहेत. १३४० सूत्रांतील काश्यादिगणांत कांहीं शब्द आहेत ते प्राक् जनपद व देश आहेत.

१३५१ सूत्रांतील धूमादिगणांत नगर–ग्राम–जनपदवाचक शब्द आहेत.

पाणिनीच्या वेळीं हिंदुस्थानांत आपला देश हाच ज्यांचा सर्व व्यवहारांत एकमेवाद्वितीय असा विषय होता असे लोक व देश होते हे दाखविण्याकरितां त्यानें

सि. कौ. तील १२६१, १२६२ व १२६३ हीं सूत्रें केलीं असावीं असें वाटतें. १२६१ सूत्रांतील 'विषय' हा शब्द 'अत्यंत परिशीलन करणें' या अर्थी पाणिनीनें वापरला आहे असें भट्टोजी दीक्षितांचें म्हणणें आहे. देशांचें अत्यंत परिशीलन करणें म्हणजे देशाबद्दल अभिमान बाळगून त्या अभिमानानें देशकार्यें किंवा देश-व्यवहार करणें असाच अर्थ करणें सयुक्तिक आहे. अमक्याचा अमका देश हा अर्थ दाखविण्याकरितां पाणिनीनें कौमुदींतील १४६९, १४७० वगैरे निराळीं सूत्रें केले-लींच आहेत. अत्यंत देशाभिमानी लोक ज्या देशांत रहात होते, अशा देशांचीं नांवें पाणिनीनें सि. कौ. तील १२६२ सूत्रांतील राजन्यादिगण व १२६३ सूत्रांतील भोरि-क्यादि व ऐषुकार्यादिगण यांत दिलेलीं आहेत. राजन्यादिगणांतील जालंधरायण याचें वर्णसादृश्य जालंदर-प्रांताशीं दिसतें व ऐषुकारिगणांतील 'सारस्यायन किंवा सार-सायन' याचें आशियामायनर मधील 'साराझिन्स' या पूर्वीं प्रसिद्धी पावलेल्या शब्दाशीं व खाडायन याचें सादृश्य 'खालडियन' या शब्दाशीं आहे. यावरून या तीन गणांत सांगितलेले देश व लोक पंजाब, अफगाणिस्तान, बलुचिस्तान, इराण, आशिया-मायनर या प्रांतांतील असावेत असें वाटतें.

पाणिनीच्या सूत्रांवरून पाहतां हिंदुस्थानांतील देशांचीं नांवें त्या देशांस मिळालीं याचीं चार कारणें आहेत. तीं अशीं:— १ ज्या पुरुषानें एखादा देश बस-विला त्याचे नांवानें तो देश प्रसिद्ध झाला ( १२८० सूत्र ). २ अमकी विशिष्ट वस्तु ज्या देशांत उत्पन्न होते त्या वस्तुचें नांव त्या देशास पडलें (१२७९ सूत्र ). ३ ज्या विशिष्ट नांवाचे लोक देशांत रहात होते त्या लोकांचें नांव त्या देशास लागूं लागलें. ४ देशांत राहणाऱ्या लोकांच्या जाज्वल्य देशाभिमानामुळें तो देश त्या लोकांच्या नांवानें प्रसिद्धी पावला ( १२६९ सूत्र ).

शहर ज्यानें वसविलें, ग्राम ज्यानें बांधले व कूप ज्यानें खोदविले त्यांच्या नांवांनीं शहरें, ग्राम व कूप प्रसिद्ध झाले. जसें:—'कुशाम्बेन निर्वृत्ता कौशाम्बी नगरी, दात्तामित्री, वैधूमाग्री–माकन्दी' या नांवाच्या नगरी होत्या. 'दैर्धवरत्रः कूपः दान्तः कूपः' याशिवाय समीप असलेल्या प्रसिद्ध शहरांवरून, नदी-नदांवरून व अरण्यावरून दुसरें शहर, ग्राम व कूप प्रसिद्ध झाले. असें १२८२ सूत्र व त्याच्या अधिकाराखालील सूत्रें यावरून अनुमान निघतें. जसें:—'विदिशाया अदूरभवंनगरं = वैदिशम्, सैध्रकावतम्, आहिमतम्, सौवास्तवम्, इक्षुमती' वगैरे.

'विपाट् अगर विपाशा या नदीच्या उत्तरदक्षिणतीरांच्या पलीकडील प्रदेशांत पाण्याचें दुर्भिक्ष असल्यामुळें तेथें पुष्कळ कूप खोदलेले होते ( १२८६ सूत्र ).

१२९२ सूत्रांतील बलादिगणांत 'उरल' असा एक शब्द आहे. तो स्थळ किंवा प्रदेशवाचक शब्द आहे. तो स्थळ किंवा प्रदेशवाचक शब्द आहे असें म्हणण्याचें

कारणं असें कीं, त्या सूत्रानें या शब्दाहून चातुरर्थिकार्थीं 'य' प्रत्यय होतो. चातुरर्थिकार्थ म्हणजे १२८०, १२८१, १२८२ व १२७९ या चार सूत्रांनीं सांगितलेले अर्थ होत. या चार सूत्रांनीं व १२९२ सूत्रानें सांगितलेले प्रत्यय स्थलवाचक व प्रदेशवाचक शब्दांहून होणारे आहेत. यावरून 'उरल' हा शब्द प्रदेशवाचक आहे असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. आशियाखंड, युरोपखंड यांच्यामध्यें असलेला उरल पर्वत व त्या सभोंवतीं असलेला प्रदेश यांचा बोध वरील गणांतील उरल या शब्दानें होत होता काय ? अशी शंका येते.

१२८९ सूत्रांतील सुवास्त्वादिगणांत व १३०१ सूत्रांतील वरणादिगणांत पाणिनीच्या काळीं प्रसिद्ध असलेल्या शहरें, वनें व नद्या यांचे उल्लेख आहेत.

योद्ध्यांचे रथ वस्त्रादिकांनीं आच्छादिलेले असत. त्यांतही पांढरें शुभ्र लोंकरी वस्त्र व वाघाचें कातडें यांनींही ते आच्छादन केलेले असत ( १२११; १२१२; १२१३ सूत्रें ).

चैत्र, वैशाख वगैरे महिन्यांस चैत्रादि नांवें पडलीं तीं चांद्रमानाप्रमाणें चित्रादि नक्षत्रयुक्त पौर्णिमासी ज्या महिन्यांत असेल त्या महिन्याला त्या नक्षत्राच्या नांवानें ओळखावें असें सि. कौ. तील १२२३,१२२४, व १२२५ सूत्रांनीं ठरविलें आहे.

सूर्याच्या गतीस अनुसरून असलेले जे वसन्तादि ऋतु त्यांच्यासंबंधीं यथार्थ कल्पना येण्याकरतां विद्वान् मुनींनीं केलेले सिद्धांत होते असें सि. कौ. तील १२७३ सूत्रांतील वसन्तादिगणापैकीं शब्द दाखवितात.

संग्रामांत युद्ध करण्यास उपयोगी पडणारे योद्धे ज्या खेळांनीं उत्पन्न होतील असे लोक तयार करण्याचे खेळ पाणिनीच्या वेळीं खेळत असत असें १२६६ सूत्रावरून दिसतें.

इतिहासप्रसिद्ध संग्रामांस नांवें पडतात तीं दोन रीतींनीं पडतात असें १२६५ सूत्रावरून दिसतें. त्या रीति अशा:—१ संग्राम होण्यास साक्षात् कारण जें असेल त्यावरून जसें—'सुभद्रा प्रयोजनं अस्य संग्रामस्य=सौभद्रः संग्रामः' २ ज्या नांवाच्या लोकांनीं संग्राम केला त्या लोकांच्या नांवावरून— जसें— 'भरतायोद्धारोयस्यसः—भारतः संग्रामः'

हुबळी येथील विद्वान् वकील श्री. आय्. एस्. पावटे, एम्. ए., एलएल्. बी. यांनीं आपल्या वडिलांच्या साहाय्यानें Structure of the Ashtadhyayi म्हणून एक निबंध लिहिला आहे. मी हुबळीस गेल्या ऑगस्ट महिन्यांत गेल्यावेळीं त्यांनीं तो निबंध मला पहाण्यास व त्याबद्दलचें माझें मत मीं द्यावें, म्हणून दिला. श्री. पावटे यांनीं हा निबंध अत्यंत चोकसदृष्टीनें पूर्ण विचार करून, महाभाष्य, कात्यायनाचीं वार्तिकें, काशिका, व न्यास वगैरे ग्रंथांचें आलोडन करून लिहिला आहे. त्यामुळें

त्यांनीं संस्कृत व्याकरणकार पाणिनि यांनीं केलेल्या अष्टाध्यायीसंबंधानें विद्वान् लोकांच्या मनांत ज्या शंका उपस्थित होण्यासारख्या आहेत त्याबद्दलचें दिग्दर्शन, आपल्या स्वतः-च्या मतांसह केलें त्याबद्दल त्यांचे व त्यांच्या वडिलांचे उपकार मानावेत तितके थोडेच आहेत. अशा निबंधाबद्दल श्री. पावटे यांना यथोचित पारितोषिक देऊन, मुंबईच्या विश्वविद्यालयानें आपली गुणग्राहकता दाखविली याबद्दल तें विद्यालयही स्तुतीस पात्र आहे.

**मि. पावटे यांनीं अष्टाध्यायीच्या कर्तृत्वासंबंधानें जे आक्षेप घेतले आहेत, तसल्याच तऱ्हेचे आक्षेप इतर विद्वान् लोकांकडूनही येण्याचा संभव आहे. म्हणून मि. पावटे यांनीं आणलेल्या आक्षेपांनां निमित्त मात्र करून मी इतर विद्वानांकडून येणाऱ्या तसल्या तऱ्हेच्या आक्षेपांनांच हें उत्तर दिलें आहे असें समजण्यास हरकत नाहीं.**

सदरहू निबंधांत धातुपाठाचा कर्ता स्वतः पाणिनि होता कीं, दुसरा कोणी पूर्वाचार्य होता असा प्रश्न निबंधकारांनीं उत्पन्न केला आहे व त्याबद्दलचें आपलें मत त्यांनीं साधकबाधक प्रमाणें देऊन, निश्चित स्वरूपानें दिलें आहे. ( पान ३१ ) तें मत असें--

The Dh. P. does not seem to be by the author of the Ashd. but seems to be the work of a predecessor of Panini. But nevertheless the arrangement of roots in the Dh. P. clearly shows that the author of Dh. P. knew very many sutras now fonnd in the Ashd. and so arranged the roots in the Dh. P. as to serve the purposes of those sutras.

या प्रश्नाचें उत्तर देण्यापूर्वीं अष्टाध्यायीच्या पूर्वीं, संस्कृत भाषेंतील धातूंची स्थिति माझ्या मताप्रमाणें कशी होती हें दाखविणें रास्त आहे. पाणिनीच्या पूर्वी संस्कृत वाङ्मयाच्या व्याकरणाचे दोन संप्रदाय असल्याचें पाणिनीच्या अष्टाध्यायीं-तील सूत्रांवरून दिसतें.

ते संप्रदाय म्हणजे प्राच्य व उदीच्य–हे होत असें अष्टाध्यायींतील ३।१।७५, ३।१।९०, ३।४।१९, ३।४।१८, ४।१।१७ ४।१।४३, ४।१।१५७, ४।१।१५३, ४:१।१६०, ५।३।८०, ७।३।२४, ४।२।१३६, ६।२।७४, ७।३।१४, ७।३।४६, ४।२।११३, ४।२।१२०, ४।२।१२३, ५।३।९४, ५।४।१०१, ८।२।८६, ६।३।३२, ४।२।१०९, या सूत्रांवरून दिसतें. या सूत्रांतील ३।१।९, ३।४।१९ हीं सूत्रेंच फक्त धातूसंबंधानें विधान करणारीं असून बाकीचीं सूत्रें, संधि, प्रातिपदिकें, व तद्धित प्रत्यय यासंबंधीं आहेत. ३।४।१८ व ६।२।७४ या सूत्रांनीं–अलम्, खलु हे प्रतिषेधार्थी असलेले शब्द व प्राच्य देशांतील क्रीडावाचक प्रातिपदिक–यासंबंधानें विधानें केलीं आहेत. या सर्व सूत्रांवरून अनुमान केलें असतां दिसून येईल कीं, प्राच्य व उदीच्य वैयाकरणांमध्यें पाणिनीच्या वेळीं व त्याच्यापूर्वीं प्रसिद्ध असलेल्या धातुप्रक्रिये-

संबंधानें व त्यांच्या अर्थासंबंधानें वगैरे भिन्न मतें प्राच्य व उदीच्य या देशभिन्नते-मुळें पडलीं नव्हतीं. त्या दोन तऱ्हेच्या देशसमूहांतील भिन्न भिन्न संप्रदायामुळें संधि-नियमासंबंधानें अगदीं थोडी भिन्नता ( ८।२।८६ ), 'स्त्री' प्रत्ययासंबंधानें त्यापेक्षां जास्त भिन्नता ( ४।१।१७, ४।४३, ७।३।४६ ) व प्रातिपदिकांहून होणाऱ्या तद्धित प्रत्ययासंबंधानें पुष्कळ जास्त भिन्नता असलेली दृष्टीस पडते.

अष्टाध्यायींतील १।२।२५ ( तृषिमृषिकृषेःकाश्यपस्य ) ७।३।९९ ( अड्गार्ग्यगाल-वयोः ) ७।४।१०० ( अदःसर्वेषाम् ) या तीन सूत्रांत उल्लेखिलेल्या ऋषिश्रेष्ठांची तृष्, मृष्, कृष्, रुद्, स्वप्, श्वस्, अन्, जक्ष्–या धातूंच्या कांहीं रूपांसंबंधानें मतभिन्नता असलेली पाणिनीनें वरील सूत्रांत नमूद केली आहे. 'अद्' धातुसंबंधानें, पाणिनीच्या काळापूर्वी होऊन गेलेले सर्व वैयाकरण व पाणिनि या सर्वांच्या मतानें जी एकच गोष्ट सिद्ध झाली तीच पाणिनीनें ७।३।१८० ( अदः सर्वेषाम् ) या सूत्रांत नमूद केली. या तीन सूत्रांशिवाय असलेल्या 'तिङन्त व कृदन्त' प्रकरणांत वर दिलेल्या धातूंशिवाय इतर धातूंच्या प्रक्रियेसंबंधानें मतभिन्नता असलेली पाणिनीनें दाखविलेली नाहीं. आपल्या व पूर्वी होऊन गेलेल्या वैयाकरणांच्या मतांत भिन्नता असल्यास ती स्पष्टपणें नमूद करण्याचें ब्रीद पाणिनीनें अंगिकारिलें होतें असें वर दिलेल्या व खालीं दिलेल्या सूत्रांवरून म्हणण्यास हरकत नाहीं. तीं सूत्रें अशीं:—१।१।१६ ( **संबुद्धौ शाकल्यस्ये.)** ६।१।९२ ( **वासुप्यापिशलेः** ) ८।४।५० ( **त्रिप्रभृतिषु शाकटायनस्य** ), ८।४।५१ ( **सर्वत्र शाकल्यस्य** ) ८।४।५२ ( **दीर्घादाचार्याणाम्** ) ८।३।१९ ( **लोपः शाकल्यस्य** ) ६।१।१२३ ( **अवङ्स्फोटायनस्य** ) ६।१।१२७ ( **इकोऽसवर्णे शाकल्यस्य...**), ६।१।१३० ( **ईचाक्रवर्मणस्य** ), ६।३।४९ ( **विभाषाचत्वारिंशत्-प्रभृतौ सर्वेषाम्** ) ६।३।६१ ( **इको गालवस्य** ), ७।१।७४ ( **तृतीयादिषु गालवस्य** ), ७।३।४९ ( **आदाचार्याणाम्** ), ८।३।२० ( **ओतोगार्ग्यस्य** ), ८।३।२२ (**हलिसर्वेषाम्**) ८।४।२७ ( **नोदात्त स्वरितोदयमगार्ग्यकाश्यपगालवानाम्** ).

वरील सर्व सूत्रांत मिळून १ शाकल्य, २ काश्यप, ३ आपिशलि, ४ शाकटायन, ५ स्फोटायन, ६ चाक्रवर्मण, ७ गालव, ८ गार्ग्य असे आठ मुनि व्याकरणकार पाणिनीच्या पूर्वी होऊन गेले होते असें दिसतें. वरील सूत्रांतील दोन सूत्रांत (६।३।४९; ८।३।२२) सर्वेषाम् असें पद आहे. त्याचा अर्थ—सर्वेषांमतेन–असा सि. कौ.त भट्टोजी दीक्षितांनीं केला आहे. सर्व म्हणजे वरील सर्व मुनि व पाणिनीनें ज्या गुरूजवळ अध्ययन केलें तो गुरु–असा अर्थ केल्यास तो चूक होईल असें वाटत नाहीं. ८।४।५२ व ७।३।४९ या सूत्रांत 'आचार्याणाम्' असें पद आहे. तें पाणिनीनें आपल्या गुरूबद्दल बहुमानार्थी बहुवचन योजून घातलें असावें असें वाटतें. गुरूच्या नांवाचा उल्लेख न करण्याचें कारण–आत्मनाम गुरोर्नाम श्रेयस्कामो न गृह्णीयात्–हें असावें.

पाणिनीनें वेदांतील वाङ्मयाच्या व्याकरणासंबंधानें जे नियम सूत्रबद्ध केले आहेत ते त्यानें अष्टाध्यायीचे भाग कल्पून अष्टाध्यायींतच घातले आहेत. जसें ४ । ४ । १०५ **सभाया यः** या सूत्राच्या नंतर लागून ४ । ४ । १०६ **ढश्छन्दसि** हें सूत्र वेदासंबंधानें घातलें. ४ । ४ । १०९ या सूत्रानंतर ४ । ४ । ११० **भवे छंदसि**. हें सूत्र घातलें. अशीं सूत्रें अष्टाध्यायींत सर्वत्र आहेत. पाणिनीच्या पूर्वीं जे व्याकरणकार होऊन गेले ते वेदकालाला पाणिनीपेक्षां जास्त जवळचे होते असें म्हणण्यांत कांहीं वावगेपणा नाहीं. त्यांनीं केलेल्या व्याकरणांत त्यांच्या त्यांच्या काळांतील लौकिक संस्कृतभाषेच्या व्याकरणापेक्षां वैदिक वाङ्मयांतील शब्दांचें व्याकरण जास्त असणेचा संभव होता यांत कांहीं शंका नाहीं. त्यांनीं आपआपल्या व्याकरणानुसार बनविलेल्या शब्दांत उदात्त, अनुदात्त, व स्वरित हे स्वर स्पष्टपणें श्रवणगोचर होतील अशा रीतीनें त्यांनीं ते बनविलेले होते. पाणिनीच्या वेळीं लौकिक संस्कृत भाषेचा फैलाव जास्त होऊन त्या भाषेंतील शब्दांमधील पूर्वीच्या काळीं असलेल्या उदात्तादि स्वरांबद्दल दुसरी तऱ्हा प्रसृत झाल्यामुळें उदात्तादि स्वरयुक्त शब्द बनाविण्याची जरूरी राहिली नव्हती. पाणिनीच्या अष्टाध्यायींत लौकिक संस्कृत शब्दांचें व्याकरण वैदिक संस्कृत व्याकरणापेक्षां पुष्कळ जास्त प्रमाणांत आढळतें. पाणिनीच्या पूर्वीं व्याकरणकारांनीं जे वैदिक वाङ्मयांतील शब्द लौकिक संस्कृत वाङ्मयांत योजलेले पाहिले होते त्यांतील बरेच शब्द त्यांना असे दिसले कीं, त्यांतील मूळधातु, प्रत्यय वगैरेसंबंधानें त्यांच्यापैकीं कांहींना निश्चित स्वरूपाचे नियम करितां येत नव्हते. दुसरे कांहीं मुनि असे होते कीं, त्यांनीं कांहीं शब्दांची व्युत्पत्ति लावून दाखविली. पाणिनीनें अष्टाध्यायी करण्याच्या पूर्वीं वेदवाङ्मयांतील जे शब्द लौकिकवाङ्मयांत आले होते त्यांतील बरेच शब्द अव्युत्पन्न म्हणून अनिर्णीत स्थितींत होते व कांहीं शब्दांच्या व्युत्पत्तीबद्दलचे प्रयत्न चालू होते. संस्कृत वाङ्मयांतील सर्व शब्द व्युत्पन्नच असले पाहिजेत असें पाणिनीचें मत असावें असें वाटतें. अव्युत्पन्न स्थितींत असलेले म्हणून बरेच शब्द गणपाठांत दिलेले आहेत. हे शब्द म्हणजे आर्यावर्तांत फारच प्राचीन काळापासून पाणिनीच्या काळापर्यंत झालेल्या गोत्रप्रवर्तकांचीं नांवें, देश, प्रान्त, जनपद, नगरें, ग्राम, लोकांच्या उदरनिर्वाहाचीं साधनें, लोकस्थिति, वगैरे अर्थ दाखविणाऱ्या पदार्थांचीं नांवें आहेत. अष्टाध्यायीच्या पूर्वीं या अव्युत्पन्न स्थितींत असलेल्या बऱ्याच शब्दांना व्युत्पन्न स्थितींत आणण्याचा व्यापक प्रयत्न झालेला नव्हता. त्या शब्दांची व्युत्पत्ति लावण्यास कोणत्याप्रकारें यत्न करावा याचें दिग्दर्शन पाणिनीनें अष्टाध्यायीच्या ३।१।१३४ (**नन्दिग्रहिपचादिभ्योल्युणिन्यचः**) व ३।३।१०४ (**षिद्भिदादिभ्योऽङ्**) वगैरेसारख्या सूत्रांनीं करून दिलें आहे. या दोन सूत्रांकरतांच ‘नन्दादि, ग्रहादि,

पचादि, व भिदादि' धातूंना, धातुपाठांत पठन केलेल्या धातूंतून निराळे काढून व त्यांचे निराळे गण कल्पून त्यांपासून या सूत्रांनीं सांगितलेले प्रत्यय करून जीं रूपें, अव्युत्पन्न म्हणून मानिलेल्या शब्दांप्रमाणें झालीं, त्यांचा पाठ आपल्या गणपाठांत पाणिनीनेंच केला. पचादिगणांत नुसते धातूच नसून कांहीं प्रातिपदिकेंही आहेत हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. ३।३।१०४ **षिद्भिदादिभ्योऽङ्**–हें सूत्र अष्टाध्यायीच्या तिसऱ्या अध्यायांतील तिसऱ्या पादाच्या **३।३।९४ स्त्रियांक्तिन्** या सूत्रांतील 'स्त्रियाम्'–या अधिकारांतील आहे. षित् धातू व भिदादि गणांतील धातू यांहून या सूत्रानें केलेल्या 'अङ्' प्रत्ययाचें फल, याप्रमाणें होणाऱ्या शब्दांना स्त्रीत्व येतें हें होय. स्त्रीत्वाचा द्योतक प्रत्यय ४।१।४१ **षिद्गौरादिभ्यश्च** या सूत्रानें सांगितलेला 'ङीष्' हा आहे परंतु तो येथें न होतां ४।१।४ **अजाद्यतष्टाप्**–या सूत्रानें 'टाप्' होतो. याचें कारण 'षिद्भिदादिभ्योऽङ्'–या सूत्रानें बनविलेले शब्द अव्युत्पन्न होत असें पाणिनीच्या पूर्वकाळीं ठरलेलें होतें. म्हणूनच पाणिनीनें त्या शब्दांना स्त्रीत्व व 'अङन्तत्वास्तव टाप्' हीं दोन नवीन कार्यें साधण्याकरितां अङ्विधायक असें हें सूत्र करून त्याला स्त्रियाम्–या अधिकाराच्या कक्षेंत घातलें. वरील विवेचनावरून अष्टाध्यायीचा कर्ता व धातुपाठाचा कर्ता निरनिराळे होते या म्हणण्यास वरील दोन सूत्रांचा आधार मिळतो असें आय्. एस्. पावटे वकील ( हुबळी ) यांनीं आपल्या Structure of the Ashtadhyayi या निबंधांत १४ व्या पानाच्या अखेरीस जें विधान केलें आहे तें सप्रमाण आहे असें म्हणतां येत नाहीं.

अव्युत्पन्न म्हणून पाणिनीच्या पूर्वीं जे शब्द मानले गेले होते ते विशेष पद्धतीनें व्युत्पन्न आहेत असें दाखवितां येतें असें पाणिनीनें वरील दोन सूत्रें करून दाखविलें. व त्यानेंच आपल्या हयातींत, आपल्या सतीर्थ्याकडून किंवा शिष्याकडून दुसऱ्या अव्युत्पन्न म्हणून मानल्या गेलेल्या शब्दांबद्दल, सूत्रबद्ध नियम करण्याचा प्रयत्न करविला असावा असें वाटतें. त्या प्रयत्नाचें फल उणादिप्रत्यय प्रकरण होय असें आमचें मत आहे. उणादिप्रत्यय प्रकरण पाणिनीच्या सतीर्थ्यानें त्याचे हयातींत वरील दोन सूत्रांस अनुसरून त्याच्याच प्रेरणेनें केलें असावें असें आमचें म्हणणें आहे. त्याचें कारण असें–पाणिनीनें अष्टाध्यायींत, उणादिप्रत्ययप्रकरणास आपली मान्यता असल्याचें सुचविणारीं ३।३।१, ३।३।२ वगैरे सूत्रें, गोवलीं इतकेंच नव्हे तर पाणिनीनें अष्टाध्यायींत गुणवृद्धि विधायक व निषेधक जीं सूत्रें व नियम केले आहेत तीं सूत्रें व नियम उणादि प्रत्ययांस बहुतांशानें लागू होतील अशी उणादिप्रत्ययांची रचना केलेली असल्याचें त्या प्रकरणांत दिसून येतें. उणादि प्रत्ययांनीं साधलेले शब्द बहुतांशीं संज्ञा आहेत. यावरून गणपाठांतील शब्दांप्रमाणें, उणादि प्रत्ययांनीं साधलेले शब्दही पाणिनीच्या पूर्वीं अव्युत्पन्न स्थितींत होते असें मानण्यास कांहीं हरकत नाहीं. उणादि प्रत्ययप्रकरणाचा कर्ता अमका असें म्हणण्यास कोठेंही खात्रीचा आधार

नाहीं. याकरितां व वर दिलेल्या कारणांकरितां पाणिनीच्या एखाद्या सतीर्थ्यानें किंवा शिष्यानें, पाणिनीच्या प्रेरणेस अनुसरून पाणिनीच्या हयातींतच उणादिप्रकरण रचलें असें अनुमान करण्यास कांहीं हरकत नाहीं.

### गणपाठ.

अष्टाध्यायींतील ज्या सूत्रांत प्रातिपदिकांहून होणाऱ्या प्रत्ययादिकांसंबंधानें विधानें आलेलीं आहेत त्यांपैकीं बऱ्याच सूत्रांत प्रातिपदिकांचे समूह दिलेले आहेत. ते समूह आदि, प्रभृति–सारख्या शब्दांनीं दाखविलेले असतात. जसें १।१।२७, १।१।३७, १।५।५७, १।४।५८, १।४।६१, १।४।७४, २।२।३१ वगैरे. अशा प्रातिपदिक समूहांना गण असें नांव देऊन ते सर्व गण एकत्र करून सांगितलेले आहेत. त्या एकत्रीकरणास गणपाठ असें म्हणतात. गणपाठांत फक्त प्रातिपदिकांचा समावेश केलेला आहे. प्रातिपदिकांत धातूंचा व प्रत्ययांचा समावेश होऊं शकत नाहीं. ( १।२।४५ **अर्थवदधातुरप्रत्ययः प्रातिपदिकम्** ). असें असलें तरी कृदन्त–तद्धितान्त–शब्द व समास यांनाही प्रातिपदिक संज्ञा होते ( १।२।४६ **कृत्तद्धित–समासाश्च** ) असें या सूत्रावरून दिसतें. गणपाठांत आलेले शब्द अष्टाध्यायींतील सूत्रांच्या अनुक्रमानें दिलेले आहेत म्हणून गणपाठाचेही अध्याय आठ व प्रत्येक अध्यायाचे चारचार पाद–या क्रमानें दिलेले आहेत. गणपाठांत दिलेले शब्द अव्युत्पन्न आहेत असें मानिलें गेलें आहे. अव्युत्पन्न शब्द म्हणजे जे शब्द अमक्या विशिष्ट धातूपासून किंवा मूळरूपाहून अमकीं विशिष्ट प्रत्ययादि कार्यें होऊन झालेले आहेत असें दाखवितां येत नाहीं असे शब्द. गणपाठांत दिलेल्या शब्दांपैकीं पुष्कळ शब्द असे आहेत कीं त्यांचे प्रकृतिप्रत्यय वगैरे कांहीं सांगतां येत नाहीं. हे शब्द खरोखर अव्युत्पन्न आहेत असें पाणिनीचें मत नसावें असें वाटतें म्हणूनच त्यानें 'नन्दनः वाशनः, ग्राही, उत्साही, भिदा, छिदा,'–वगैरेसारख्या अव्युत्पन्न म्हणून मानिले गेलेल्या प्रातिपदिकांची व्युत्पत्ति ३।१।१३४ व ३।३।१०४ सारख्या सूत्रांनीं दाखविण्याचा यत्न केला आहे. उणादिप्रत्ययांनीं साधलेलीं रूपें हीं पाणिनीच्या पूर्वी अव्युत्पन्न म्हणून मानिलीं जात असावींत असें वाटतें.

गणपाठांतील पुष्कळ गण आकृतिगण आहेत. आकृतिगण म्हणजे एखाद्या विशिष्ट गणांत नमूद असलेल्या शब्दांप्रमाणें ज्या दुसऱ्या एखाद्या शब्दाला त्या गणाला सांगितलेलें कार्य होण्याची पात्रता आहे, तो शब्द त्या गणांत आहे असें समजणें; असें ज्या गणासंबंधानें करितां येईल तो आकृतिगण होय. ज्या गणसूत्राखालीं कात्यायनाच्या वार्तिकांनीं आणखी कांहीं शब्द त्या सूत्रांत समाविष्ट व्हावे असें म्हटलें आहे, ते शब्द त्या गणांत समाविष्ट झालेले दिसतात. आकृतिगणांत पुष्कळ नवीन शब्द समाविष्ट झालेले आहेत यांत शंका नाहीं. एकंदरींत हल्लींचा गणपाठ पाणिनीच्या वेळच्या शुद्ध स्वरूपांत आहे असें म्हणतां येत नाहीं.

पाणिनीच्या अष्टाध्यायींतील आदि, प्रभृति वगैरे शब्दांनीं दाखविलेले शब्द व समूहयुक्त प्रातिपदिक सूत्रें व गणपाठ यांच्यामध्यें असा निकट संबंध आहे कीं, एकाच्या अस्तित्वाशिवाय दुसऱ्याचें अस्तित्व असणें शक्य नाहीं असें आमचें ठाम मत आहे. याचा तात्पर्यार्थ असा कीं, पाणिनी हाच गणपाठाचा व अष्टाध्यायीचा कर्ता आहे. माझे विधानाच्या पुष्ट्यर्थ व मि. पावटे यांच्या विधानाच्या खंडनार्थ कारणें आहेत तीं अशीं:–( १ ) अष्टाध्यायींतील २।१।१७ **तिष्ठद्गुप्रभृतीनिच**–या सूत्रांत जो तिष्ठद्गुप्रभृति गण दिला आहे तो गणपाठांत पाहिला असतां त्यांत–**इच् प्रत्ययः समासान्तः**–असा पाठ दिला आहे. हा समासान्त इच् प्रत्यय– पाणिनीच्या अष्टाध्यायींतील ५।४।१२७ **इच् कर्मव्यतिहारे** व ५।४।१२८ **द्विदण्ड्यादिभ्यश्च**– या दोन सूत्रांनीं सांगितलेला इच् प्रत्यय होय. **प्रत्ययग्रहणे तदन्ता ग्राह्याः**– या परिभाषेप्रमाणें इच् प्रत्यय–या शब्दाच्या उच्चारानें इच् प्रत्ययान्त जे केशाकेशि, दण्डादण्डि वगैरे शब्द ते येतात. आमच्या वरील विधानास हा फारच मोठा पुरावा आहे. पाणिनीच्या या सूत्रांच्या मदतीशिवाय गणपाठांतील तिष्ठद्गुप्रभृतिगण पूर्ण होणें शक्य नाहीं. ( २ ) २।२।३१ या अष्टाध्यायींतील सूत्रांत राजदन्तादिगण आहे तो गणपाठांत पाहिला असतां त्यांतील अग्रेवणम्–हा शब्द अष्टाध्यायींतील ८।४।४ या सूत्रानें साधलेला आहे. त्याच गणांत वृद्धिगुणौ व गुणवृद्धी असे शब्द दिलेले आहेत. अष्टाध्यायींतील **वृद्धिरादैच् व अदेङ्गुणः**–या एकास एक लागून असलेल्या सूत्रांनीं गुण–वृद्धि या शब्दांचें सान्निध्य व सख्य इतकें दृढ समजलें जात होतें कीं, दृढसख्य दाखविण्यास या दोन शब्दांचा प्रयोग म्हणीप्रमाणें होत असे. ( ३ ) १।१।३७ सूत्रांत स्वरादिगणाचा निर्देश आहे. तो गणपाठांत पाहिला असतां– **तसिलादयस्तद्धिता एधाच्पर्यन्ताः, शस्तसी कृत्वसुच्, सुच्, आस्थालौ, च्व्यर्थाश्च**–हे शब्द आढळतात. हे सर्व प्रत्यय आहेत व ते पाणिनीनें उत्पन्न केलेले आहेत. त्यांचीं विधानें करणारीं सूत्रें पाणिनिकृत अष्टाध्यायींत आहेत. 'प्रत्ययग्रहणे तदन्ता ग्राह्याः'–या परिभाषेप्रमाणें ते प्रत्यय ज्यांहून झालेले आहेत ते शब्द या गणांत घ्यावयाचे आहेत. हे शब्द अव्ययसंज्ञक होतात असें १।१।३७ या अष्टाध्यायींतील सूत्रानें ठरविलें आहे. व ते शब्द स्वरादि गणांत आहेत असें गणपाठानें ठरविलें आहे. हे सर्व तद्धित प्रत्यय आहेत. त्यांपैकीं तसिलादि प्रत्यय अष्टाध्यायींतील ५।३।७ सूत्रापासून ५।३।४६ सूत्राच्या अन्तापर्यंत आहेत. च्व्यर्थ प्रत्यय ५।४।५० सूत्रापासून ५।४।६७ सूत्राच्या अखेरपर्यंत आहेत. त्याचप्रमाणें अष्टाध्यायींतील शस्, तस्, कृत्वसुच्, सुच्, आस्, थाल्, क्त्वा, तोसुन्, कसुन्, आणि वत्–हे प्रत्यय ज्याच्या अंतीं आहेत ते सर्व शब्द स्वरादिगणांत येतात असें गणपाठांतील स्वरादिगण पाहिला असतां दिसून येईल. ( ४ ) गणपाठांतील चौथ्या अध्यायांत बह्वादिगण दिलेला आहे. त्यांत १ **कृदिकारादक्तिनः**, २ **सर्वतोऽक्तिन्नर्थादित्येके** –अशीं दोन

गणसूत्रें आहेत. पहिल्या गणसूत्रांतील अक्तिनः हें व दुसऱ्या गणसूत्रांतील अक्तिन्नर्थात् हें अशीं दोन पदें महत्त्वाचीं आहेत. त्यांतील क्तिन् व क्तिन्नर्थक प्रत्यय अष्टाध्यायीच्या ३।३।९४ या सूत्रापासून ३।३।१०८ या सूत्राच्या अखेरपर्यंत दिलेले आहेत. हीं दोन गणसूत्रें गणपाठांत नसतीं, तर पद्धति, अङ्कति, अश्वति, शक्ति, यष्टि, मुनि या शब्दांप्रमाणें कृति, स्तुति, व्रज्या, इज्या—यांसारखे शब्दही बह्वादिगणांत येऊन त्यांहून विकल्पानें ङीष् झाला असता तो या गणसूत्रांमुळें होत नाहीं, म्हणूनच पाणिनीनें हीं गणसूत्रें बह्वादि गणांत घातलीं. त्या योगानें क्तिन् व क्तिन्नर्थक—प्रत्ययांवाचून इतर इकारान्त कृत् प्रत्यय असलेले स्त्रीलिंगी शब्द बह्वादिगणांत येऊं शकले. ( ५ ) ४।२।१३८ या सूत्रांत गहादिगण दिला आहे. गणपाठांतील गहादिगण पाहिला असतां त्यांत **मुखपार्श्वतसो र्लोपः** असें गणसूत्र दिलेलें आढळेल. मुख व पार्श्व या शब्दांहून सप्तम्यर्थीं कोणत्याही सूत्रानें तस् प्रत्यय सांगितला नसला तरी १।२।३२ **तस्यादित—मुदात्तमर्ध-हस्वम्**—या सूत्रांतील पाणिनीच्या आदितः या प्रयोगावरून मुख व पार्श्व या शब्दांहून झालेला तस् प्रत्ययाचा लोप वरील गणसूत्रानें करून पाणिनीनें मुखतीयम्=पार्श्वतीयम्—अशा रूपांची सिद्धि केली आहे. या पाणिनीच्या इष्टसिद्धीकरितांच कांहीं कालानें कात्यायनानें ५ । ४ । ४४ या सूत्राखालीं **आद्या-दिभ्य उपसंख्यानम्**—असें वार्तिक करून आद्यादिगणांत पार्श्व शब्दाचा पाठ केला व मुख शब्दाच्या समावेशाकरितां त्यानें आद्यादिगण हा आकृति गण केला. ( ६ ) ६ । ३ । ३५ ह्या अष्टाध्यायींतील सूत्रांत तसिलादिगण दिला आहे. तसिलादिगण गणपाठांत पाहिला असतां त्यांत तसिल, त्रल्, तरप्, तमप्, चरट्, जातीयर्, कल्पप्, तिल्, आणि थ्यन् हे शब्द येतात असें दिसेल. हे शब्द दुसरे कांहीं नसून तद्धित प्रत्यय आहेत. व हे तद्धित प्रत्यय अष्टाध्यायीं-तील सूत्रांत सांपडतात. इतकेंच नव्हे तर ते ६ । ३ । ३५ सूत्रांत सांगितल्याप्रमाणें तसिल् प्रत्ययाचें विधान करणाऱ्या ५ । ३ । ७ या सूत्रापासून कृत्वसुच् प्रत्ययाचें विधान करणाऱ्या ५ । ४ । १७ पर्यंतच आहेत. पाणिनीच्या पूर्वाचार्यांनीं जर गणपाठ तयार केला होता असा पूर्वपक्ष खरा मानिला तर तसिल् आदि प्रत्ययांची स्थल-मर्यादा इतक्या बिनचूकरीतीनें घालणें पूर्वाचार्यांना शक्य झालें नसतें; याचें कारण असला एकादा ग्रंथ पाणिनीच्या पूर्वकाळीं अस्तिवांत नव्हता, हें होय. परंतु तें करणें पाणिनीला शक्य झालें याचें कारण गणपाठ व अष्टाध्यायी या दोहींचा कर्ता तोच होता. वरील सर्व प्रत्ययांचीं विधानें करणारीं एकंदर सूत्रें १२८ आहेत. वरील ६।३।३५ सूत्रावरून, ( १ ) तसिल् आरंभींचा प्रत्यय व कृत्वसुच् हा शेवटचा प्रत्यय ज्यांत आहे असा भाग—हें एक अनुमान व ( २ ) या दोन प्रत्ययांनीं दाखवि-लेल्या भागांत गणपाठांत दिलेले दुसरे कांहीं प्रत्यय हें दुसरें अनुमान—हीं दोन्हीं अनुमानें अष्टाध्यायीसंबंधानेंच खरीं ठरतात. ( ७ ) ६।४।१५३ या अष्टाध्यायींतील

सूत्रांत बिल्वकादिगणाचा निर्देश आहे. या बिल्वकादिगणासंबंधानें गणपाठांत असें वाक्य आहे–**नडाद्यन्तर्गणो बिल्वादिः छविधानार्थं ये नडादयस्ते यदा छसंनियोगे कृतकुगागमास्ते बिल्वकादयः**–या वाक्याचा तात्पर्यार्थ असा–नडादिगणाचा अन्तर्गण बिल्वादिगण आहे. बिल्वादिगणांतील शब्दांना कुक् आगम व त्याहून छ प्रत्यय केला म्हणजे जीं रूपें बनतात तीं बिल्वकादिगण होय. वरील वाक्यांतील **छसंनियोगे कृतकुगागमाः**–हे शब्द महत्त्वाचे आहेत. याचें कारण त्या शब्दांनीं पाणिनिकृत अष्टाध्यायींतील एका सूत्राकडे बोट दाखविलें आहे. तें ४।२।९१ **नडादीनां कुक्च**–हें सूत्र होय. या सूत्रानें नडादिगणांतील शब्दाहून छ प्रत्यय व तो पुढें असतां त्या शब्दांना कुक् असा आगम होतो असें विधान केलें आहे. नडादिगणांत बिल्वादिगण हा अन्तर्गण आहे. अष्टाध्यायीशिवाय नडादिगणांतील शब्दासंबंधानें छ प्रत्यय व त्याच्या संनियोगानें कुक्–आगम–या उभयतांचीं विधानें करणारें दुसरें शास्त्र नाहीं. ( ८ ) गणपाठ अष्टाध्यायीच्या कर्त्याच्या ( पाणिनीच्या ) पूर्वी झालेल्या आचार्यांनीं केला होता व तो पाणिनीनें केला नव्हता असें, ज्या विद्वानांनीं विधान केलें आहे, त्यांनीं १।१।३७ सूत्रांत दाखल झालेल्या स्वरादिगणांतील–**तसिलादयस्तद्धिता एधाच्पर्यन्ताः, शस्तसी** वगैरे जे तद्धित प्रत्यय, ज्या क्रमानें व ज्या अक्षरांनीं त्या गणांत दिलेले आहेत तसे तद्धित प्रत्यय, त्या क्रमानें व त्या अक्षरांनीं युक्त असलेले, पाणिनीच्या पूर्वाचार्यांनीं अगोदरच केलेले होते असें योग्य प्रमाणांनीं दाखविल्याशिवाय त्यांचें वरील विधान सत्यास धरून आहे असें म्हणतां येणार नाहीं. ६।३।३५ या सूत्रांतील तसिलादि प्रत्ययासंबंधानेंही आमचें वरीलप्रमाणें म्हणणें आहे. अमक्या पूर्वाचार्यानें असले प्रत्यय, याच क्रमानें, व याच अक्षरांनीं दिलेले होते असें अद्यापपर्यंत कोणीही सप्रमाण दाखविलेलें आम्हांस माहीत नाहीं. ( ९ ) आम्ही येथें दिलेलीं प्रमाणें 'अन्तरङ्ग' आहेत. 'अन्तरङ्ग' आहेत म्हणजे अष्टाध्यायी व गणपाठ ( ज्या दोन ग्रंथांच्या काळासंबंधानें व कर्त्यासंबंधानें वाद आहे असे दोन ग्रंथ ) या दोहोंत सांपडणारीं प्रमाणें आम्हीं दिलीं आहेत. या दोन ग्रंथांच्या काळानंतर झालेल्या ग्रंथांतील प्रमाणें बहिरङ्ग आहेत असें आमचें म्हणणें आहे. व्याकरणशास्त्रांतील नियमाप्रमाणें बहिरङ्गापेक्षां अन्तरङ्ग बलवत्तर असतें. गणपाठांतील गणसूत्रांत असलेले चकार, अष्टाध्यायींतील त्या गणासंबंधानें असलेल्या सूत्रानें सांगितलेल्या कार्याची किंवा प्रत्ययाची अनुवृत्ति त्या गणसूत्रांत असते, हें दाखविण्याकरितां असतात. जसें ५।१।२ या सूत्रांतील गवादिगण व त्यांतील गणसूत्रें पहावीं. यावरून गणसूत्रांनीं अष्टाध्यायींतील सूत्रेंच दाखविलेलीं असतात हें सिद्ध होतें. ( १० ) गणसूत्रांतील विभक्ति मूळ अष्टाध्यायींतील त्या गणाच्या विभक्तीशीं सदृश असते त्यावरून अष्टाध्यायी आणि गणपाठाचा कर्ता एकच आहे असें सिद्ध होतें.

वरील कारणें देऊन–गणपाठ व अष्टाध्यायी–या ग्रंथांचा कर्ता पाणिनि हाच होता असें आम्हीं सिद्ध केलें आहे.

अष्टाध्यायी रचण्यास आरंभ करण्यापूर्वी ती रचण्यास पाणिनीला पूर्वाचार्यांकडून कोणतीं साधनें मिळालीं होतीं व त्या साधनांच्या साह्यानें त्यानें दुसरीं कोणतीं साधनें स्वतः निर्माण केलीं हें अगोदर पाहिलें पाहिजे. पाणिनीला भगवान् शंकरापासून अइउण्–वगैरे वर्णसम्नामायाचीं चौदा सूत्रें मिळालीं अशी जी आख्यायिका आहे ती खरी मानिल्यास पाणिनीच्या पूर्वाचार्यांना अ, इ, उ, ऋ वगैरे स्वर व क, ख वगैरे व्यंजनें जरी माहीत होतीं तरी अइउण् ऋलृक् वगैरे सूत्ररूपांनीं तीं त्यांना माहीत नव्हतीं असें म्हणण्यास हरकत नाहीं. या चौदा वर्णसमाम्नायनामक माहेश्वरसूत्रांच्या सहाय्यानें पाणिनीनें जे अण्, अच्, हल्, झल्, जश् वगैरे प्रत्याहार साधले आहेत ते पाणिनीला पूर्वाचार्यांपासून मिळाले नाहींत असें म्हणण्यास हरकत नाहीं. तरी इत् संज्ञा व प्रत्याहार करण्याची युक्ति पाणिनीला पूर्वाचार्यांकडून मिळाली होती असें दिसतें. प्रत्यय, आगम, आदेश या वैयाकरण शब्दांच्या व्याख्या त्याला पूर्वाचार्यांकडून मिळाल्या होत्या असें पाणिनीनें अष्टाध्यायींत त्यांच्या व्याख्या दिलेल्या नाहींत यावरून दिसतें. गुण, वृद्धि, पूर्वरूप–एकादेश, पररूप–एकादेश, संप्रसारण वगैरे शब्दांच्या साधारण व्याख्या व त्यांचीं कार्यें ज्यांत घडलीं आहेत अशीं रूपें त्याला पूर्वाचार्यांकडून मिळालीं होतीं. तरी निरनिराळ्या देशांत रहाणाऱ्या व निरनिराळ्या काळांत झालेल्या पूर्वाचार्यांच्या मतांत फरक होते. 'सुप्' व 'तिङ्' हे प्रत्यय पाणिनीला पूर्वाचार्यांकडून मिळाले असले पाहिजेत. परंतु प्रथमा व द्वितीया विभक्तींच्या द्विवचनाचा प्रत्यय पूर्वी 'औङ्' असा व तृतीया विभक्तीच्या एकवचनाचा प्रत्यय पूर्वी 'आङ्' असा होता. पाणिनीनें ते प्रत्यय बदलून औ, औट्, व टा असे केले आहेत. 'गर्गस्य अपत्यं गार्ग्यः गार्ग्यायणः' अशारीतीचीं रूपें पाणिनीला मिळालीं व कांहीं तद्धित प्रत्यय ही पूर्वाचार्यांपासून पाणिनीला मिळाले. गर्ग, कश्यप, मरीचि, अङ्गिरस् वगैरे सारखे गोत्रप्रवर्तक ऋषि, मुनि, इक्ष्वाकु सारखे क्षत्रिय व त्यांचीं नांवें मिळालीं. तरी त्यांच्या एकाच अर्थाच्या रूपांत असलेली भिन्नता त्याच्या दृष्टीस पडली. नित्याच्या लौकिक व्यवहारांत असलेले हजारों शब्द त्याच्या असे दृष्टीस पडले कीं, त्यांच्या मूळ प्रकृति व प्रत्यय यांचा शास्त्रीय दृष्ट्या विचार पूर्वाचार्यांनीं केलेला नव्हता. परंतु कांहीं वैदिक शब्दांबद्दल कांहीं मुनींनीं तसा विचार चालविलेला त्याच्या दृष्टीस पडला होता. धातूंचीं तिङन्त रूपें व कृदन्त रूपें एकाच नियमांनीं नियमित झालेलीं नव्हतीं असेंही त्याच्या दृष्टीस पडलें असावें. **तस्मिन्निति निर्दिष्टे पूर्वस्य**–यासारख्या ज्या परिभाषा पाणिनीनें अष्टाध्यायींत गोवल्या आहेत त्या पूर्वाचार्यांच्याकडून त्याला मिळाल्या होत्या. पुष्कळ धातु त्याला पूर्वाचार्यांकडून मिळाले असले तरी ते हल्लीं प्रसिद्ध असलेल्या

धातुपाठांतील धातूंच्या रूपांत नव्हते. त्या धातूंचे पूर्वाचार्यांनीं सांगितलेले अर्थ पाणिनीच्या वेळेच्या त्या धातूंच्या व्यवहारांत असलेल्या रूपांच्या अर्थांशीं असदृश होते.

अशा सामग्रीवर पाणिनीनें आपलें व्याकरणशास्त्र रचण्याचा आरंभ केला. त्यानें केलेला ग्रंथ **अष्टाध्यायी** या नांवानें प्रसिद्ध आहे.

अष्टाध्यायीची मांडणी त्यानें कशी केली याबद्दलचें विवेचन या प्रस्तावनेंत दुसरे स्थळीं दिलेलें आहे.

अष्टाध्यायीच्या रचनेकरितां त्यानें आर्यावर्तातील सर्व देशांतून निरानिराळ्या वेळीं झालेल्या व्याकरणशास्त्रांचें, कोशांचें, वैदिक वाङ्मयाचें, व लौकिक संस्कृत वाङ्मयाचें, संशोधन करून संधि, प्रकृति–भाव, सुबन्त–तिङन्त–प्रत्यय, तद्धित–कृदन्त–प्रत्यय, समास, कारक, प्रत्ययांचे इत्संज्ञक वर्ण–वगैरे संबंधानें नवीनें नियम करून ते सूत्रबद्ध केले. या सर्व वाङ्मयाचा शोध करित असतां त्याला असे पुष्कळ शब्द व समास आढळले कीं त्यांतील प्रकृति–प्रत्ययादिकांची फोड न झाल्यामुळें पूर्वाचार्यांनीं अव्युत्पन्न म्हणून ज्यांच्याबद्दल कांहीं यत्न केला नव्हता; असे शब्द व्याकरणरीत्या शुद्ध असले पाहिजेत असें पाणिनीचें मत असल्यामुळें त्यानें त्यांपैकीं कांहीं शब्दांबद्दल आपल्या शिष्यांकरवीं यत्न करविला. त्या यत्नाचें फल उणादि प्रकरण होय. दुसरे कांहीं शब्द जे त्याचेकडून अशोधित राहिले होते, त्यांचे त्यानें समूह करून त्या समूहांना त्यानें **गण** असें नांव दिलें व त्या गणांचा उपयोग त्यानें तद्धित–प्रत्यय–प्रकरणादि–प्रातिपदिक सूत्रें करण्यांत केला. असे गण केल्यामुळें सूत्रांत आटोपशीरपणा आला. त्या गणांच्या समुदायपठनाला गणपाठ असें नांव आहे. गणपाठ निराळा करण्याचें कारणच असें आहे कीं, अष्टाध्यायींतील सूत्रांना शक्य तितका आटोपशीरपणा यावा. किती एक गणांत पुष्कळच शब्द आहेत. कांहीं गणांतील कांहीं शब्दांबद्दल त्याबाबत असलेल्या सूत्रांतील प्रत्ययादिकांनीं केलेला विशिष्ट अर्थ येण्याकरितां स्पष्टीकरण निरनिराळें करण्याची जरुरी होती. असे शब्द व त्यांचीं स्पष्टीकरणें सूत्रांत समाविष्ट करणें म्हणजे सूत्रें अवाढव्य मोठीं करणें होय. तसा हेतु पाणिनीचा नव्हता. त्याच्या मनांत अष्टाध्यायी हा सूत्रग्रंथच ठेवावयाचा होता. शिष्यांना लहान लहान सूत्रें पाठ करण्यास व ध्यानांत धरण्यास सुलभ असतें. याही हेतूनें पाणिनीनें सूत्ररचनाच केली. अगदीं थोडे शब्द असलेल्या अशा थोड्या गणांबद्दलच पाणिनीला सूत्रें करावयाचीं असतीं तर त्यानें गणसूत्रें व गणपाठ असा निराळा न करितां ते शब्द सूत्रांतच गोविले असते. परंतु जेथें हजारों शब्द व शेंकड्यानें मोजण्याइतके गण इतक्यांचा विचार कर्तव्य आहे तेथें पाणिनीनें अंगिकारलेली पद्धतिच योग्य होती असें म्हणणें कोणालाही भाग पडेल. पाणिनीनें अष्टाध्या-

यीचा पूरक भाग म्हणूनच गणपाठ केला आहे, म्हणूनच गणपाठांत गणसूत्रें करणें किंवा गणसूत्राबद्दल एखादें सूत्र बनवून तें अष्टाध्यायींत घालणें या दोन्ही कृत्यांत त्याच्या दृष्टीनें कांहीं महत्त्व नव्हतें. याचें उदाहरण ५।१।२ **उगवादिभ्यो यत्** व ५।१।३ **कम्बलाच्च संज्ञायाम्**–या दोन सूत्रांसंबंधानें दिसून येतें. ५।१।२ या सूत्रांत गवादिगणाचा निर्देश आहे. तो गवादिगण गणपाठांत पाहिला असतां त्यांत **१ नाभि-नभंच, २ शुनःसंप्रसारणं वाचदीर्घत्वं, तत्संनियोगेन चान्तोदात्तत्वम्, ३ ऊध-सोऽनङ्च**–अशीं तीन गणसूत्रें आहेत. गवादिगणांत आणखी एक गणसूत्र–**कम्ब-लाच्च संज्ञायाम्–या** शब्दांनीं घालणें काय किंवा अष्टाध्यायींत तसलें सूत्र करणें काय या दोन कृत्यांपैकीं कोणतंही एक करणें पाणिनीच्या दृष्टीनें सारखें होतें. या-शिवाय–**कम्बलाच्च संज्ञायाम्**–असें अष्टाध्यायींतील सूत्र करण्यांत दुसरें एक कारण आहे तें असें. या सर्व गणसूत्रांत व **कम्बलाच्च संज्ञायाम्**–या अष्टाध्यायींतील सूत्रांत चकार आहेत. **चकारस्त्वनुक्तसमुच्चयार्थः**–असें शास्त्र असल्यामुळें दुसऱ्या गणसूत्रांतील– **वाचदीर्घत्वं तत्संनियोगेन अन्तोदात्तत्वंच**–या शब्दांचा उपसर्ग कम्बल–शब्दाला लागण्याचा संभव पाणिनीला दिसल्यावरून त्यानें तें गणसूत्र न करितां अष्टाध्यायींतील सूत्र केलें असावें. मि. आय्. एस्. पावटे यांनीं वरील दोन सूत्रें व १।१।२७ पासून सर्वनामसंज्ञक शब्दांसंबंधानें असलेलीं अष्टाध्यायींतील सूत्रें, गणपाठाचा कर्ता पाणिनि नसून दुसरा कोणी पूर्वाचार्य होता या म्हणण्याच्या पुष्ट्यर्थ दिलीं आहेत. वर त्यांपैकीं २ सूत्रांचा विचार आम्हीं केला. आतां सर्वनामसंज्ञक शब्दांसंबंधाच्या सूत्रांसंबंधानें विचार करूं.

अष्टाध्यायींत १।१।२७ या क्रमांकाचें सूत्र **सर्वादीनि सर्वनामानि** असें आहे. या सूत्राचा अर्थ–सर्वादिगणांत जे शब्द आहेत ते सर्वनामसंज्ञक होतात असा आहे. गणपाठांतील सर्वादिगणांत–सर्व, विश्व, उभ, उभय, डतर, डतम, अन्य, अन्यतर, इतर, त्वत्, त्व, नेम, सम, सिम, **पूर्वपरावरदक्षिणोत्तरापराधराणि व्यवस्थाया-मसंज्ञायाम्, स्वमज्ञातिधनाख्यायाम्, अन्तरंबहिर्योगोपसंव्यानयोः**, त्यद्, तद्, यद्, एतद्, इदम्, अदस्, एक, द्वि, युष्मद्, अस्मद्, भवतु, किम्–हे शब्द आहेत. अष्टाध्यायींतील वरील सूत्राच्या अर्थाप्रमाणें सर्वादिगणांतील गणसूत्रांतील हे सर्व शब्द सर्वनामसंज्ञक झाले. त्यामुळें सर्वनामसंज्ञक शब्दांना अष्टाध्यायींत जे विशिष्ट प्रत्यय व्हावे असें विधान आहे ते सर्व प्रत्यय वर दिलेल्या गणपाठांतील सर्व शब्दांना होणें रास्त आहे. त्यामुळें १।१।२८ पासून १।१।३१ पर्यंतचीं सूत्रें ५।३।२ व ५।३।७१, ७।१।१४, ७।१।१५, ७।१।१७, ७।१।५२ वगैरे सूत्रें नित्य लागू होतात. अशी स्थिति प्राप्त झाली. म्हणून पाणिनीला सर्वनामगणांतील कांहीं शब्दांना, कांहीं प्रत्यय पुढें असतांना, विकल्पानें सर्वनामसंज्ञा होते असें दाखवावयाचें होतें म्हणून ७।१।१४,

७।१।१५,७।१।१६ **पूर्वादिभ्यो नवभ्योवा,** ७।१।१७ **जसःशी** व १।१।३२ **विभाषाजसि,** १।१।३३ **प्रथमचरम...** १।१।३४ **पूर्वपरावर...** १।१।३५ **स्वमज्ञाति...** १ । १ । ३६ **अन्तरं...** हीं सूत्रें अष्टाध्यायींत घातलीं. वरील सर्व सूत्रांची पूर्वापरता पाहिली असतां ती अशी आहे कीं, प्रथमाध्यायांत १ । १ । २७ हें सर्वनामसंज्ञाविधायक सूत्र आहे. तें **सर्वादीनि सर्वनामानि**–असें आहे. त्यांत सर्वादिगणाचा निर्देश आहे. सर्वादिगणांतील शब्द ज्या गणपाठांत सांगितले आहेत तो गणपाठ पाणिनीच्या पूर्वाचार्यांनीं पाणिनीच्या पूर्वींच तयार करून ठेविला होता असें पंडित पावटे यांचें म्हणणें आहे. तें आपलें म्हणणें शाबीत करण्याकरितां Structure of the Ashtadhyayi या आपल्या निबंधाच्या ८८ पानाच्या शेवटच्या भागांत त्यांनीं १ । १ । ३४ या अष्टाध्यायींतील सूत्राखालील एक वार्तिक व त्यावरील भाष्य यांचें प्रमाण म्हणून कांहीं भाग दिलेला आहे. तें वार्तिक व त्यावरील भाष्य, मि. पावटे यांच्या वरील म्हणण्यास पुष्टि देणारें आहे कीं नाहीं तें पाहूं.

१ । १ । ३४ सूत्र असें आहे.

**पूर्वपरावरदक्षिणोत्तरापराधराणि**
**व्यवस्थायामसंज्ञायाम्**

या सूत्रावरील वार्तिक असें.

**अवरादीनां पुनः सूत्रपाठे ग्रहणानर्थक्यं**
**गणे पठितत्वात्.**

यावरील भाष्य असें.

**अवरादीनां पुनः सूत्रपाठे ग्रहणं अनर्थकम् । किं कारणम् । गणे पठितत्वात् । गणेहि एतानि पठ्यन्ते ॥ कथं पुनर्ज्ञायते–स पूर्वः पाठः अयं पुन पाठ इति ? तानि हि पूर्वादीनि, इमानि अवरादीनि ॥**

**प्रदीपः– तेन पूर्वं गणपाठः पश्चात् सूत्रपाठ इत्यर्थः**

**भाष्यम्–इमान्यपि पूर्वादीनि ॥ एवं तर्हि आचार्यप्रवृत्तिर्ज्ञापयति–स पूर्वपाठः, अयं पुनः पाठ इति । यदयं–पूर्वादिभ्यो नवभ्यो वा इति नवग्रहणं करोति । नवैव पूर्वादीनि.**

वार्तिकांत–**पुनः सूत्रपाठे ग्रहणानर्थक्यं गणे पठितत्वात्**–असे शब्द आहेत. त्याचा मराठींत अर्थ असा–'अवर' वगैरे जे शब्द सूत्रांत घातले आहेत ते तेथें घालण्याचें कारण नव्हतें. कारण ते शब्द गणांत आलेले आहेत. या वार्तिकाचा तात्पर्यार्थ–गणपाठ पाणिनीच्या पूर्वी झाला होता व सूत्रपाठ म्हणजे अष्टाध्यायी मागाहून पाणिनीनें केली–असा मि. पावटे यांनीं केला आहे. तो तात्पर्यार्थ बरोबर नाहीं असें आमचें म्हणणें आहे. आमच्या म्हणण्याचें कारण असें–सर्वनामसंज्ञाविधा-

यक जें १।१।२७ हें सूत्र त्यांत सर्वादि–गणाचा निर्देश आल्याबरोबर सर्वादिगण त्या सूत्राच्या धोरणानुसार देणें क्रमप्राप्त झाल्यामुळें सर्वादि समूह गणपाठांत दाखल झाला; म्हणजे १।१।२७ हें सूत्र अष्टाध्यायींत व सर्वादिगण गणपाठांत एकामागून एक सादर झाले असें म्हणण्यास कोणाची हरकत येईल असें वाटत नाहीं. गणपाठांतील हल्लीं असलेल्या सर्वादिगणांतील 'सिम' या शब्दाच्या पुढें व 'त्यद्' या शब्दाच्या मागें ३ गणसूत्रें आहेत. त्या तीनगणसूत्रांतील पहिलें गणसूत्र १ **पूर्वपरावर**...हें आहे व त्यानंतर दुसरें गणसूत्र २ **स्वमज्ञाति**...हें आहे व तिसरें गणसूत्र ३ **अन्तरं**... हें आहे. पाणिनीनें कांहीं विशेष कारणांकरितां गणपाठांतील वर दिलेल्या पहिल्या गणसूत्रांतीलच शब्दपरंपरेप्रमाणें शब्दपरंपरा ठेऊन तसलेंच एक सूत्र केलें. या वर दिलेल्या इतिहासाकडे दृष्टि ठेऊन वर दिलेल्या वार्तिकाचा तात्पर्यार्थ मि. पावटे म्हणतात त्याप्रमाणें कसा होतो तें कळत नाहीं. १।१।२७ हें सूत्र व त्याला अनुसरून तयार केलेला सर्वादिगण, अनुक्रमें अष्टाध्यायींत व गणपाठांत दाखल झाल्यानंतर लागलींच १।१।३४ हें सूत्र लिहिलें गेलें असेल. असें असतां वार्तिककारांच्या मनांत वरील वार्तिक करतांना पावटे म्हणतात त्याप्रमाणें अर्थ येणें शक्य दिसत नाहीं. या वार्तिकावर असलेल्या, वर उद्धृत केलेल्या भाष्यांत सुद्धां मि. पावटे म्हणतात त्याप्रमाणें अर्थ निष्पन्न होत नाहीं. भाष्यकारांचा प्रश्न असा आहे–**कथंपुनर्ज्ञायते–सपूर्वः पाठः अयं पुनः पाठ इति**–यांतील–स पूर्वः पाठः–याचा अर्थ–पूर्वाचार्यांनीं केलेला पाठ–असा कसा होतो तें कळत नाहीं.–याचा अर्थ, १।१।३४ सूत्राच्या पूर्वी लिहिल्या गेलेल्या एका सूत्रासंबंधानें 'पूर्वपरावर'...असे शब्द आले आहेत, तसल्याच तऱ्हेचे पुन्हां तेच शब्द, इतकाच होईल. प्रदीपकारांचे जे शब्द मि. पावटे यांनीं दिले आहेत ते असे–तेन पूर्वं गणपाठः पश्चात् सूत्रपाठः–या शब्दांचाही अर्थ पावटे म्हणतात तसा होऊं शकत नाहीं. त्या शब्दांचा अर्थ–सबब मागें सर्वादि गण दिलेला आहे व मागाहून १।१।३४ हें सूत्र दिलें गेलें आहे इतकाच होईल. मि. पावटे यांच्या मनांत प्रदीपकारांच्या गणपाठ व सूत्रपाठ–या शब्दांनीं भ्रम उत्पन्न केला असावा असें वाटतें. येथें गणपाठशब्दानें–सर्वादिगणाचा गणपाठांत पाठ व सूत्रपाठ–शब्दानें १।१।३४ या सूत्राचा अष्टाध्यायींत प्रथम प्रवेश–असाच घेतला पाहिजे.

मि. पावटे हे म्हणतात त्याप्रमाणें वार्तिककार, भाष्यकार, व प्रदीपकार यांच्या मनांत–स पूर्वः पाठः, अयं पुनः पाठः किंवा–तेन पूर्वंगणपाठः पश्चात् सूत्रपाठः– या शब्दांचा अर्थ–पूर्वाचार्यांनीं केलेला प्राचीन गणपाठ व पाणिनीनें केलेला त्यानंतरचा सूत्रपाठ–असा असता तर निःसंदिग्धपणानें तसे शब्द त्यांनींच घातले असते. वार्तिक, भाष्य व प्रदीप–यांतील पावट्यांनीं उद्धृत केलेल्या वचनांत, पूर्वपाठ व पुनः पाठ करणारा एकच पुरुष होता असाच अर्थ ध्वनित होत आहे असें आम्हांस वाटतें.

अष्टाध्यायींतील प्रथमाध्यायांत पठित सूत्रासंबंधानें 'पूर्वः पाठः' व सप्तमाध्यायांतील पठित सूत्रासंबंधानें 'पश्चात् पाठः'—असें म्हटलें तर पूर्वाचार्यांनीं उपदिष्ट असा अर्थ 'पूर्वः पाठः' या शब्दाचा जसा होऊं शकणार नाहीं तसाच एकाच अध्यायांत १।१।२७ 'सर्वादीनि सर्वनामानि' हें सूत्र व गणपाठांतील त्याचवेळीं प्रविष्ट केलेला सर्वादिगण हा पूर्वपाठ व त्याच अध्यायांतील १।१।३४ हा पश्चात् पाठ—यासंबंधानें म्हणतां येणार नाहीं असें आमचें मत आहे. गणपाठ व अष्टाध्यायी या दोहोंचा कर्ता पाणिनिच होता हें आमचें म्हणणें प्रमाणांनीं वर सिद्ध केलें आहे.

त्याचप्रमाणें मि. पावटे यांचें धातुपाठासंबंधानें जें विधान आहे तें असें—
The Dh. P. does not seem to be by the author of the Ashd, but seems to be the work of a predecessor of Panini. But nevertheless the arrangement of roots in the Dh. P. clearly shows that the author of Dh.P.knew very many Sutras now found in the Ashd. and so arranged the roots in Dh. P. as to secure the purposes of the Sutras.
धातुपाठाच्या कर्त्यासंबंधानें व कालासंबंधानें आमचें निश्चित मत देण्यापूर्वीं मि. पावटे यांचें निश्चित मत काय आहे व तसें त्यांचें मत होण्यास त्यांनीं प्रमाणें काय दिलीं आहेत हें अगोदर पाहूं.

वर त्यांचें जें मत इंग्रजींत उद्धृत केलें आहे, त्यांत दोन वाक्यें आहेत. त्यांतील दुसऱ्या वाक्यानें पहिल्या सिद्धान्त वाक्याचें खंडन केलें आहे. पहिल्या वाक्यांत पाणिनीनें केलेल्या अष्टाध्यायीपूर्वीं झालेल्या ( Predecessor ) एका आचार्यानें धातुपाठ केला होता व तो पाणिनीस आयता मिळाला असा सिद्धान्त दिला आहे, व दुसऱ्या वाक्यांत—पाणिनीनें मागाहून केलेल्या अष्टाध्यायींतील पुष्कळ सूत्रांची माहिती त्या पूर्वाचार्याला होती असें म्हटलें आहे. या दुसऱ्या वाक्याचा स्पष्टार्थ असा कीं—अष्टाध्यायीची उत्पत्ति होण्यापूर्वींच अष्टाध्यायींत उत्तरकालांत उत्पन्न होणारीं पुष्कळ सूत्रें त्यांच्या उत्पत्तीपूर्वींच एका पूर्वाचार्याला कळलीं होतीं.

वरील दोन वाक्यांची स्थिति जरी वर दिल्याप्रमाणें आहे तरी अष्टाध्यायीचा कर्ता पाणिनि व धातुपाठाचा कर्ता पूर्वाचार्य असें ठाम मत मि. पावटे पहिल्या वाक्यांत नमूद करतात. परंतु अष्टाध्यायी व धातुपाठ—या दोहींतील अन्तर्गत कांहीं प्रमाणें, आपल्या पहिल्या ठाम मतास विरोधक आहेत असें त्यांनीं प्रांजलपणें कबूल केलेलें दुसऱ्या वाक्यांत नमूद आहे असें आम्हांस वाटतें.

पहिल्या वाक्यांतील ठाम मत बनण्यास त्यांनीं काय प्रमाणें दिलीं आहेत व तीं आमच्या मताप्रमाणें रास्त आहेत कीं नाहींत हें आतां पाहूं--

१. सर्व प्रातिपदिकें अव्युत्पन्न आहेत अशी समजूत पाणिनीची असल्यामुळें पाणिनीनें धातुपाठ केला असें म्हणतां येत नाहीं, असें त्यांचें म्हणणें आहे. ( हें त्यांचें

म्हणणें आम्हांस मान्य नाहीं. ) धातु हा शब्द पाणिनीच्या कोणत्याही सूत्रानें साधलेला नसून उणादि प्रत्ययानें साधलेला आहे. आमच्या मताप्रमाणें उणादि प्रत्यय हें प्रकरण पाणिनीच्या सांगण्यावरून व पाणिनीच्या हयातींत व पाणिनीनें अष्टाध्यायींत करून ठेवलेल्या नियमानुसार केलेलें आहे. याचें प्रत्यक्ष उदाहरण 'धातुः, ओतुः, तन्तुः' वगैरे जे शब्द १–७२ या उणादिसूत्रानें साधले ते ७।२।९, ६।४।२० वगैरे अष्टाध्यायींतील सूत्रांच्या मदतीनेंच साधलेले आहेत.

अष्टाध्यायींत ७।२।११५ '**अचोञ्णिति**' व ७।२।११६ '**अत उपधायाः–**' या दोन सूत्रांनीं, 'णित्' प्रत्यय पुढें असतांना वृद्धि होते असें विधान केलेलें आहे. ती वृद्धि व्हावी म्हणून उणादि प्रत्यय कर्त्यानें 'इण्' धातूहून 'उसि' प्रत्यय करून तो 'णित्' होतो असें विधान २।२८३ या सूत्रानें केलें आहे, म्हणून त्याचें–'आयुस्' असें सान्त रूप बनतें. ७।३।८४ '**सार्वधातुकार्धधातुकयोः**' व ७।३।८६ '**पुगन्त लघूपधस्य च**–'या सूत्रांनीं गुण सांगितला आहे, तो गुण व्हावा म्हणून उणादि प्रत्ययांतील २।२७३ सूत्रानें 'इसि' प्रत्यय आर्धधातुक करून गुण होण्याला साधन उत्पन्न केलें, त्यामुळें 'ऋ' धातूचें 'अर्चिः' व 'शुच्' धातूचें 'शोचिः' अशीं रूपें झालीं. ज्या स्थळीं वर सांगितलेले गुणवृद्धि आदेश होऊं नयेत असें उ. प्रत्ययकाराच्या मनांत होतें त्या स्थळीं १।१।५ '**क्ङिति च**–' हा गुणवृद्धि निषेध व्हावा म्हणून होण्याऱ्या प्रत्ययांना 'कित्त्व व ङित्त्व' नवीन सूत्रांनीं आणिलें आहे. याचीं उदाहरणें ३।२८९, २।३१७, २।३४२, ३।४०२ सूत्रांत सांपडतील. 'वच्, स्वप्–'सारख्या संप्रसारणास योग्य असलेल्या धातूंस ६।१।१५ '**वचिस्वपियजादीनां किति–**' सारख्या सूत्रांनीं संप्रसारण व्हावें म्हणून 'कित्' प्रत्यय करून संप्रसारणयोग्य तो केला. त्याचें उदाहरण ४।६३५ या सूत्रांत दिसेल. २।२३६ व २।२३७ या सूत्रांनीं 'भ्रम् व दम्' धातूंहून क्रमानें 'डू व डोसिः'–असें 'डित्' प्रत्यय करून अष्टाध्यायींतील ६।४।१४३ '**टेः**' या सूत्रानें त्या धातूंच्या 'टि'–भागाचा लोप करविला. 'इत्नुच्' प्रत्यय पुढें असतांना अष्टाध्यायींतील सूत्र ६।४।५५ '**अयामन्ता**'...यानें 'णि–' प्रत्ययाला अयादेश करून–'स्तनयित्नुः–' हें रूप साधलें आहे. ३।३१७ या उणादिसूत्रानें 'हत्नु' हें 'हन्' धातूचें रूप केलें आहे. तेथें अष्टाध्यायींतील ६।४।३७ या सूत्रानें 'हन्–' या धातूंतील नकाराचा लोप झाला आहे. ४।५६० या उ. सूत्रानें 'जन्' धातूपासून 'जन्य व जाया' अशीं रूपें साधलीं आहेत, तीं ६।४।४३ '**येविभाषा**' या अष्टाध्यायी–सूत्राच्या मदतीशिवाय साधतां आलीं नसतीं. 'रिच्–' धातूचें 'रेक्णः' असें रूप उ. ४।६४८ सूत्रानें केलें आहे तेथें ७।३।५२ '**चजोः**' ...या अष्ट. सूत्रानें 'कुत्व' झालें आहे. याप्रमाणें शेंकडों उदाहरणें उणादिप्रत्ययांतून अशीं देतां येतील कीं जीं अष्टाध्यायीच्या सहाय्यावांचून साधणें शक्यच नव्हतें. इतकेंच नव्हे तर पाणिनीनें उणादिप्रत्ययप्रकरण, ३।३।१, ३।३।२, ३।३।३ हीं

सूत्रें अष्टाध्यायींत घालून त्याला अष्टाध्यायीचा भाग बनविलें. या सर्व, अष्टाध्यायींत व उणादि प्रत्ययप्रकरणांत, सांपडणाऱ्या प्रमाणांवर अवलंबून आम्ही वरील विधान केलेलें आहे.

प्रातिपदिक या संज्ञेनें, धातु, व प्रत्यय—यांवांचून व्याकरणांत सांपडणाऱ्या—नाम, सर्वनाम, विशेषण, क्रियाविशेषण, वगैरे संज्ञांनीं दाखविले गेलेले सर्व शब्द येतात. गणपाठांत, संस्कृतवाङ्मयांतील असे सर्व शब्द दिलेले आहेत असें नाहीं. गणपाठांतसुद्धां दाखल झालेल्या पुष्कळ समासांतील समास अष्टाध्यायींत दिलेल्या नियमाप्रमाणें सोडवितां येतात. अव्युत्पन्न म्हणून मानल्या गेलेल्या हजारों शब्दांपैकीं बरेच शब्द उणादि प्रकरणानें पाणिनीनें व्युत्पन्न आहेत असें अप्रत्यक्षपणें दाखविलें व त्यापेक्षां पुष्कळ जास्त शब्द पाणिनीनें अष्टाध्यायींतील सूत्रांनीं व्युत्पन्न करून प्रत्यक्ष दाखविले व कांहीं थोडे शब्द अव्युत्पन्न म्हणून जे राहिले त्यांचा समावेश त्यानेंच गणपाठांत केला असें आमचें म्हणणें आहे. वरील विवेचनावरून पाणिनि हा अव्युत्पन्न पक्षाचा होता असें आम्ही समजत नाहीं, म्हणून त्यानें धातुपाठ करणें अगदीं अशक्यप्राय आहे असें मानणाऱ्यांपैकीं आम्ही नाहीं, म्हणजे सर्व शब्द व्युत्पन्न आहेत असें मानणारा पाणिनि होता; व त्यानें कांहीं अडचणींमुळें अव्युत्पन्न म्हणून राहिलेले गणपाठांतील शब्द धातुरूप—प्रकृति, प्रत्यय—वगैरे देऊन ते व्युत्पन्न आहेत असें दाखविलें असतें. वरील विवेचनाचा इत्यर्थ हा कीं, पाणिनीनेंच आपल्या मतास अनुसरून धातुपाठ बनविणें शक्य होतें.

२. आतां धातुपाठाचा कर्ता पाणिनि होता कीं, दुसरा कोणी पूर्वाचार्य होता हें पाहूं. पाणिनीच्या पूर्वीं धातुसमुदायाची स्थिति काय होती हें प्रथम पाहिलें पाहिजे. पाणिनीनें केलेल्या अष्टाध्यायींत त्याच्या पूर्वीं एकंदर आठ व्याकरणकार होऊन गेले होते, असें आम्हीं मागें नांवनिशीवार अष्टाध्यायींतील अध्याय वगैरे देऊन दाखविलें आहे. त्याशिवाय निरनिराळ्या विषयांवर ग्रंथ लिहिणारे पुष्कळ ग्रंथकार होऊन गेले होते असेंही आम्हीं तद्धित प्रत्ययप्रकरणांत दाखविलें आहे. वाङ्मय विषयांवर इतकी ग्रंथसमृद्धि होत असतां, अथवा झाली असतां, पाणिनीच्या पूर्वींच्या व्याकरणकारांनीं शब्दांच्या मूलप्रकृतीबद्दल म्हणजे धातूंबद्दल शोध केला नसेल असें म्हणवत नाहीं. उलट पाणिनीच्या पूर्वींच्या व्याकरणकारांनीं शब्दांच्या मूळ प्रकृति म्हणजे धातु बनविले असलेच पाहिजेत अशी खात्री आहे. परंतु पाणिनीच्या पूर्वींच्या व्याकरणकारांनीं शोधून काढलेले धातु अमके असें निःसंदिग्धपणें दाखविणारे ग्रंथ आज अस्तित्वांत नाहींत. संस्कृत भाषेंतील धातु अमके असें दाखविणारा ग्रंथ एकच आहे. तो ग्रंथ म्हणजे धातुपाठ हा होय. परंतु तो ग्रंथ कोणीं केला, त्याचा कर्ता कोण याबद्दल वाद आहे. त्या ग्रंथाचा कर्ता पाणिनि नव्हे, कोणीतरी पूर्वाचार्यानें किंवा पूर्वाचार्यांनीं तो ग्रंथ केला असें मि. पावटे म्हणतात असें वर सांगितलेंच आहे.

या प्रश्नाचा उलगडा, धातुपाठांतील शब्दांवरून होतो कीं काय तें पाहूं. धातुपाठांतील धातूंत १० भाग पाडलेले आहेत. त्या भागांचीं नांवें अशीं:— १ भ्वादि (भू+आदि) २ अदादि (अद+आदि) ३ जुहोत्यादि (हु+आदि) हे तीन भाग 'शप्' विकरणप्रधान आहेत. ४ दिवादि ५ स्वादि ६ तुदादि ७ रुधादि ८ तनादि ९ क्रयादि १० चुरादि. धातुपाठांत एकंदर १९४४ धातु दिलेले आहेत. त्यांपैकीं १०१० धातु भ्वादिगणांत दिलेले आहेत. वर १० भाग असें म्हटलें आहे. प्रत्येक भागाला गण असें नांव आहे. या सर्व धातूंचे पोटविभागाचें वर्णन— **द्युतादय उदात्ता अनुदात्तेतआत्मनेभाषाः, ज्वरादय उदात्ता उदात्तेतःपरस्मैभाषाः, उदात्तौ स्वरितेतौ उभायतो भाषौ, स्कंदादय अनुदात्ता उदात्तेतः परस्मैभाषाः** वगैरेसारख्या शब्दांनीं केलेलें असतें. या पोटविभागाकरितां असलेल्या शब्दांवरून अनुमानें निघतात तीं अशीं:— १ उदात्त धातु उदात्तेत्, अनुदात्तेत् किंवा स्वरितेत् असूं शकतात. २ अनुदात्त धातु परस्मैभाष, आत्मनेभाष किंवा उभयतोभाष असतात. ३ उदात्तेत धातु बहुतकरून परस्मैभाष असतात. यास कांहीं अपवादही आहेत. जसें–८५३ क्रमांकाच्या 'रमुक्रीडायाम्'–या धातूचें वर्णन 'अनुदात्त उदात्तेत्' असें दाखविलें असून तो 'आत्मनेभाष' आहे असें म्हटलें आहे. ४ 'स्वरितेत्' धातु 'उभयतोभाष' असतो.

'उदात्तः, अनुदात्तः किंवा स्वरितः' हा शब्द धातूच्या उच्चाराच्या वेळीं किती जोर द्यावयाचा हें समजण्याकरितां वेदकाळीं वापरलेला आहे. वेदकाल संपून लौकिक संस्कृत शब्दांच्या उच्चाराच्या वेळीं उदात्तादियुक्त उच्चारांचा उपयोग होईनासा झाला तेव्हां धातूंतून कोणत्या प्रकारचे प्रत्यय करावयाचे याबद्दल त्यावेळच्या व्याकरणकारांना अडचण पडूं लागली. वेदकालीं ही अडचण भासत नव्हती, कारण सर्व धातूंहून दोन्ही पदांचे प्रत्यय होऊं शकत. वेदकालानंतर ही अडचण दूर करण्याकरितां उदात्तेत् धातु, अनुदात्तेत् धातु व स्वरितेत् असें धातूंचें वर्गीकरण केलें. 'उदात्तेत्' धातूंना 'परस्मैभाष,' 'अनुदात्तेत्' धातूंना 'आत्मनेभाष' व 'स्वरितेत्' धातूंना 'उभयतोभाष' असें मानूं लागले. म्हणून त्यावेळच्या धातुपाठग्रंथामध्यें धातूंचें वर्णन 'उदात्तः उदात्तेतः, उदात्तः अनुदात्तेतः, अनुदात्तः उदात्तेतः, अनुदात्तः अनुदात्तेतः–'अशा रीतीच्या शब्दांनीं होत असावें असें वाटतें. पाणिनीच्या काळापर्यंत अशीच स्थिति होती. त्यावेळीं 'अनुदात्तेत्त्वनिमित्तं आत्मनेपदं अनित्यम्' असें म्हणण्याची पाळी व्याकरणकारांवर कांहीं धातूंच्या संबंधानें आली असावी असें वाटतें. याचें उदाहरण 'अदादिगणांतील' १०१७ 'चक्षिङ् व्यक्तायांवाचि'–या धातूंत दिसतें. मुळांत हा धातु 'चक्ष्' असा होता व तो 'अनुदात्तेत्' आहे असें मानिलें होतें. 'अनुदात्तेत्' तो असल्यामुळें त्याहून 'आत्मनेभाष' किंवा आत्मनेपदी प्रत्यय होणें रास्त होतें. तरी कांहीं लोक त्याहून 'परस्मैभाष' किंवा परस्मैपद प्रत्यय करूं लागले होते. ती पद्धत बंद करून

टाकण्याकरितां तो धातु ‘ चक्षिङ् ’ असा पठन करण्याची नवीन चाल त्यावेळीं सुरू केली असें वाटतें. ‘ चक्षिङ् ’ यांतील ङ्कार व इकार इत्संज्ञक आहेत. ङ्कार इत् संज्ञक झाल्यामुळें अष्टाध्यायींतील १ । ३ । १२ **अनुदात्तङित आत्मनेपदम्** या सूत्राप्रमाणें तो धातु कायमचा आत्मनेपदी बनला व त्यांतील इकार इत्संज्ञक झाल्यामुळें ३ । २ । १४९ **अनुदात्तेतश्चहलादेः** या सूत्रानें ‘युच्’ प्रत्यय होऊन ‘विचक्षणः’ हें रूप साधण्याची सोय झाली. येथें प्रश्न इतकाच राहतो कीं, ‘चक्ष्’ या मूळच्या ‘अनुदात्तेत्’ धातूला ‘चक्षिङ्’ असें ‘ङित्’ रूप कोणीं दिलें ? पाणिनीनें दिलें कीं, पाणिनीच्या पूर्वाचार्यांनीं दिलें ? पाणिनीच्या पूर्वाचार्यांनीं पाणिनीनें पुढें करावयाच्या दोन सूत्रांच्या उपयोगाकरितां आगाऊच तरतूद करून ठेविली—असें तर्कबुद्धीस विरुद्ध असलेल्या वचनास मान देण्यापेक्षां पाणिनीनेंच ‘चक्ष्’ या धातूला ‘चक्षिङ्’ असें स्वरूप दिलें असें म्हणणें जास्त सयुक्तिक आहे.

पाणिनीनें अष्टाध्यायींत लाघव आणण्याकरितां जी पद्धति अंगिकारिली आहे तीच पद्धति धातुपाठांत दिसून येते. ती अशी—पाणिनीनें अष्टाध्यायींतील पूर्व सूत्रांतून उत्तर सूत्रांत, कांहीं पदांची अनुवृत्ति किंवा समुच्चय करण्याकरितां चकार वापरलेला आहे. तसाच चकार धातुपाठांतील सूत्रांतही दृष्टीस पडतो. जसें २६६. ‘हेठ विबाधायाम्’ २६७ ‘ एठच ’. २६७ सूत्रांतील चकारानें २६६ सूत्रांतील ‘ विबाधायाम् ’—या पदाची अनुवृत्ति होते म्हणून ‘ एठ ’ या धातूचा अर्थ ‘ विबाधायाम् ’—असाच बनतो. ५२६ ‘शूल रुजायाम्’—‘संघोषेच’—यांतील चकार समुच्चयार्थी आहे, येथें दुसरा धातु सांगितला नसल्यामुळें निराळ्या सूत्राची जरूर नाहीं. धातुपाठांत समुच्चयार्थी अपि—हाही शब्द वापरलेला आढळतो. शूल—या धातूचे अर्थ वर लिहिल्याप्राणें दोन असले तरी पाठकर्त्याच्या मतानें ‘रुजायाम्’—हा अर्थ जास्त पसंत होता, म्हणून त्यानें तो अर्थ प्रथम देऊन दुसऱ्या पंडितांस मान्य असलेला अर्थही त्यानें चकार घालून समाविष्ट केला. इतकेंच नव्हे तर धातुपाठकर्त्यानें—इति, अपरे, अन्ये, एके, केचित् असे शब्द घालून धातूसंबंधानें किंवा त्यांच्या अर्थासंबंधानें जेथें मतान्तरें असलेलीं त्याला आढळून आलीं तेथें तीं घालून मतान्तरें दृष्टोत्पत्तीस आणिलीं आहेत. मतान्तरें ज्या ग्रंथकारांचीं होतीं ते धातुपाठकर्त्याच्या पूर्वीं इतक्या प्राचीन काळांतील होते कीं, त्यांचीं नांवें व ग्रंथ हीं लुप्तप्राय झालेलीं होतीं म्हणून त्यांचीं नांवें न देतां वरील शब्दांनीं त्यांचीं मतान्तरें मात्र पाठकर्त्यानें दिलीं. मतान्तरें फक्त धातूसंबंधानेंच नसून त्यांच्या अर्थासंबंधानेंही होतीं. यावरून धातुपाठकर्त्याच्या पूर्वीं झालेल्या ग्रंथकारांनीं नुसते धातूच संहितारूपानें दिले होते असें दिसत नाहीं. अशारीतीनें निरनिराळ्या ग्रंथकारांनीं निरनिराळ्या शब्दांनीं जे अर्थ व निरनिराळे धातु दिलेले होते ते संकलित करून व पाठकर्त्याच्या कालास व रूढीस अनुकूल होतील अशारीतीनें व शब्दांनीं ते अर्थ व धातु देणें हें काम धातुपाठकर्त्यास करावयाचें होतें. हें काम त्यानें उत्कृष्टरीतीनें

पार पाडिलें आहे इतकेंच नव्हे तर त्यानें यापेक्षां पुष्कळ जास्त महत्त्वाचें असें दुसरेंही एक काम केलें आहे. तें दुसरें काम हें. त्यानें धातुपाठाची रचना अशा-रीतीनें केली कीं, ( पाणिनीनें केलेल्या ) अष्टाध्यायी या नांवाच्या व्याकरणशास्त्रां-तील सूत्रांच्या अध्ययनास उत्तम मदत व्हावी. ती मदत कशी झाली तें पाहूं.

'उदात्तेतः, अनुदात्तेतः–' या शब्दांनीं पूर्वाचार्यांनीं वर्णन केल्यामुळें ज्या धातूंच्या पदासंबंधानें घोटाळा उत्पन्न झाला होता तो नाहींसा करण्याकरितां पाणि-नीनें १।४।९९, १।४।१००, १।३।१२, १।३।७२, व १।३।७८ हीं सूत्रें केलीं. धातुपाठ-कर्त्यानेंही आपले धातु या सूत्रांच्या कक्षेंत बिनचूक येतील अशारीतीनें ते घोटाळा उत्पन्न करणारे धातु त्यानें 'ङित्, ञित्' केले, म्हणजे त्या त्या धातूंत त्यानें 'ङकार व ञकार' घालून ते १।३।३ **हलन्त्यम्** या पाणिनीच्या सूत्रानें इत्संज्ञक होतील असें केलें. इतकें करूनही कदाचित् घोटाळा झाल्यास तो टाळावा म्हणून त्यानें 'परस्मैभाषाः, आत्मनेभाषाः, परस्मैपदिनः, आत्मनेपदिनः' असे शब्द शेवटीं घालून प्रत्येक भाग पठित केला. जसें– **भ्वादयः उदात्ता उदात्तेतः परस्मैभाषाः। चिरत्वनुदात्तः** । ६०१ 'धावु गतिशुद्ध्योः–उदात्तः स्वरितेत् उभयतो भाषः' ९४८ 'ष्मिङ् ईषद्धसने, गुङ् अव्यक्ते शब्दे, ९५० गाङ् गतौ–' वगैरे 'ङित्' धातू देऊन त्या भागाच्या शेवटीं–ष्मिङादयः अनुदात्ता आत्मनेभाषाः–असें वर्णन केलें आहे. या वरील सर्व वर्णनांत पूर्वीची पद्धत न मोडतां नवीन पद्धतीचाही त्यांत समावेश केलेला दिसतो.

धातुपाठांत 'आत्मनेभाष, परस्मैभाष–' हे शब्द 'आत्मनेपद व परस्मैपद–' या शब्दांपेक्षां पुष्कळ जास्त वेळां योजिलेले आहेत व 'आत्मनेपद व परस्मैपद' हे शब्दच फक्त पाणिनीनें अष्टाध्यायींत सर्वत्र योजलेले आहेत, यावरून पाणिनि हा धातुपाठाचा कर्ता नव्हे असें मि. पावटे यांचें म्हणणें आहे. हें म्हणणें सत्यास किती अंशानें धरून आहे तें पाहूं.

धातुपाठांत 'आत्मनेभाष व परस्मैभाष' हे शब्द जरी पुष्कळ वेळां आले असले तरी 'आत्मनेपद आणि परस्मैपद' हे शब्द त्यांतून अजिबात वगळले आहेत असें नाहीं. म्हणजे हे शब्दही धातुपाठकर्त्यास पूर्णपणें माहीत होते, इतकेंच नव्हे तर ते शब्द त्यानें 'आत्मनेभाष व परस्मैभाष' या शब्दांच्या अर्थींच धातु-पाठांत योजलेले आहेत. पाणिनीनें अष्टाध्यायींतील सूत्रांनीं ज्याप्रमाणें 'परस्मैपद व आत्मनेपद' हे शब्द साधलेले आहेत त्याप्रमाणें त्याच सूत्रांनीं 'परस्मैभाष व आत्म-नेभाष' हे शब्दही साधलेले आहेत, असें आमचें म्हणणें आहे. ते शब्द ज्या सूत्रांनीं साधलेले आहेत तीं सूत्रें अशीं:–६।३।७ **वैयाकरणाख्यायां चतुर्थ्याः** व ६।३।८ **परस्य च**– हीं तीं सूत्रें होत. या सूत्रांचे अर्थ असे:–व्याकरणशास्त्रांत योजलेलीं

नांवें हे अर्थ दाखवावयाचे असल्यास 'आत्मन् व पर'–या शब्दांहून केलेल्या चतुर्थी-विभक्ति–प्रत्ययाचा 'अलुक्' होतो. असा या दोन सूत्रांचा मिळून अर्थ आहे. या सूत्रांत 'पद'–हा शब्द पुढें असला तरच चतुर्थीचा 'अलुक' होतो असें विधान मुळींच नाहीं. 'पद व भाष' यांपैकीं कोणताही शब्द पुढें असला तरी या सूत्रांनीं 'अलुक्' होणारच. 'पद व भाष' हे शब्द उत्तरपद व 'आत्मन् व पर–' हे शब्द पूर्वपद–असे समास बनून झालेले शब्द व्याकरणशास्त्रांतील 'आख्या' आहेत. हें पाणिनीला पक्कें माहीत होतें.

वरील विवेचनावरून 'आत्मनेभाष व परस्मैभाष–' या शब्दांच्या धातुपाठां-तील बाहुल्यानें मि. पावटे यांच्या वरील विधानास पुष्टि मिळते असें आम्हांस वाटत नाहीं.

धातुपाठाच्या कर्त्यानें धातुपाठांत धातूंची रचना अशी केली आहे कीं, अष्टा-ध्यायींतील 'तिङन्त' प्रकरणांतील सूत्रांच्या उपयोगाकरितां ती तशी रचना त्यानें केली असावी असें कोणासही वाटेल. ती रचना कशी आहे व अष्टाध्यायींतील सूत्रांना तिचा उपयोग कसा होतो तें पाहूं.

अष्टाध्यायींत ७।१।५८ **इदितोनुम् धातोः** असें सूत्र आहे. त्या सूत्राचा अर्थ असा–ज्या धातूच्या अंतीं असलेला ऱ्हस्व इकार इत्संज्ञक आहे अशा धातूला 'नुम्–आगम' होतो. अशा धातूंना 'इदित् धातु' म्हणतात. धातुपाठांत असे 'इदित्' धातु कितीतरी आहेत. त्या धातूंसंबंधानें ७।१।५८ या सूत्राचा उपयोग झालेला आहे. त्याचप्रमाणें 'इरित् धातूही' पुष्कळ आहेत. तेथें 'लुङ्लकार' प्रत्यय केल्यानंतर ३।१।५७ या सूत्रानें 'च्लि'ला विकल्पानें 'अङ्' झालेला आढळेल. तसेंच 'ऊदित्' धातूं-संबंधानें ७।२।४४ **स्वरतिसूति.** या सूत्राचा व 'एदित्' धातूसंबंधानें ७।२।५८ **ह्म्यन्तक्षण**......या सूत्राचा–उपयोग झालेला आहे. तात्पर्य धातुपाठांतील कोणताही धातु अष्टाध्यायींतील 'तिङन्त' प्रकरणाशीं संबंध असलेल्या सूत्रांच्या तडा-क्यांतून सुटला आहे असें वाटत नाहीं.

ऋकारान्त व ॠकारान्त अशा धातुपाठांतील धातूंसंबंधानें, विशिष्ट परिस्थितींत कार्यें करणारीं व 'तिङन्त' रूपें बनविणारीं अशीं अष्टाध्यायींतील ७।४।११ व ७।४।१६ हीं सूत्रें फार व्यापक स्वरूपाचीं आहेत.

धातुपाठांतील धातूंचीं कृदन्त रूपें बनविणारीं अष्टाध्यायींतील पुष्कळ व्यापक स्वरूपाचीं जीं सूत्रें आहेत तीं खालीं दिलीं आहेतः–१।२।२३ **नोपधात्थफान्ताद्वा,** ३।३।१२८ **आतो युच्,** ३।३।१२१ **हलश्च,** ३।३।५७ **ऋदोरप्,** ३।३।५६ **एरच्,** ३।२।१४८ **चलनशब्दार्थादकर्मकात् युच्,** ३।२।१५१ **क्रुधमण्डा-र्थेभ्यश्च,** ३।२।१५२ **नयः,** ३।२।१८८ **प्रतिबुद्धिपूजार्थेभ्यश्च,** ३।४।७२

**गत्यर्थाकर्मक** ... ... ... ३।१।१४० **ज्वलितिकसन्तेभ्योणः**, ३।१।१३५ **इगुपधज्ञाप्री** ...वगैरे.

धातुपाठांतील एकेका विशिष्ट धातूसंबंधानें 'तिङन्त व कृदन्त' रूपें साधणारीं शेंकडों सूत्रें अष्टाध्यायींत आहेत.

धातुपाठांत विशिष्ट धातूंचे कांहीं समुदाय बनविले आहेत व त्या विशिष्ट धातूंच्या समुदायासंबंधानें विशिष्ट कार्यें सांगणारीं सूत्रें अष्टाध्यायींत 'तिङन्त व कृदन्त' प्रकरणांत आहेत; त्यावरून धातुपाठांकरितां अष्टाध्यायींतील तीं सूत्रें व अष्टाध्यायींतील त्या सूत्रांकरितां धातुपाठांतील त्या समुदायामध्यें असलेले धातु, कोणीतरी एका पंडितानें एकमेकांच्या उपयोगाकरितां मुद्दाम तसे बनविले असावेत असें वाटतें. जसें—दिवादिगणांतील–' रधादयो वेट उदात्तेतः परस्मैभाषाः ' अशा वर्णनानें घातलेले ११९२ ' रध हिंसासंराध्योः–' या धातूपासून १२०० ' ष्णुहप्रीतौ ' या धातूपर्यंत असलेल्या रधादि समुदायांतील धातूंसंबंधानें अष्टाध्यायींतील ७।२।४५ **रधादिभ्यश्च**– या सूत्रानें त्या धातूंहून केलेल्या कांहीं आर्धधातुक प्रत्ययांना ' वेट् ' करून धातुपाठांतील त्या धातूंचें ' वेट् ' असें वर्णन केलें आहे तें सार्थ केलें असें म्हणण्यास जशी हरकत नाहीं, तशीच हरकत अष्टाध्यायींतील वरील सूत्रांच्या सार्थतेकरितां धातुपाठांतील रधादिधातूंचा समुदाय करून तो ' वेट् ' आहे असें जें वर्णन धातुपाठांत केलें आहे तें मुद्दाम तसें केलें असें म्हणतांना नसावी अशा तऱ्हेची ती घटना आहे. असेंच विधान खालील सूत्रें व धातुपाठांतील समुदाय यांसंबंधानें करितां येईल.

| सूत्रें | धातुपाठ |
|---|---|
| ७।३।७४ **शमामष्टानां दीर्घः श्यनि** <br> ३।२।१४१ **शमित्यष्टाभ्योघिनुण्** | दिवादिगणांतील ' शमु ' वगैरे ८ धातु एकामागून एक असे दिलेले आहेत. |
| ७।३।८० **प्वादीनां ऱ्हस्वः** | प्वादिगणांतील १४८३ 'पूञ्'–धातूपासून अगदीं ओळीनें दिलेले धातु. |
| ७।१।५९ **शे मुचादीनाम्** | तुदादिकांत १४३१ ' मुच्लृ मोक्षणें ' या धातूपासून १४३८ ' पिश्अवयवे '–या धातूपर्यंत सारखे ओळीनें आहेत. |
| ७।४।७६ **भृञामित्** | जुहोत्यादिगणांत १०८७ ' डुभृञ् ' १०८८ ' माङ् ' १०८९ ' ओहाङ् ' हे या समुदायांतील धातु ओळीनें दिलेले आहेत. |
| ७।२।७६ **रुदादिभ्यः सार्वधातुके** | अदादिगणांतील १०६७ ' रुद् ( रुदिर ) ' या धातूपासून 'स्वप्, श्वस्, अन्, जक्ष्,' हे पांच रुदादिसमुदायांतील धातु ओळीनें दिले आहेत. |

| सूत्रें | धातुपाठ |
|---|---|
| १।२।१ **गाङ् कुटादिभ्यः** | तुदादिगणांत १३६७ 'कुट्'—या धातूपासून १४०२ 'कुङ्'—या धातूपर्यंत कुटादिसमुदायांतील धातु ओळीनें दिलेले आहेत. |
| ६।४।३७ **अनुदात्तोपदेश वनति तनोत्यादीनाम्** | तनादिगणांतील १४६४ 'तनुविस्तारे'— या धातूपासून १४७२ 'मनु—या' धातूपर्यंत तनोत्यादिसमुदायांतील धातु ओळीनें दिले आहेत. |
| ६।१।१५ **वचि स्वपि यजादीनां किति** | भ्वादिगणांत १००२ 'यज्' धातूपासून यजादि समुदायांतील 'वप्, वह, वस्, वेञ्, व्येञ्, ह्वेञ्, वद् आणि श्वि'—हे धातु ओळीनें दिलेले आहेत. |
| ६।४।१२५ **फणानांच सप्तानाम्** | भ्वादिकांत ८२१ 'फणगतौ' या धातूपासून फणादि समुदायांतील सात धातु ओळीनें दिलेले आहेत. |
| १।३।९२ **वृद्भ्यःस्यसनोः** | भ्वादिकांत ७५८ 'वृतु'—हा धातु धरून पांच धातु ओळीनें दिलेले आहेत. |
| १।३।९१ **द्युद्भ्यो लुङि** ३।१।५५ | भ्वादिकांतील ७४१ 'द्युत'— या धातूला धरून ७६२ 'कृप्' धातूच्या—अंतापर्यंत द्युतादि धातुसमुदाय एकसारखा ओळीनें दिला आहे. |

धातुपाठांत कांहीं धातूंतील आदि—टुकार, आदि—डुकार व आदि—ञिकार, इत्संज्ञक १।३।५ या सूत्रानें करून त्या इतसंज्ञक धातूकरितां पाणिनि पुढें ३।३।८९ **ट्वितोथुच्** ३।३।८८ **ड्वितःत्क्रिः** ३।२।१८७ **ञीतःक्तः** अशीं सूत्रें करणार आहे. करितां त्याचेसाठीं आगाऊ 'टुओश्वि गतिवृद्ध्योः सारखे ट्वित्' 'डुकृञ् करणें यांसारखें 'ड्वित्' व 'ञिधृषा प्रागल्भ्ये' सारखे 'ञीत्' धातु कोणी तरी अगोदर निर्माण करून त्यानें धातुपाठ बनविला असेल असें वाटत नाहीं. हेंच आमचें म्हणणें धातुपाठांतील आदित, ईदित् ऌदित, ओदित्, ऊदित्, उदित इरित्, अशा धातूसंबंधानेंही आहे. कारण आदित् धातूकरितां ७।२।१६ **आदितश्च** हें सूत्र, ईदित धातूसंबंधानें ७।२।१४ **श्वीदितो निष्ठायाम्** हें सूत्र, ऌदित् धातूसंबंधानें ३।१।५५ **पुषादिद्युताद्यॢदितः**— 'ओदित्' धातूसंबंधानें ८।२।४५ **ओदितश्च** हें सूत्र, इत्यादि सूत्रासंबंधानें आहे. 'ओदित' धातूसंबंधानें आणखी एक विशेष गोष्ट आहे ती ही—धातूपाठांतील दिवादिगणांत ११३२ **षूङ् प्राणिप्रसवे** या धातूपासून ११४० **वृङ् वृणोत्यर्थे**

या धातूपर्यंत असलेल्या धातूंस स्वादि समुदाय असें मानून त्यांना–'स्वादय ओदितः' या वचनानें धातुपाठानेंच ' ओदित् ' बनविलें आहे तें ८।२।४५ **ओदितश्च**–या अष्टाध्यायींतील सूत्राकरितां नव्हे असें कोण म्हणूं शकेल ? 'इदित्' धातुसंबंधानें ७।१।५८ **इदितोनुम्धातोः**, 'उदित्' धातूसंबंधानें ७।२।५६ **स्वरतिसूति** हें सूत्र. 'एदित्' धातूसंबंधानें ७।२।५ **हम्यन्तक्षण,** हें सूत्र, ' हलन्त' धातूसंबंधानें ३।१।१२४ **ऋहलोर्ण्यत्** – हें सूत्र, ' षित् ' धातूसंबंधानें ३।३।००४ **षिद्भिदादिभ्योङ्**–हें सूत्र. या सूत्रासंबंधानेंही वरीलप्रमाणेंच आमचें म्हणणें आहे. 'षित्' धातूसंबंधानें आणखी एक विशेष गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे ती अशी–भ्वादिकांतील ७६३ 'घट चेष्टायाम्' या धातूपासून ७७५ ' ञित्वरा संभ्रमे ' या धातूपर्यंत जे तेरा धातु आहेत त्यांना धातुपाठानें–अथत्वरत्यन्तास्त्रयोदशानुदात्तेतः षितश्च–असें वचन घालून त्या धातूंना ' षित् ' बनविलें तें ३।३।१०४ **षिद्भिदादिभ्योङ्**–या सूत्राच्या उपयोगाकरितांच होय.

मित्–धातूसंबंधानें ६।४९२ **मितांऱ्हस्वः** व ६।४।९३ **चिण्णमुलोर्दीर्घोऽन्यरस्याम्** हीं सूत्रें आहेत. 'मित्' धातूसंबंधानें भ्वादिकांतील ७६३ 'घटचेष्टायाम्' या धातूपासून ८१७ 'स्वन अवतंसने' या धातूपर्यंत जे धातु धातुपाठांत आहेत त्यांना ' घटादि ' धातु असें नांव देऊन धातुपाठानें त्यांना **घटादयोमितः** – या गणसूत्रानें 'मित्' बनविलें आहे तें ६।४।९२ व ६।४।९३ या सूत्रांच्या उपयोगाकरितांच होय. **घटादयोमितः** या गणसूत्रानंतर आणखी कांहीं गणसूत्रें 'मित्'-संज्ञाविधायक व कांहीं गणसूत्रें 'मित्' संज्ञानिषेधक आहेत. या सर्व धातुपाठांतील गणसूत्रांवरून असें अनुमान करण्यास हरकत नाहीं कीं, अष्टाध्यायींतील वर दिलेलीं दोन सूत्रें धातुपाठांतील कोणत्या धातूंना लागूं होतात व कोणत्या धातूंना लागूं होत नाहींत हें निश्चित व्हावें. या शिवाय त्या गणसूत्रांचा दुसरा उपयोग असणें शक्य नाहीं.

वरील सर्व विवेचनावरून अष्टाध्यायीच्याप्रमाणेंच धातुपाठाचाही कर्ता पाणिनिच असला पाहिजे असें समजण्यास हरकत नाहीं असें आम्हीं सिद्ध केलें आहे. आतां मि. पावटे यांनीं आपल्या म्हणण्याच्या शाबितीकरितां जीं प्रमाणें दिलीं आहेत त्यांचा विचार करूं.

त्यांनीं जीं प्रमाणें दिलीं आहेत त्यांत-'उपदेशः'–या अष्टाध्यायींत येणाऱ्या पदाचा अर्थ so whatever else may or may not be उपदेश the Dh.P. is preeminently उपदेश–असा केला आहे व धातुपाठ पाणिनीच्या पूर्वाचार्यांनीं केला असा त्यांचा निर्णय आहे. तो सत्यास किती अंशानें धरून आहे तें पाहूं.

आम्हीं मागें धातुपाठाचा विचार केला आहे त्यांत सांप्रत अस्तित्वांत असलेला धातुपाठ बनण्याच्या पूर्वी संस्कृत भाषेंतील धातूंची स्थिति कशी होती तें स्पष्ट केलें

आहे. त्याचा गोषवारा येथें देत आहें. (१) संस्कृतांतील सर्व धातु एका पंडितानें किंवा संप्रदायानें एकत्रित करून ठेविलेले नव्हते. कांहीं धातु व त्यांचे अर्थ एका आचार्यानें, दुसरे कांहीं धातु व त्यांचे अर्थ दुसऱ्या आचार्यानें, व तिसऱ्या कांहीं आचार्यांनीं पहिल्या व दुसऱ्या आचार्यांनीं स्वीकारलेले धातु व त्यांचे अर्थ थोडेसे फिरवून स्वीकारलेले होते असें दिसतें. असें दिसतें म्हणण्याचें कारण धातुभेद, अर्थभेद व इतर मतान्तरें दाखविण्याकरितां धातुपाठांत, चकार, अपि, इति–अन्ये, इति–अपरे, इति–केचित्–असे शब्द वारंवार घातलेले आढळतात. चकार वगैरे वर दिलेले धातुपाठांतील शब्द असें दाखवितात कीं, धातुपाठ करण्याच्या पूर्वी, धातुस्वरूपांत, धातूंच्या आदि व अन्त्य वर्णांत, व धातूंच्या अर्थांत पुष्कळ भेद होते. शिवाय धातुपाठ करावयाच्या कालांत व पूर्वीचे भेद दाखविणाऱ्या कालांत बऱ्याच मोठ्या कालाचें अंतर पडलेलें असल्यामुळेंही नवीन उत्पन्न झालेले भेद–अशी स्थिति धातुपाठ करण्याच्या वेळेची होती. निरनिराळ्या आचार्यांनीं दिलेले निरनिराळ्या धातूंचें व अर्थांचें एकत्रीकरण करणें, धातु व अर्थ निश्चित करणें, सद्यःस्थितीस अनुकूल अर्थ बनविणें व हें सर्व आपल्या स्वतःच्या शब्दांत सांगणें–इतकीं कामें धातुपाठकर्त्यास करावयाचीं होतीं. धातुपाठांत धातुपाठकर्त्यानें कोणत्या तरी एका आचार्याचे शब्द घालणें अशक्य होतें. त्यानें प्रत्येक आचार्याकडून कांहीं भाग घेऊन तो भाग दुसऱ्या आचार्याकडून घेतलेल्या भागाशीं मिळता करावा व आपल्या शब्दांत तो धातुपाठांत घालावा असें झालें असावें असें वाटतें. जसें भ्वादिकांतील २९४ ‘कटे वर्षावरणयोः’ हा धातु घेतला–त्या धातूसंबंधानें दुसरे कांहीं वैयाकरणांनीं तो धातु ‘कटे–’ असा नसून–‘चटे–’ असा आहे असें दाखविण्याकरितां ‘चटे इत्येके’ असे शब्द धातुपाठांत घातलेले आहेत. ३१४ ‘लुठ विलोडने’ या धातूसंबंधानें–‘डान्तोयमित्येके’ असें म्हटलें आहे. ३१७ ‘विट् आक्रोशे’ या धातूसंबंधानें ‘हिट् इत्येके’ असें म्हटलें आहे. ७७२ ‘कदि’ ७७३ ‘क्रदि’ ७७४ ‘क्लदि वैक्लव्ये–’ या धातूंसंबंधानें ‘वैकल्य इति एके, त्रयोपि अनिदित इति नन्दी, इदित इति स्वामी, कदिक्रदी इदितौ, क्रदक्लदाविति चानिदितौ इति मैत्रेयः–’ या शेवटच्या तीन धातूंसंबंधानें इतकीं मतान्तरें आहेत. त्यांतील जें मत, धातुपाठकर्त्यास पसंत होतें तें त्यानें प्रथम सांगितलें व सर्वच धातु ‘इदित्’ असल्याचें त्यानें दाखविलें व त्यांचा अर्थही–आपणांस पसंत असा–आपल्या शब्दांत दिला. वरील सर्व उदाहरणांत ‘उपदेश’ पदानें कोणाचें मत प्रमाण मानावें म्हणजे कोणास ‘उपदेश’ म्हणावें याबद्दल शंका उपस्थित होते. यांतील सर्वच पूर्वाचार्य आहेत. सिद्धान्तकौमुदींत ‘उपदेश’ पदाचा अर्थ– ‘आद्योच्चारणम्’– असा केलेला आहे. ‘आद्यानांउच्चारणम्–आद्योच्चारणम्’. वर दिलेल्या मतांपैकीं कोणतें मत आद्याचार्यांचें आहे असें समजावें? मि. पावटे यांनीं आद्याचार्य कोणास म्हणावें याचें गमक दिलेलें नाहीं. याचें कारण

त्यांचें लक्ष धातुपाठांतील या मतान्तराकडे गेलेलें नसावें असें वाटतें. आमचें मताप्रमाणें–'कटे वर्षावरणयोः, ३१४ लुठविलोडने,' ३१७ 'विट्आक्रोशे', ७७२ कदि, ७७३ क्रदि, क्लदि वैक्लव्ये–' हीं आद्योच्चारणें आहेत. याचें कारण असें. धातुपाठकर्त्यानें पूर्वाचार्यांचीं सर्व मतान्तरें संकलित करून, त्यांतून त्याच्या कालच्या वाङ्मयांतील प्रयोगाशीं अनुकूल असलेले जे धातु व त्यांचे जे अर्थ त्याला पसंत पडले ते धातु व ते अर्थ त्यानें धातुपाठांत आपल्या शब्दांनीं घातले. इतकें महत्त्वाचें काम धातुपाठासंबंधानें करणारा आचार्य पाणिनिच असला पाहिजे असें आमचें मत आहे. धातुपाठासारखें महत्त्वाचें व बुद्धिमत्तेचें काम करणारा पाणिनीशिवाय दुसरा कोणी आचार्य असता तर धातुपाठांत कोठेंतरी त्याचें नांव आलें असतें. तसें दुसऱ्या कोणाचें नांव आलेलें नाहीं. जें कांहीं नांव आलेलें आहे तें पाणिनीचेंच आहे. धातुपाठाच्या शेवटीं 'इति पाणिनिमुनि–प्रणीतो धातुपाठः समाप्तः'– असा शेरा आहे. वरील कारणाकरितां आद्य शब्दाचा अर्थ पाणिनि असाच आम्ही करितों म्हणून उपदेश शब्दांत पाणिनीनें केलेला जो धातुपाठ त्याचाही समावेश होतो. उपदेश या शब्दांत नुसता धातुपाठच आणि तोही preeminently येतो असें नसून त्यांत अष्टाध्यायींत असलेले प्रत्येक सूत्रांतील शब्द, सूत्रांनीं सांगितलेले प्रत्यय, आगम, आदेश, अनुस्वार, अनुनासिक, विसर्ग, व इतर कार्यें, व गणपाठ व लिंगानुशासन इतके भाग येतात.

अष्टाध्यायींत ६।४।४८ **अतोलोपः** असें सूत्र आहे. हें सूत्र ६।४।४४ **आर्धधातुके** या सूत्राच्या अधिकारांतील असल्यामुळें अधिकारसूत्रांतून या सूत्रांत 'आर्धधातुके' या पदाची अनुवृत्ति होते. त्याप्रमाणेंच ६।४।३७ **अनुदात्तोपदेश** या सूत्रांतून 'उपदेशे' या पदाची अनुवृत्ति केल्याशिवाय ६।४।४८ या सूत्राची इष्टसिद्धि होत नाहीं. म्हणून तेथून या सूत्रांत 'उपदेशे' या पदाची मुद्दाम अनुवृत्ति करावी लागते म्हणून त्या सूत्राचा अर्थ– अमक्या विशिष्ट आर्धधातुक प्रत्ययाचें विधान एखाद्या सूत्रानें करण्याच्या वेळीं म्हणजे उपदेशकाळीं, जें अकारान्त रूप असेल त्या रूपांतील शेवटच्या अकाराचा लोप, तो आर्धधातुक प्रत्यय पुढें असतांना होतो–असा आहे. यावरून अष्टाध्यायींतील सूत्र, त्या सूत्रानें केलेला प्रत्यय व तें सूत्र करण्याचा काळ–इतके अर्थ उपदेश शब्दानें येतात असें म्हणण्यास हरकत नाहीं. ६।४।४८ **अतोलोपः** या सूत्राचें उदाहरण–२।४।४२ **हनो वध लिङि** २।४।४३ **लुङिच** या सूत्रांनीं 'हन्' धातूला 'वध' असा अकारान्त आदेश, 'लिङ् व लुङ्' हे प्रत्यय पुढें असतांना केला–तेथें दृष्टीस पडतें. 'आशीर्लिङ् व लुङ्' हे आर्धधातुक प्रत्यय 'हन्' धातूहून केल्याबरोबर 'हन्' धातूला 'वध' असा अकारान्त आदेश झाला. 'आशीर्लिङ् व लुङ्' हे आर्धधातुक प्रत्यय 'हन्' धातूहून करणें हाच त्यांचा उपदेश होय. येथें उपदेशपदानें काळ हा अर्थ आला. ते प्रत्यय झाल्याबरोबर 'हन्' धातूला 'वध' असा अकारान्त आदेश झाला. तो आदेश होते वेळीं म्हणजे त्याच्या उपदेशकालीं तो 'अनेकाच्' आहे व अकारान्तही आहे म्हणून

६।४।४८ या सूत्रानें अकाराचा लोप झाला. तो आदेश उपदेशकाळीं ' अनेकाच् ' आहे म्हणून ७।२।१० या सूत्रानें इडागमाचा निषेध न होतां इडागम झाला व 'अवधीत्' असें 'लुङ्'चें रूप बनलें. ७।२।१० **एकाच उपदेशे**–या सूत्रांत–उपदेशे–या शब्दानें आदेशाचा उपदेशकाल असाही अर्थ घेतला पाहिजे असें वरील स्पष्टीकरणावरून दिसेल. यावरून उपदेश शब्दानें आदेश हा अर्थ येतो असें झालें. याप्रमाणेंच बाकींचे अर्थही उपदेश–या शब्दांत येतात असें दाखवितां येण्यासारखें आहे.

मि. पावटे यांनीं–पाणिनि हा धातुपाठाचा कर्ता नव्हे असें दाखविण्याकरितां आणखी एक प्रमाण दिलें आहे तें त्यांच्या शब्दांत इंग्लिशमध्यें उद्धृत केलें आहे. तें असें:–

In the Ashtd: ifself there are two Kinds of Sutras which support this contention of ours, that the author of the Asutd: is not the author of the Dh. P. First, Sutras that are supplementary to the Dh. P. and secondly Sutras that go against the Dh. P., and contradict what has been taught in the Dh. P. यांपैकीं पहिल्या प्रकारापैकीं म्हणून त्यांनीं ३।१।५७ **इरितोवा** आणि ३।१।५८ **जॄस्तम्भुम्रुचुम्लुचुग्रुचुग्लुचुग्लुञ्चुश्विभ्यश्च**–हीं दोन सूत्रें दिलीं आहेत. ३।१।५८ सूत्रासंबंधानें त्यांचें म्हणणें कीं, पाणिनि जर धातुपाठाचा कर्ता असता तर त्यानें ३।१।५८ या सूत्रांत दिलेले ' जॄ '–वगैरे सर्व धातु कोणत्याही रीतीनें ' इरित् ' केले असते व त्यामुळें ३।१।५८ हें अष्टाध्यायींतील सूत्र करण्याचें त्याला कारणच राहिलें नसतें. हें सूत्र न केलें तरी वरील सर्व धातु ' इरित् ' झाल्यामुळें ३।१।५७ **इरितोवा** या सूत्रानेंच 'जॄ' वगैरे धातूंहून केलेल्या ' च्लि '–प्रत्याला विकल्पानें ' अङ् ' झाला असता.

असा जो आक्षेप मि. पावटे यांनीं आणिला आहे त्याचें निराकरण सहज होण्यासारखें आहे तें असें– धातपाठांत 'जॄ'–धातु तीन गणांत आहेत. ' क्र्यादि व चुरादि ' गणांतील तो धातु ' जॄ वयोहानौ '–असा ' अषित् ' आहे. दिवादिगणांतील तो धातु ' जॄष् वयोहानौ ' असा ' षित् ' आहे. चुरादिगणांतील ' जॄ ' –धातु ' विभाषितणिच् ' आहे असें–' आधृषाद्वा '–या धातुपाठांतील गणसूत्रानें ठरविलें असल्यामुळें तो भ्वादिगणांतील आहे असें समजण्यास कांहीं हरकत नाहीं. त्याचीं रूपें ' जरति, जीर्यात्, अजरत्–अजारीत् '–वगैरे होऊं शकतात. दिवादिगणांतीलच ' जॄ '–धातु ' षित् ' आहे. ३।१।५८ सूत्रांतील ' जॄ ' धातु ' षित् ' व ' अषित् ' असाच असला पाहिजे. काशिकाकाराच्या म्हणण्याप्रमाणें तो 'षित्'च आहे हें म्हणणें सत्यास धरून नाहीं. मि. पावटे म्हणतात त्याप्रमाणें ' जॄ ' धातु धातुपाठांत 'इरित्' करावयाचा तर तीनही गणांतील 'जॄ'–धातु 'इरित्' करणें **धातुपाठकर्त्याला अवश्य आहे.**

'षित्' असलेल्या 'दिवादि व क्र्यादि' गणांतील 'जॄ'–धातूला 'इरित्' केलें असतां तो 'उदात्तेत' झाला नसता. धातुपाठांत ते धातु ' उदात्त व उदात्तेत् ' आहेत असें म्हटलें आहे. शिवाय जो ' षित् जॄ ' धातु आहे त्याचें कृदन्तरूप ३।३।१०४ षिद्भिदादिभ्योऽङ्–या सूत्रानें 'अङ्' होऊन 'जरा' असें बनतें, तसें त्या धातूचें रूप 'इरित्' केलें असतें तर झालें नसतें. ' जॄष् ' हा धातु ' इरित् व षित् ' ही पाहिजे तर त्याचें धातुपाठांतील स्वरूप कसें झालें असतें, हा एक प्रश्नच आहे. त्यांतील ' षकार व इर् '–या दोन्ही भागांना ' इत् ' संज्ञा झाली पाहिजे. ती कोणत्या सूत्रानें करावयाची ? हल्लीं अष्टाध्यायींत असलेल्या धातूंतील ' हल् व अच् ' यांना 'इत्' संज्ञा करणाऱ्या सूत्रांनीं ती होणें शक्य नाहीं. त्याकरितां पाणिनीला निराळें सूत्र करावें लागलें असतें. मग हा धातु 'इरित्' करण्यांत लाघव काय राहिलें ? हा फक्त एका धातूसंबंधानें विचार झाला.

आतां त्या सूत्रांतील ' श्वि '–धातूसंबंधानें विचार करूं. हा धातु धातुपाठांत १०१० ' टु ओश्विगतिवृद्ध्योः '–असा भ्वादिकाच्या शेवटीं आहे. हल्लीं या धातूंतील टुकार आणि ओकार 'इत्'संज्ञक आहेत. टुकार 'इत्' संज्ञक असल्यामुळें ३।३।८९ ट्वितोऽथुच्–या सूत्रानें ' अथुच् ' प्रत्यय होऊन ' श्वयथुः ' असें कृदन्तरूप बनत असतें. व तो 'ओदित्' असल्यामुळें ८।२।४५ ओदितश्च–या सूत्रानें ' उच्छूनः ' असें रूप बनत असतें. शिवाय धातुपाठामध्यें हल्लींच्या स्थितींत तो धातु उदात्त मानिलेला आहे. मि. पावटे म्हणतात त्याप्रमाणें या धातूला–इर्–जोडायचा, तो कोठें ? टु व ओ–हीं अक्षरें कायम ठेऊन कीं नाहींशीं करून ? या दोन प्रश्नांचीं उत्तरें पावटे यांनीं दिलेलीं आहेत असें वाटत नाहीं. हीं अक्षरें कायम ठेऊन शेवटीं 'इर्' जोडल्यास तो धातु उदात्तच राहील अशी खात्री कोण देऊं शकेल ? जर तो उदात्त रहात नसेल तर धातुपाठांत तशी दुरुस्ती करणें प्राप्त आहे. दुरुस्ती करून हा धातु 'टुओश्वीर्' असा झाला असता. 'टुओश्वीर्'–यांत 'टुओश्वि+इर्' किंवा 'टुओशु+ईर्' असा संधि–विग्रह होणें साहजिक असल्यामुळें 'टुओश्वि+इर्–'असाच संधि–विग्रह येथें केला पाहिजे असें विधान धातुपाठांत करणें अवश्य झालें असतें मग लाघव कोठें व कसें राहिलें ? टुकार आणि ओकार हीं अक्षरें काढून टाकून नुसता 'इर्' जोडून हा धातु बनविल्यास, 'श्वयथुः व उच्छूनः' हीं रूपें दुसऱ्या कोणत्या धातूपासून होऊं शकतील ? याबद्दल मि. पावटे यांनीं कांहीं तोड सुचविलेली नाहीं. एकंदरींत हा धातु 'इरित्' करण्यांत लाघव येत नाहीं हें खास. या दोन धातूंसंबंधानें मि. पावटे यांनीं, वर आम्हीं दिलेल्या कारणांकरितां नव्हे तर ' जॄ व श्वि' या–धातूंचें स्वरूप पालटणें शक्य नाहीं, या कारणाकरितां **जॄश्विभ्याम्** असें सूत्र पाणिनीनें करावयास पाहिजे होतें अशी कबुली दिली आहे ही समाधानाची गोष्ट आहे.

त्या सूत्रांतील बाकीचे धातु 'स्तम्भु, म्रुचु म्लुचु, ग्रुचु, ग्लुचु आणि ग्लुञ्चु' असे सहा आहेत. त्यांपैकीं 'स्तम्भु,' हा धातु 'सौत्र' आहे. 'सौत्र' आहे म्हणजे तो धातुपाठांतील नव्हे. 'सौत्र' धातूसंबंधानें पुढें या प्रस्तावनेंत विवेचन केलें आहे. 'स्तम्भु' हा धातु धातुपाठांत नसल्यामुळें त्याची कांहीं तरी सोय एखाद्या सूत्रांत करणें पाणिनीला अवश्य होतें. 'स्तम्भु' धातु सोडून बाकीचे पांच धातु भ्वादिकांतच आहेत. दुसऱ्या कोणत्याही गणांत नाहींत ही गोष्ट खरी. सध्यां हे धातु 'उदात्ताः' आणि 'उदात्तेत' असें धातुपाठांत मानिलेले आहेत. या धातूंच्या आदि 'उकार' व अंतीं 'इर्'–हीं 'इत्'संज्ञक अक्षरें घातल्यानंतर ते धातु 'उदात्त आणि उदात्तेत' राहतील कीं नाहीं याची शंका आहे. ही कुशंका आहे असें समजलें तरी हे पांच धातु 'इरित्' केले नाहींत. एवढ्या एका कारणाकरितां पाणिनि हा धातुपाठाचा कर्ता नव्हे असें मानणें धाष्टर्य आहे असें आमचें कायम मत आहे. असें आमचें मत होण्यास बरींच प्रमाणें कारण आहेत. त्या प्रमाणाबद्दल आम्हीं मागें विवेचन केलेलें आहे. त्याशिवाय आणखी एक कारण आहे तें असें–पाणिनीनें अष्टाध्यायींतील कांहीं सूत्रांत 'स्तम्भु, तु, ऋति'–सारखे कांहीं धातु–सौत्र–म्हणून दिलेले आहेत. ते धातु धातुपाठांत नाहींत ही गोष्ट खरी. तरी धातुपाठाचा कर्ता पाणिनि असता तर त्यानें हे 'सौत्र' धातु धातुपाठांत गोवले असते हें म्हणणें खरें नाहीं, कारण–धातुपाठांतील सर्व धातु–उदात्त, अनुदात्त, स्वरित्, उदात्तेत्, अनुदात्तेत् आणि स्वरितेत्–अशा शब्दांनीं वर्णिलेले आहेत. उदात्त, अनुदात्त आणि स्वरित् हे स्वर ज्या कालीं श्रवणप्रत्ययास येत होते त्या काळीं वैदिक मुनींनीं ते सर्व धातु एकत्रित करून उदात्तादि स्वरांनीं वर्णन करून ठेविलेले होते. पुढें ते स्वर ज्याकालीं श्रवणप्रत्ययास येईनासे झाले म्हणजे ते स्वर लुप्त झाले तेव्हां त्यांच्या स्वरांसंबंधानें व 'इत्' अक्षरासंबंधानें निरनिराळ्या मुनींत मतवैचित्र्य आलेलें दिसूं लागलें व त्या मतवैचित्र्याप्रमाणें निरनिराळे पाठ दिसूं लागले. धातुपाठाचा कर्ता पाणिनि हाच असें मानिलें तरी सर्वांनाच पूज्य असलेल्या वैदिक मुनींनीं उदात्तादि स्वरांनीं युक्त म्हणून वर्णन केलेल्या धातूंच्या त्या स्वरांत 'इत्' संज्ञकांत फेरफार करण्याचें स्वातंत्र्य त्याला नव्हतें. 'स्तम्भु'सारखे जे 'सौत्र' धातु आहेत त्यांसंबंधानें वैदिक मुनींनीं उदात्तादि स्वरांनीं कांहींच वर्णन केलेलें नसल्यामुळें, ते धातु धातुपाठांत घालणें पाणिनीला शक्य नव्हतें. म्हणून त्या धातूंची सोय त्यानें अष्टाध्यायींत केली. 'म्रुचु, म्लुचु' वगैरे धातूंसंबंधानें वैदिक मुनींनीं उदात्तादि स्वर निश्चित केलेले असल्यामुळें व त्यांच्या आदि 'उकार' व अंतीं 'इर्' हीं 'इत्' संज्ञक अक्षरें घालून त्यांच्या उदात्त स्वरांत फरक होणेचा संभव त्याला दिसल्यामुळें पाणिनीनें तसें न करितां निराळें सूत्र केलें असावें असें वाटतें. पाणिनीनें धातुपाठ करण्यांत काय नवीन केलें त्याबद्दल आम्हीं मागें विवेचन केलें आहे.

मि. पावटे यांनीं पाणिनि हा धातुपाठाचा कर्ता नव्हे हें सिद्ध करण्याकरितां आणखी एक कारण दिलें आहे तें असें– Sutras, which in effect ascribe a class or गण to a root, in addition to, to the one in which it occurs in the Dh. P.

या प्रश्नाचें प्रमाणांसह उत्तर देण्यापूर्वीं, पाणिनि होच अष्टाध्यायी व धातुपाठ या दोहोंचा कर्ता आहे असें आमचें स्पष्ट मत आहे हें पुन्हां एकदां सांगणें भाग आहे.

अष्टाध्यायी व धातुपाठ यांची सांगड अशी आहे कीं, एकाच्या सहाय्यावांचून दुसऱ्याचें अस्तित्व शक्य नाहीं. पाणिनीनें प्रथम 'अदादि, जुहोत्यादि, दिवादि' वगैरे 'चुरादि' गणांपर्यंतच्या प्रत्येक गणांत घालण्याजोगे धातु निरनिराळे केले व त्यांचीं विवरणें कायम केलीं. त्यांतील प्रत्येकांत विशिष्ट कारणाकरितां अवश्य असलेले धातूंचे समुदाय करून त्यांतील धातु एकामागून एक येतील असे योजले. 'श्यन्, श, श्नु, श्ना, णिच्' वगैरे विकरणें फक्त 'शप्' या विकरणाचेच अपवाद ठरविले. परंतु 'श्यन्' हा 'श'चा किंवा 'श' हा 'श्नु'चा किंवा 'श्ना'चा अपवाद होऊं शकत नाहीं असें केलें. याचा स्पष्टार्थ असा–'श्यन्' हें विकरण दिवादिगणाचें आहे. 'श्यन्' हा 'शप्'चा अपवाद असल्यामुळें 'श्यना'नें 'शपा'चा बाध होतो. म्हणून दिवादिगणांत असलेल्या धातूहून 'शप्' कधींच होणें शक्य नाहीं. परंतु 'श्यन्' या विकरणरूप अपवादाचा बाध करणारें दुसरें एखादें सूत्र असेल तर तेवढ्यापुरता 'श्यन्' विकरणाचा बाध होतो. अदादिपासून पुढील गणांतील धातु व समुदाय निश्चित केल्यानंतर पाणिनीनें बाकी जे धातु राहिले ते भ्वादिगणांत घातले ३।१।६८. **कर्तरि शप्** या सूत्रानें होणारें 'शप्' हें विकरण नुसतें भ्वादिकांतील धातूंहूनच होतें असें नसून तें विकरण यच्चयावत् धातुपाठांतील सर्व धातूंहून होतें. म्हणून 'शप्' हें विकरण सार्वत्रिक लागूं होणारें आहे. म्हणून 'श्यन्' वगैरे विकरणें 'शपा'चे अपवाद होऊं शकलीं. कारण प्राप्ति असल्याशिवाय बाध होऊं शकत नाहीं. हें प्रथम तत्त्व पाणिनीनें अष्टध्यायी व धातुपाठ यांत अंगिकारलेलें दिसतें. दुसरें जें तत्त्व पाणिनीनें या दोहोंतही अंगिकारिलें आहे तें असें.

एकच धातु दोन किंवा तीन, चार, गणांत घालावयाचा तर तो धातु इत्संज्ञक वर्णाच्या योगानें निराळा असावा किंवा गणसंबंधीं कांहीं निराळें कार्य त्या धातूला होत असावें किंवा गणांतील कांहीं धातूंचा समुदाय साधावयाचा असावा किंवा पद भिन्न असावें तर घालवयाचा. जसें–४।१।७० **भ्राशभ्लाशभ्रमुक्लमुत्रसित्रुटिलषः** हें सूत्र व त्यांतील धातु उदाहरणाकरितां घेतले, तर आपणांस काय दिसेल तें पाहूं. प्रथम 'भ्राश् व भ्लाश्' हे दोन धातु घेतले. हे दोन्ही धातु भ्वादिगणांतच आहेत. दुसऱ्या कोणत्याही गणांत विशेषेंकरून दिवादिगणांत नाहींत याचें कारण ते धातु दिवादिगणांत घालून कोणताही शमादिसमुदायाप्रमाणें

धातुसमुदाय दिवादिगणांत साधावयाचा नव्हता. परंतु भ्वादिगणांत मात्र तसा समुदाय हे दोन धातु त्यांत घालून साधावयाचा होता. धातुपाठ व अष्टाध्यायी या दोन्हींत पाणिनीनें अंगिकारिलेलें तत्त्व जर समुदाय साधावयाचा असेल तर एका गणांतला धातु दुसऱ्याही गणांत घालावयाचा असें होतें. भ्वादिगणांतील 'फण्' वगैरे सात धातु आहेत त्यांत 'भ्राश् व भ्लाश्' धातूंचा समावेश करून फणसमुदाय साधावयाचा व त्यायोगानें ६।४।१२५ **फणानां च सप्तानां** या अष्टाध्यायींतील सूत्राची कार्यसिद्धि करावयाची अशा हेतूनें पाणिनीनें हे धातु भ्वादिकांत घातले व 'शप्' विकरणाचें अपवाद असणाऱ्या, 'श्यन्' विकरणाचें विधान करणाऱ्या सूत्रांत या धातूंचा समावेश करून त्यांचीं 'श्यन्नन्त' रूपें साधून घेतलीं.

'भ्रमु'– हा धातु धातुपाठांतील भ्वादिकांत व दिवादिकांत आहे. त्यामुळें या धातूहून 'शप् व श्यन्' हीं दोन्हीं विकरणें एकाच काळीं प्राप्त झालीं, परंतु 'श्यन्' हें विकरण 'शपा'चा अपवाद असल्यामुळें 'शपाचा' नित्य बाध होऊन 'भ्रमति' असें रूप होणें नेहमीं अशक्य झालें असतें. तें साध्य करण्याकरितां या भ्वादिगणांतील धातूचा समावेश या सूत्रांत केला. या सूत्रांतील 'भ्रमु' धातु भ्वादिकांतीलच आहे असें मानिलें पाहिजे. म्हणूनच भ्वादिकांतील 'भ्रम्' धातूचीं रूपें 'भ्रम्यति व भ्रमति' अशीं होतात. दिवादिगणांतील 'भ्रम्'–धातूचें एकच रूप 'भ्राम्यति' असें बनतें तेथें 'श्यन्‌चा' विकल्प नाहीं. म्हणून दीर्घाचाही विकल्प नाहीं.

'लष्' धातु दिवादिगणांत घातला नाहीं याचें कारण दिवादिगणांत 'लष्' धातुसह कोणताही धातुसमुदाय दिवादिगणांत धातुपाठांत साधणेचा नव्हता. दिवादिगणाच्या धातुपाठांत तो जर घातला असता व भ्वादिगणांतही तो असता तर 'श्य'नानें 'शपा'चा नित्य बाध झाला व विकल्प झाला नसता व भ्वादिगणांतील पाठ व्यर्थ झाला असता. हे तीन अनर्थ टाळण्याकरितां या धातूचा पाठ भ्वादिगणांत केला व सूत्रानें 'श्यना'चा विकल्प केला.

'त्रस्' हा धातु दोन गणांत आहे. व त्याचे 'इत्' संज्ञक वर्णही भिन्न आहेत. दिवादिगणांतील हा धातु 'त्रसी' असा आहे. चुरादिगणांत हा धातु 'त्रस्' असा सकारान्त व 'त्रसि' असा 'इदित्'–अशा दोन तऱ्हेचा आहे. त्यांपैकीं 'त्रसि' या धातूचा येथें विचार करण्याचें कारण नाहीं कारण तो 'इदित्' असल्यामुळें त्याचीं रूपें 'त्रंसयति–त्रंसति' अशीं बनतात. म्हणजे तो धातु 'त्रस्' नसून 'त्रंस्' आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. 'त्रस्' असा जो सकारान्त धातु चुरादिकांत आहे त्याचीं रूपें 'त्रासयति–त्रसति' अशीं होतात असें वाटतें. यावरून हें स्पष्ट होईल कीं, चुरादि व दिवादिगणांतील हे धातु भिन्न आहेत. या दोन्हीं गणांचीं विकरणें एकमेकांचे अपवाद नाहींत म्हणून त्या त्या गणांचीं रूपें स्वतंत्रपणें होण्यास हरकत नाहीं. चुरादि गणांतील पुष्कळ धातु कांहींतरी कारणानें 'विभाषिताणिच्'

असतात म्हणून चुरादिगणांतील ‘ त्रस् ’ धातूचे विकल्पानें ‘ त्रसाति ’ असें ‘शप्’-विकरणान्त रूप आपोआप होतेंच. ‘ त्रसी ’ असा जो दिवादिकांत धातु आहे तो नेहमीं ‘श्यन्’ विकरणान्तच राहिला असता. परंतु पाणिनीला तसें होणें इष्ट नसल्या-मुळें त्यानें त्या धातूचा समावेश वरील सूत्रांत केला. ‘ श्यन् ’ विकरणाचा याप्रमाणें विकल्प केल्यामुळें तो होत नाहीं तेव्हां ‘ शप् ’ होणार, कारण ‘ शप् ’ हा सर्व धातूंहूनही होणारें विकरण आहे. म्हणून दिवादिगणांतील ‘ त्रस् ’ धातूचीं रूपें ‘ त्रस्यति–त्रसाति ’ अशीं होतात.

‘ त्रुट् ’–हा धातु दोन गणांत आहे. चुरादिगणांत आहे तो आत्मनेपदी आहे. आत्मनेपद व ‘ णिच् ’ त्या धातूहून करण्याकरितांच तो धातु चुरादिकांत पाणिनीनें घातला. त्याचें रूप ‘त्रोटयते’ असें होतें, चुरादिकांतील या ‘त्रुट्’–धातूचा संबंध ३।१।७० **भ्राशभ्लाश**–या सूत्रांतील ‘त्रुट्’–या धातूशीं कांहीं नाहीं. तुदादिगणांत जो ‘ त्रुट् ’ धातु आहे तो तेथें घालण्याचें कारण–‘ त्रुटति ’–असें ‘ श ’ विकरणान्त गुणरहित रूप व्हावें व तुदादि गणांतील ‘ कुटादि ’ धातुसमुदाय साधावा हें होय. कुटादिधातु-समुदायांत या धातूला घातल्यामुळें–‘ तुत्रुटिथ, त्रुटिता ’ वगैरे स्थळीं गुण होत नाहीं. ( २४६१ **गाङ्कुटादिभ्योऽञ्णिन्ङित्** १।२।१ ) ‘ त्रुट् ’ धातु दिवादिगणांत घाल-ण्याला कांहीं कारण पाणिनीला दिसलें नाहीं. ‘ त्रुट् ’ या धातूला दुसरा इत्संज्ञक वर्ण नाहीं, पद भिन्न नाहीं व दिवादिगणांत कोणताही धातुसमुदाय साधणेचा नाहीं म्हणून त्याला दिवादिगणांत पाणिनीनें घातलें नाहीं, म्हणूनच ३।१।७० या सूत्रांत त्याचा समावेश केला.

‘ क्रम् ’ हा धातु पाणिनीनें फक्त दिवादिगणांतच घातला, कारण त्याला शमादि धातु–समुदायांत धातुपाठांत घालून व तो समुदाय बनवून ३।२।१४१ **शमित्यष्टाभ्यो घिनुण्** या कृदन्त प्रकरणांतील सूत्रानें ‘ घिनुण् ’ करून ‘ क्रमिन् ’ असें रूप साधावयाचें होतें. ७।३।७४ **शमामष्टानां दीर्घः श्यनि**–या सूत्रानें ‘ श्यन् ’ पुढें असतांना दीर्घ करणें हें कारण त्या धातूचा समावेश दिवादिकांत करण्याचें नव्हे याचें कारण ‘ शप्–व श्यन् ’ यांपैकीं कोणतेंही विकरण पुढें असलें तरी २।३।२० **ष्ठिवुक्लमुचमांशिति** या सूत्रानें दीर्घ स्वतंत्रपणेंच होतो. भ्वादिगणांत या धातूला घालण्याला वर सांगितल्यापैकीं कोणतेंच कारण नव्हतें. ३।१।७० सूत्रांत त्याचा समावेश करून ‘ श्यन् ’ विकल्प केल्याबरोबर ‘ शप् ’ साहजिकपणें होतोच. २।३।२० **ष्ठिवुक्लमुचमांशिति** ७।३।७५ या सूत्रानें ‘ शप् ’ पुढें असतांना दीर्घ होऊन ‘क्रामति’–असें व ‘ श्यन् ’ होऊन ‘ क्राम्यति ’ असें रूप बनतें.

मि. पावटे यांनीं ३।१।८० **धिन्विकृण्व्योरच** सूत्राच्या आधारावर असें अनुमान केलें आहे कीं ‘ धिवि व कृवि ’ हे धातु भ्वादिकांत आल्याच्या योगानें व ‘ धिन व कृण ’ असे धातु तनादिकांत न घातल्याच्या योगानें ३।१।८० या सूत्राचा

विरोध धातुपाठांत असलेला दिसून येतो, म्हणून पाणिनि हा धातुपाठाचा कर्ता नसून कोणी पूर्वाचार्य धातुपाठाचा कर्ता होता. ( Page 18, 19 Construction of the Astd. ) हें त्यांचें अनुमान सत्याच्या कसोटीस किती टिकतें तें पाहूं.

मि. पावटे यांचें हें अनुमान खरें आहे असें वादाकरितां गृहीत धरलें तर काय स्थिति असली पाहिजे होती? कोणीतरी पूर्वाचार्य हल्लीं अस्तित्वांत असलेल्या धातुपाठाचा कर्ता होता तर 'धिन व कृण' असे अकारान्त धातु तनादिगणांत असावयास पाहिजेत. इतकेंच नव्हे, तर त्यांतील कोणताही भाग 'इत्' संज्ञक असतां उपयोगी नाहीं असे ते धातु असले पाहिजेत. परंतु तसले धातु धातुपाठांतील तनादिगणांत नाहींत हें विधान तनादिगण पाहिला असतां कोणासही खरें असल्याचें दिसून येईल. ते धातु तनादिगणांत असते तर मि. पावटे यांच्या वरील अनुमानास कांहींतरी बळकटी आली असती. ते धातु तनादिगणांत कां नाहींत याचें कारणही मि. पावटे यांनीं दिलेलें नाहीं. ज्याअर्थी पावटे म्हणतात तसले धातु तनादिकांत नाहींत त्याअर्थीं धातुपाठांतील तनादिगण पूर्वाचार्यानें केलेला नसून पाणिनीनें, आपल्या अष्टाध्यायींतील ३।१।८० या सूत्राच्या सोयीकरितां, नवीन बनविला असें मानण्यास मि. पावटे तयार आहेत काय ? किंवा मि. पावटे यांनीं आपल्या अनुमाकरितां बनविलेले 'धिन व कृण' हे अकारान्त धातु व 'धिनोति व कृणोति' अशीं त्या धातूंचीं विकरणान्त रूपें पूर्वाचार्यांस माहीत नव्हतीं ही गोष्ट तरी त्यांना कबूल आहे काय ? या प्रश्नांचीं उत्तरें मि. पावटे कांहींही देवोत. आमच्या समजुतीप्रमाणें, पावटे यांच्या अनुमानाप्रमाणें खरी स्थिति नसून, पाणिनि हाच अष्टाध्यायी व धातुपाठ यांचा कर्ता होता व त्यानें मुद्दामच 'धिवि व कृवि' हे धातु तनाधिकांत न घालतां भ्वादिकांतच घालून ३।१।८० या सूत्रानें त्यांचीं 'धिनोति व कृणोति' हीं रूपें साधलीं. पाणिनीला, पूर्वाचार्यांकडून जर कांहीं मिळालें असेल तर 'धिवि व कृवि' हे 'इदित्' धातु मिळाले. त्यावेळेच्या वाङ्मयांतून त्या धातूंचीं 'धिनोति, कृणोति' वगैरे 'शप्'–विषय असतांना होणारीं रूपें व 'शप्'–विषय नसतांना होणारीं 'दिधिन्व, चकृण्व' सारखीं रूपें पाहण्यास मिळालीं. त्यावरून त्याला असा निश्चय करणें प्राप्त झालें कीं–ते धातु 'इदित्' राहिलेच पाहिजेत व 'लट्, लोट्, विधि–लिङ्, व लङ्' या 'शप्' विषय असलेल्या लकारांचे वेळीं ते अकारान्त बनून तनादि धातूप्रमाणें चालले पाहिजेत. या दोन अडचणींतून निघण्याकरितां त्यानें त्या धातूला 'इदित्' ठेवून भ्वादिकांत समाविष्ट केलें व ३।१।८० सूत्र करून 'धिनोति, कृणोति'सारखीं रूपें व्हावींत अशी योजना केली. हे धातु 'धिन व कृण' असे अकारान्त करून त्यांना तनादिकांत घातलें असतें तर 'धिनोति, कृणोति'सारखीं 'शप्'विषयक रूपें साधलीं असतीं तरी 'दिधिन्व, चकृण्व' सारखीं रूपें साधलीं नसतीं.

पाणिनीच्या पूर्वी होऊन गेलेल्या आर्यांना लिपि ( अ, इ, उ, क, ख वगैरे लिहिण्याचीं चिन्हें ) माहीत नव्हती व पाणिनीनें ती आशियामायनर वगैरे प्रांतांत माहीत असलेल्या 'ब्राह्मी' व 'खरोष्ट्री' या लिप्यांस अनुसरून, नवीनच बनविली असें कांहीं युरोपियन विद्वानांचें म्हणणें आहे. या प्रश्नाचें उत्तर पाणिनीनेंच, अष्टाध्यायींतील सूत्रांत निर्दिष्ट केलेले प्राचीन ग्रंथ व त्यांचे कर्ते यांच्या नांवनिशीवरून दिलेलें आहेच. त्याबद्दल या प्रस्तावनेंत इतरत्र विचार केलेला आहे. या स्थलीं पाणिनीनें 'ब्राह्मी' व 'खरोष्ट्री' यासारख्या दोषपूर्ण व अपूर्ण लिप्यांस अनुसरून आपली लिपि बनविणें शक्य तरी होतें काय याबद्दल विचार कर्तव्य आहे. आमच्या मतानें ती गोष्ट अगदींच अशक्य होती. त्याचीं कारणें अशीं:– १ 'ब्राह्मी' व 'खरोष्ट्री' या लिप्यांतील अकारादि चिन्हांचा, त्या त्या अक्षरांच्या मुखांतून निघणाऱ्या उच्चाराशीं कांहीं संबंध असलेला दिसत नाहीं. अकारादि स्वर व क–कारादि व्यंजनें, यांचा उच्चार करतांना मानसिक वातावरणांत जे फेरफार व मुखाच्या अन्तर्भागांत विशिष्ट स्थलीं अन्तःस्फूर्तीचे जे विशिष्ट आकाराचे आघात होतात त्यांचा अनुभव व ज्ञान त्या परकीय लिपींच्या कर्त्यांना त्या कालीं होतें असें दिसत नाहीं. त्या दोन लिपींचा आधार घेऊन बनलेल्या ज्या युरोपियन व सेमेटिक लिपि हल्लीं प्रचारांत आहेत त्यांचें संशोधन करणाऱ्या हल्लींच्या विद्वानांनाही ही स्थिति ज्ञात नाहीं. हल्लींच्या संस्कृत वाङ्मयांत असणारी ' देवनागरी ' लिपि व तत्सम दुसरी एखादी लिपि यांना मूलभूत असलेली लिपि पाणिनीनें बनविली या विधानांत खरेपणा नाहीं असें या प्रस्तावनेंत इतरत्र दाखविलें आहे. अकारादि अक्षरांचा उच्चार करण्याचा विचार मनांत आल्याबरोबर मानसिक वातावरणांत जी चलबिचल होते तिचें विवेचन पाणिनीय मताप्रमाणें रचलेल्या 'शिक्षाध्यायांत' केलेलें आहे. हा पाणिनीय 'शिक्षाध्याय' पाणिनीनें स्वतः योजलेल्या शब्दांनीं केलेला आहे असें नसून पाणिनीनंतरच्या दुसऱ्या एखाद्या आचार्यानें पाणिनीच्या मताला अनुसरून केलेला आहे असें–'अथ शिक्षां प्रवक्ष्यामि पाणिनीयं मतं यथा'–या वाक्यावरून दिसतें. 'शिक्षाध्यायांत' पाणिनीचें जें मत प्रगट झालेलें आहे त्यालासुद्धां आधार पाणिनीच्या पूर्वी होऊन गेलेल्या पूर्वाचार्यांनीं बनविलेल्या शास्त्राचा होता असें ' शास्त्रानुपूर्वं तद्विद्याद्यथोक्तं लोकवेदयोः'–या पुढील वाक्यावरून दिसतें. यावरून पाणिनीच्या पूर्वी वर्णोच्चाराचें शास्त्र अस्तित्वांत होतें असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. वर्णोच्चारांच्या त्या फार प्राचीन शास्त्राच्या अनुरोधानें लिपीचें शास्त्र निष्पन्न झालें असें आमचें म्हणणें आहे. तें कसें तें पाहूं. अक्षरोच्चार करण्याचा विचार मनांत आल्यानंतर अन्तर्गत वायूंत कांहीं चलन होऊन तो वायु मुखाच्या त्या अक्षराच्या उच्चारास योग्य असलेल्या स्थानाजवळ येतो असें वर्णन शिक्षेच्या आरंभींच्या आठ श्लोकांच्या अखेरपर्यंत आहे. नवव्या श्लोकांत, अक्षरोच्चार करण्यास अवश्य लागणाऱ्या साधनांचा उल्लेख केलेला आहे. त्यांत

स्थान व प्रयत्न हीं दोन साधनें, दुसऱ्या साधनांबरोबर आवश्यक आहेत असें सांगितलें आहे. स्थान व प्रयत्न या साधनांचा ऊहापोह सिद्धान्तकौमुदींत १० व्या सूत्राखालीं केलेला आहे. त्यांतील प्रयत्न या शब्दाचें अस्तित्व प्रस्तुत प्रश्नास महत्त्वाचें आहे. प्रयत्न या शब्दाचा अर्थ–विशिष्ट अक्षराच्या उच्चारास अवश्य असलेली खटपट–असा केला असतां चूक होईल असें वाटत नाहीं. अकारादि अक्षरांचा उच्चार करण्याचे वेळीं कण्ठादिस्थानीं आघात करणाऱ्या वायूला जो विशिष्ट आकार देणें तोच प्रयत्न किंवा खटपट होय. कवर्ग या कण्ठ्य वर्णांतील कोणत्याही अक्षराचा उच्चार करावयाचा असल्यास त्याबद्दल होणाऱ्या वाय्वाघाताच्या आकाराचें स्वरूप अकाराच्या वाय्वाघाताच्या आकाराहून कांहीं भिन्न असलेंच पाहिजे. तसें नसतें तर अकार ककार यांचे उच्चार सारखेच झालेले ऐकूं आले असते. याप्रमाणेंच सर्व अक्षरांच्या व वर्णांच्या उच्चारांच्या वेळीं होत असलेल्या वायूच्या आघाताचे आकार भिन्न भिन्न असतात असें म्हणण्यास हरकत नाहीं. पाणिनीच्या पूर्वी होऊन गेलेले वर्णशास्त्रज्ञ योगादिशास्त्राभ्यासानें युक्त असल्यामुळें अक्षरांच्या उच्चाराच्या इच्छेबरोबर अन्तर्वायूच्या निरनिराळया गति होत त्याचें प्रत्यक्ष ज्ञान त्यांना जसें होत असे, तसेंच कण्ठादि स्थानावर होणाऱ्या आघातांच्या आकाराचेंही ज्ञान त्यांना प्रत्यक्ष होत होतें असें 'शिक्षाध्यायाच्या' आरंभींच्या सात, आठ, नऊ, श्लोकांच्या अर्थावरून अनुमान करण्यास हरकत नाहीं. त्याप्रमाणें ज्ञान झालेल्या वाय्वाघातांच्या आकारानुसार अकारादि चिन्हें व वर्णमाला तयार झाली असावी, असें वाटतें. मानसिक शुद्ध वायूमध्यें अक्षरांच्या उच्चाराबद्दल जी इच्छा होई तिच्यामुळें उत्पन्न झालेली चलबिचल तीच अकारादि चिन्हांची वर्णक्रिया आहे, म्हणून त्या चिन्हांना वर्ण असें नांव पडलें असावें. व अकारादिकांचे आकार–ही सतत तेच ते असल्याचें आढळल्यावरून पूर्वाचार्यांनीं त्या चिन्हांना अक्षरें असेंही नांव दिलेलें असावें. अक्षर या शब्दाचा अर्थ-'न क्षरति वा चलतीति–'असा आहे. अकारादि अक्षरें लिहितांना सुद्धां त्या त्या अक्षरांचा उच्चार मानसिक वायूच्या साह्यानें कण्ठादिस्थानावर आघात होऊन अस्फुट रीतीनें होत असतो असा प्रत्येकाचा अनुभव आहे. म्हणून वाय्वाघात बोलतांनाच होतात व लिहितांना होत नाहीं असें मानण्याचें कारण नाहीं. कण्ठादिस्थानावर होणारे हे वाय्वाघात, वीणेच्या तारांवर कांहींतरी साधनांच्या योगानें केलेल्या आघातांप्रमाणें लेखनक्षम होऊं शकतात असें हल्लीं अनुभवसिद्ध झालेलें आहे. हल्लींच्या विद्वानांनीं जी गोष्ट आधिभौतिकशास्त्राच्या अभ्यासानें सिद्ध केली तसल्याच तऱ्हेची दुसरी एखादी गोष्ट पाणिनीच्या पूर्वाचार्यांनीं योगादिमानसशास्त्रांच्या अभ्यासानें प्रत्यक्ष ज्ञात करून घेणें अशक्यप्राय आहे असें म्हणण्याचें धाष्टर्य योगासारख्या मानसशास्त्रास पारखे असलेल्या लोकांतच दिसणें शक्य आहे. संस्कृत वाङ्मयांतील सर्व अक्षरांच्या उच्चारास आवश्यक असलेल्या वर्णांचें लेखन करण्यास योग्य अशीं मूलाक्षरें व चिन्हें 'ब्राह्मी' व 'खरोष्ट्री' या लिपींत

नाहींत. अनुस्वार, विसर्ग, जिव्हामूलीय, उपध्मानीय वगैरे सारख्यांचें लेखन करण्यास त्या लिपींत कोणतेंही चिन्ह नाहीं. आशियामायनर वगैरे सेमेटिक देशांतील व्यापाऱ्यांनीं आर्यावर्तांतील लोकांशीं व्यापार करण्याकरितां आर्यावर्तांतील लिपींतील व्यापार करण्यास आवश्यक इतकींच अक्षरें घेऊन एक अपूर्ण अशी लिपि बनविली व तिला 'ब्राह्मी' असें नांव दिलें असावें असें 'ब्राह्मी' या संस्कृत–घटित नांवावरून अनुमान करण्यास हरकत नाहीं. 'खरोष्ट्री' हा शब्दही संस्कृतघटित आहे. 'खर' आणि 'उष्ट्र' हे दोन्ही प्राणी सर्वांना माहीत आहेत. बेढब, आडमुठा, कुरूप व मूर्ख असे कोणी प्राणी असतील तर ते हेच होत. ही लिपि आर्यावर्तांतील लोकांच्या दृष्टीस पडल्याबरोबर, आर्यस्थानांतील संस्कृत लिपीच्या तुलनेनें, ती सेमेटिक लिपि बेढब, अडाणी लोकांच्या तोंडांतच शोभणारी व शास्त्रानें नियमित न केलेली अशी पाहून 'खरोष्ट्री' हें यथार्थ नांव त्यांनीं तिला दिलेलें असावें असें वाटतें.

सि. कौ. तील ९१४ **शूद्राणामनिरवसितानाम्** २–४–१० या सूत्रांतील 'अनिरवसितानाम्' या पदावरून शूद्रामध्यें दोन भेद होते असें दिसतें. ते भेद ( १ ) निरवसित ( २ ) अनिरवसित हे होत. पाणिनीनें शूद्रप्रभृति किंवा शूद्रादि गण मानिलेला गणपाठावरून दिसत नाहीं. त्यावरून 'निरवासित' व 'अनिरवसित' शूद्र कोणते व कसे ओळखावेत याबद्दल त्याच्या वेळीं निश्चित नियम झालेले होते असें दिसत नाहीं. भ. दीक्षित व तत्त्वबोधिनीकार यांनीं–पात्रात् बहिष्कृताः निरवासिताः–असा अर्थ दिला आहे. शूद्रांमध्यें ' पात्रात् बहिष्कृत ' व ' पात्रात् अबहिष्कृत ' कोण हें ठरविण्यास रूढीचा आधार त्यावेळीं घेत असावेत असें दिसतें. शूद्र शब्दाचा अर्थ ' त्रैवर्णिकेतरमनुष्यपरः शूद्रशब्दः, नतु शूद्रजातिपरः ' असा जो तत्त्वबोधिनीकारांनीं दिला आहे तो इ. स. १७ व्या १८ व्या शतकांत झालेल्या त्या ग्रंथकारानें त्यांच्या वेळच्या जातित्वकल्पनेप्रमाणें दिला असल्यामुळें तोच अर्थ पाणिनीच्या वेळीं होता असें म्हणवत नाहीं. पाणिनीच्या या सूत्रांवरून इतकेंच म्हणतां येईल कीं, शूद्रांपैकीं कांहीं विशिष्ट जातीचे लोक त्रैवर्णिकांशीं मिळून मिसळून जेवीत होते व इतर कांहीं शूद्र जाति त्यांच्याशीं मिळून मिसळून अन्नव्यवहार करीत नव्हत्या, परंतु पाणिनीच्या वेळीं कांहीं शूद्र जातीसंबंधानें हल्लीं असलेली अस्पृश्यत्व कल्पना त्रैवर्णिकांमध्यें नव्हती असें मात्र वरील सूत्राच्या अर्थावरून निःसंदिग्धपणें ठरतें.

डेक्कन जिमखाना
पुणें नं. ४
द. मो. रानडे
यांचा बंगला.

वासुदेव नारायणशास्त्री गोखले.